RNI No. MAHBIL /2009/35527
Reg. No. MH/MR/South-343/2014–16

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–क

वर्ष ६, अंक ३०]    बुधवार, जून २५, २०१४/आषाढ ४, शके १९३६    [पृष्ठे १७८, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ६१**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिका-यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

अधिसूचना

(पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २०१४

**विद्युत अधिनियम, २००३.**

क्रमांक मविनिआ/तांत्रिक/पामुप्र/विनियम/२०१४/५६१.—विद्युत अधिनियम, २००३ (२००३चा ३६) च्या कलम १८१ च्या उप कलम (१) आणि उप कलम (२) सह कलम २ च्या उप कलम (४७), कलम ३०, कलम ३२ च्या उप कलम (३), कलम ३९ च्या उप कलम (२)च्या खंड (डी) आणि कलम ४० च्या खंड (सी) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, राज्यामध्ये राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत मुक्त प्रवेशासाठी, याद्वारे खालील विनियम करीत आहे :—

**भाग ए : प्रारंभिक**

**१. संक्षिप्त शीर्षक, व्याप्ती आणि प्रारंभ**

१.१. या विनियमांना "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २०१४" असे म्हणावे.

१.२. हे विनियम महाराष्ट्र राज्यातील राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत मुक्त प्रवेश आणि वापरासाठी लागू राहतील.

१.३. हे विनियम **शासकीय राजपत्रातील** त्यांच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

**२. व्याख्या**

२.१ संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसल्यास, या विनियमांमध्ये ,—

ए. **"अधिनियम"** म्हणजे विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६);

बी. **“वाटप केलेली क्षमता”** म्हणजे दीर्घकालीन/मध्यमकालीन मुक्त प्रवेश ग्राहकाला राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेवर ठरवून दिलेल्या ठिकाणांमध्ये विजेचे अंतःक्षेपण (इंजेक्शन) करण्यासाठी आणि वीज खेचण्यासाठी (ड्रॉअल) विजेचे हस्तांतरण करण्याकरिता परवानगी देण्यात आलेली मेगावॉटमधील क्षमता आणि “ वाटप केलेली क्षमता” या संज्ञेचा अर्थ त्याप्रमाणे लावण्यात येईल;

सी. **“अर्जदार”** म्हणजे या विनियमांनुसार राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत जोडणी आणि/किंवा मुक्त प्रवेश मंजूर करण्यासाठी ज्याने अर्ज केला आहे अशी व्यक्ती ;

डी. **“प्राधिकृत प्रतिनिधी”** म्हणजे, पारेषण परवानाधारक, राज्य पारेषण कंपनी किंवा राज्य भार प्रेषण केंद्र, जसे असेल तसे, यांच्या सर्वसाधारण अथवा विशिष्ट प्राधिकाराखाली कार्ये करीत असलेले, पारेषण परवानाधारक, राज्य पारेषण कंपनी किंवा राज्य भार प्रेषण केंद्राचे सर्व अधिकारी, कर्मचारी किंवा प्रतिनिधी;

इ. **“द्विपक्षीय व्यवहार”** म्हणजे असा व्यवहार ज्यामध्ये, विनिर्दिष्टीत खरेदीदार आणि विनिर्दिष्टीत विक्रेता यांच्यात, थेट किंवा वीज व्यापार परवानाधारकाच्या किंवा पॉवर एक्सचेंज मार्फत (ग्रीडमधील) विनिर्दिष्टीत ठिकाणापासून कोणत्याही कालावधीत विजेच्या निश्चित किंवा बदलत्या (मेगावॉटमधील) परिमाणात, वीज खेचण्यासाठी ऊर्जेचा (मेगावॉटतासामधील) विनिमय करण्यात येतो,--

एफ. **“ठोक वीज पारेषण करार”** म्हणजे, पारेषण परवानाधारकाच्या आणि राज्य पारेषण कंपनीच्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत प्रवेशासाठी पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याला ज्या करारांतील अटी व शर्तीनुसार हक्क प्राप्त झाला आहे असा करण्यात आलेला करार;

जी. **“केंद्रीय आयोग”** म्हणजे अधिनियमाच्या कलम ७६ मध्ये संबोधण्यात आलेला केंद्रीय विद्युत नियामक आयोग;

एच. **"आयोग"** म्हणजे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ;

आय. **"अतिभार"** म्हणजे अशी परिस्थिती ज्यामध्ये पारेषण क्षमतेकरिता मागणी ही उपलब्ध हस्तांतरण क्षमतेपेक्षा अधिक असते;

जे. **"जोडणीयता"** स्ववापरासाठीचा वीज निर्मिती प्रकल्प, ग्राहक किंवा राज्यांतर्गत पारेषण परवानाधारकासह निर्मिती केंद्रांकरिता **" जोडणीयता"** म्हणजे राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडून घेण्याची स्थिती;

के. **"ग्राहक"** याचा अर्थ अधिनियमामध्ये असल्याप्रमाणेच राहील परंतु तो, हे विनियम महाराष्ट्र राज्यातील ज्या ग्राहकांना लागू होतील त्यांच्या पुरता मर्यादित राहील;

एल. **"करारांतर्गत मागणी"** म्हणजे किलोवॉट (केडब्ल्यू) किंवा मेगावॉट ( एमडब्ल्यू) किंवा अश्वशक्ति (एचपी) किंवा किलोव्होल्ट ॲम्पिअर (केव्हीए) किंवा मेगाव्होल्ट ॲम्पिअर (एमव्हीए) मधील वितरण परवानाधारक आणि ग्राहक यांच्यात परस्पर संमतीने मान्य झालेली विजेची मागणी जी , —

(एक) वीज पुरवठ्याच्या करारात नोंदल्याप्रमाणे असेल; किंवा

(दोन) वितरण यंत्रणेशी जोडणी व वापर करण्यासाठीच्या करारात नोंदल्याप्रमाणे असेल; किंवा

(तीन) अन्य लेखी पत्रव्यवहारात मान्य केल्याप्रमाणे असेल :

परंतु असे की, मेगाव्होल्ट ॲम्पिअर/किलोव्होल्ट ॲम्पीअर पासून मेगावॉट/किलोवॉट युनिट मध्ये रूपांतर करण्याच्या प्रयोजनासाठी युनिटी पॉवर फॅक्टर विचारात घेण्यात येईल.

एम. **" दिवस "** म्हणजे रात्री बारा (००-०० वाजता) वाजता सुरू होणारा आणि २४-०० वाजता संपणारा दिवस;

एन. **“सविस्तर कार्यपद्धत”** म्हणजे येथील विनियम १० ते १४ मध्ये उल्लेख केल्यानुसार नोडल एजन्सीने निर्गमित केलेली कार्यपद्धत;

ओ. **“ आय इ जी सी”** म्हणजे अधिनियमाच्या कलम ७९ च्या उप कलम १ च्या खंड (एच) अंतर्गत केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने विनिर्दिष्ट केलेली आणि वेळोवेळी सुधारणा केलेली भारतीय विद्युत ग्रिड संहिता;

पी. **“ दीर्घकालीन प्रवेश”** म्हणजे बारा (१२) वर्षांपेक्षा जास्त परंतु पंचवीस (२५) वर्षांपेक्षा जास्त नसेल, अशा कालावधीकरिता राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करण्याचा हक्क;

क्यू. **“ मध्यमकालीन प्रवेश”** म्हणजे तीन (३) महिन्यांपेक्षा जास्त परंतु तीन (३) वर्षांपेक्षा जास्त नसेल अशा कालावधीकरिता राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करण्याचा हक्क;

आर. **“ महिना”** म्हणजे ग्रेगोरिअन कॅलेंडरप्रमाणे १ कॅलेंडर महिना;

एस. **“ नोडल एजन्सी”** म्हणजे या विनियमांच्या विनियम ३ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेली नोडल एजन्सी;

टी. **“ मुक्त प्रवेश ग्राहक”** म्हणजे ज्याला या विनियमांतर्गत मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आला आहे असा ग्राहक, परवानाधारक किंवा निर्मिती कंपनी;

यू. **“ अंशकालीन मुक्त प्रवेश ग्राहक”** म्हणजे निर्मिती कंपनी किंवा अन्य परवानाधारक किंवा पॉवर एक्सचेंजच्या मार्फत वीज घेण्यासाठी ज्याला या विनियमांतर्गत मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आला आहे असा ग्राहक आणि त्याचवेळी जो त्याची विजेची गरज भागविण्यासाठी ( तो ज्याच्या वीज

पुरवठ्याच्या क्षेत्रात स्थित आहे अशा वितरण परवानाधारकाकडे) त्याची अंशतः विजेची मागणी राखून ठेवतो;

व्ही. **"अल्पकालीन मुक्त प्रवेश"** म्हणजे एका वेळेस एका महिन्यापेक्षा जास्त नसलेल्या कालावधीकरिता राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करण्याचा हक्क;

एबल्यू. **" राज्य भार प्रेषण केंद्र"** म्हणजे अधिनियमाच्या कलम ३१ च्या उप कलम (१) अंतर्गत स्थापन करण्यात आलेले राज्य भार प्रेषण केंद्र;

एक्स. **"विशेष ऊर्जा मीटर्स"** म्हणजे केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केलेल्या आणि वेळोवेळी सुधारणा केलेल्या केंद्रीय विद्युत प्राधिकरण (मीटर बसविणे व चालविणे) विनियम, २००६ नुसार बसविलेले मीटर;

वाय. **" राज्य ग्रिड संहिता"** म्हणजे अधिनियमाच्या कलम ८६ च्या उप कलम (१) च्या खंड (एच) अंतर्गत आयोगाने विनिर्दिष्ट केलेली व वेळोवेळी सुधारणा केलेली राज्य ग्रिड संहिता, जी हे विनियम सुरू झाल्याच्या दिनांकाच्या दिवशी लागू होईल;

झेड. **" राज्य पारेषण कंपनी (एसटीयू)"** म्हणजे अधिनियमच्या कलम ३९ च्या उप कलम (१) अंतर्गत महाराष्ट्र शासनाने अधिसूचित केलेली शासकीय कंपनी;

एए. **" स्ट्रॅन्डेड पारेषण क्षमता"** म्हणजे राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमधील अशी पारेषण क्षमता जी या विनियमांच्या विनियम ३२ नुसार दीर्घकालीन मुक्त प्रवेश ग्राहकांनी मुक्त प्रवेशाचा हक्क सोडून दिल्यामुळे वापराविना पडून राहण्याची शक्यता असते;

बीबी. **“ पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता”** म्हणजे खालील विनियम ५.१ मधील तरतुदी वगळून, ठोक वीज पारेषण करारानुसार, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत प्रवेशासाठी पारेषण क्षमतेच्या हक्कांचे वाटप करण्यात आलेली व्यक्ती; आणि

सीसी. **“पारेषण क्षमता हक्क”** म्हणजे, सर्वसाधारण परिस्थितीत, ठोक वीज पारेषण करारात निश्चित केलेल्या विजेचे अंतःक्षेपण करण्याच्या आणि वीज खेचण्याच्या ठिकाणांमध्ये मेगावॅटमध्ये विजेचे हस्तांतरण करण्याचा पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याचा हक्क;

डीडी. “**कालगट”** म्हणजे रात्री ००-०० वाजता सुरू होणारा वेळेचा प्रत्येकी १५ मिनिटांचा गट ज्यामध्ये विशेष ऊर्जा मीटर्स विनिर्दिष्ट करण्यात आलेली विद्युत मापदंड आणि परिमाण यांची नोंद करतात.

२.२ (अ) या विनियमांत वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द आणि उक्ती ज्यांची व्याख्या अधिनियमात किंवा आय इ जी सी किंवा राज्य ग्रिड संहिता किंवा अधिनियमाखाली केलेल्या नियम आणि विनियमांमध्ये करण्यात आलेली असेल तर अशा शब्द आणि उक्तींचा अर्थ, अधिनियम किंवा आय इ जी सी किंवा राज्य ग्रिड संहिता किंवा नियम आणि विनियमांत, जसे असेल तसे, देण्यात आलेल्या अर्थानुसार राहील.

(ब) या विनियमांच्या मराठी अनुवादातील व इंग्रजी विनियमांमधील कोणत्याही शब्दाचा/मजकुराचा अर्थ निश्चित करताना कोणताही वाद उद्‌भवल्यास आणि/किंवा कोणतीही विसंगती आढळल्यास मूळ इंग्रजीतील विनियम ग्राह्य धरण्यात येतील.

## ३. भेदभावरहित मुक्त प्रवेशाची तरतूद

३.१. पारेषण परवानाधारक, या विनियमांनुसार, अशा पारेषण परवानाधारकाच्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत भेदभावरहित मुक्त प्रवेश देईल.

३.२. मुक्त प्रवेशाच्या मंजुरीपूर्वी जोडणी घेण्याची आवश्यकता --

(एक) राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या संबंधात दीर्घकालीन, मध्यमकालीन आणि अल्पकालीन मुक्त प्रवेशास मंजुरी, या विनियमांच्या भाग ब अंतर्गत जोडणीयतेस मंजुरी घेण्याच्या अधीन राहीलः

परंतु असे की, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडणीयता मागणाऱ्या स्ववापरासाठीचे वीज निर्मिती प्रकल्प किंवा ग्राहक यांच्यासहित वीज निर्मिती केंद्रांनी जोडणीयतेसाठी अर्ज केल्याशिवाय ते दीर्घकालीन मुक्त प्रवेश किंवा मध्यमकालीन मुक्त प्रवेश किंवा अल्पकालीन मुक्त प्रवेशासाठी अर्ज करू शकणार नाहीत.

परंतु असे की, जोडणीयतेकरिता आणि दीर्घकालीन किंवा मध्यमकालीन मुक्त प्रवेशाकरिता व्यक्ती एकाच वेळी अर्ज करू शकेलः

परंतु आणखी असे की, सदर विनियम अधिसूचित होण्याच्या दिनांका रोजी प्रलंबित राहिलेल्या दीर्घकालिन मुक्त प्रवेश किंवा मध्यमकालिन मुक्त प्रवेश किंवा अल्पकालिन मुक्त प्रवेशाबाबतच्या अर्जांना जोडणीयतेस मंजुरी घेणे आवश्यक राहील.

३.३ नोडल एजन्सीची निश्चिती-

(एक) राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडणीयता, दीर्घकालीन प्रवेश आणि मध्यमकालीन मुक्त प्रवेशाच्या मंजुरीसाठी राज्य पारेषण कंपनी ही नोडल एजन्सी असेलः

परंतु असे की, या विनियमांखाली अल्पकालीन प्रवेशाच्या मंजुरीसाठी राज्य भार प्रेषण केंद्र ही नोडल एजन्सी असेलः

परंतु आणखी असे की, वितरण परवानाधारकाने एकदा वितरण मुक्त प्रवेशास मान्यता दिल्यानंतर, ग्राहक राज्य भार प्रेषण केंद्र किंवा राज्य पारेष कंपनी यांच्याशी मुक्त प्रवेशाच्या मंजुरीसाठी समन्वय साधेल.

## ४. मुक्त प्रवेश मागण्यासाठी पात्रता

४.१ (एक) विद्युत निर्मिती कंपनी, जिच्या मालकीचे राज्यात निर्मिती केंद्र असेल किंवा संचालन करीत असेल किंवा जिचा निर्मिती केंद्र स्वतःच्या मालकीचे असण्याचा किंवा त्याचे संचालन करण्याचा उद्देश असेल;

(दोन) स्ववापरासाठी वीज निर्मिती प्रकल्पाची उभारणी, देखभाल आणि संचालन करणारी व्यक्ती किंवा असा प्रकल्प उभारण्याचा, देखभाल आणि संचालन करण्याचा उद्देश असणारी व्यक्ती;

(तीन) वितरण परवानाधारक; आणि

(चार) वीज व्यापार परवानाधारक,

हे या विनियमांनुसार राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत मुक्त प्रवेशाकरिता अर्ज करण्यास पात्र राहतील.

४.२ आयोगाने, अधिनियमाच्या कलम ४२ च्या उप कलम (२) मधील तरतुदींना अनुसरून राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत मुक्त प्रवेश सुरू केल्यानंतर आणि विनिर्दिष्ट केल्यानंतर अशा मुक्त प्रवेशासाठी अर्ज करण्यास ग्राहक पात्र राहील:

परंतु असे की, असा ग्राहक, या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अटींव्यतिरिक्त, आयोगाने त्यासाठी अधिसूचित केलेल्या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट असलेल्या अशा अटींच्या देखील, अधीन राहील:

परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या कलम २ (१५) अंतर्गत निर्देशित असलेल्या अर्थानुसार जी व्यक्ती ग्राहक नसेल आणि जिची जागा परवानाधारकाच्या जाळ्याशी वीज प्राप्त करण्याच्या उद्देशासाठी जोडलेली नसेल, अशी व्यक्ती, या विनियमांच्या अंतर्गत, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये जोडणीतेस मंजुरी मिळविण्यासाठी आणि मुक्त प्रवेशास मंजुरी मिळविण्यासाठी पात्र राहीलः

परंतु असे की, जो ग्राहक राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी (ग्राहकाधिष्ठित पारेशण वाहिनीसह) जोडलेला आहे आणि जो वितरण परवानाधारकाचा ग्राहक आहे त्याच्यासाठी मविनिआ (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०१४ मधील विनियम ३.१, ४.२.१ आणि ४.२.२ मध्ये उल्लेखलेल्या अटी, पारेषण मुक्त प्रवेश मागण्यासाठी, बंधनकारक असतील.

४.३ पारेषण मुक्त प्रवेश उपयोगकर्ते तीन वर्गवारीमध्ये विभागण्यात येतील, जसेः-

अ) दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता

ब) मध्यम-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता

सी) अल्प-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता

परंतु असे की, दीर्घ-कालीन, मध्यम-कालीन आणि अल्प-कालीन मुक्त प्रवेशाचा कालावधी विनियम १०.१.२ मधील तरतुदींनुसार राहील.

४.४ मुक्त प्रवेश ग्राहक पॉवर एक्स्चेंजकडून विजेचा पुरवठा घेण्यासाठी किंवा करण्यासाठी पारेषण यंत्रणेत मुक्त प्रवेश मागू शकेल.

४.५ या विनियमांमध्ये काहीही नमूद असले तरी, या विनियमांतर्गत मुक्त प्रवेशाची तरतूद राज्य पारेषण कंपनी/ राज्य भार प्रेषण केंद्राच्या सर्व देय रकमा अदा करण्याच्या अधीन राहीलः

परंतु असे की, राज्य पारेषण कंपनी/ राज्य भार प्रेषण केंद्र आणि मुक्त प्रवेशासाठीचा अर्जदार यांच्यामध्ये विजेसाठीचा कोणताही आकार किंवा विजेसाठीच्या आकाराव्यतिरिक्त अन्य रकमेच्या संबंधात वाद झाल्यास, ज्याची मागणी राज्य पारेषण कंपनी/ राज्य भार प्रेषण केंद्र अशा मुक्त प्रवेश अर्जदाराकडून करीत असेल, तर अधिनियमाच्या कलम ५६ नुसार, पारेषण परवानाधारकाकडे अशा वादग्रस्त रकमेइतकी अनामत रक्कम जमा केल्यानंतरच, अशा वादाचे निराकरण प्रलंबित असताना, सदर अर्जदाराला मुक्त प्रवेशास परवानगी देण्यात येईलः

परंतु असेही की, राज्य पारेषण कंपनी/ राज्य भार प्रेषण केंद्र, जमा केलेल्या अनामत रकमेपैकी जी रक्कम मुक्त प्रवेशासाठीच्या अर्जदारास वादाचे निराकरण झाल्यानंतर परत करण्यात येईल त्या रकमेवर. रिझर्व्ह बँकेच्या बँक दराने व्याज, अदा करील :

परंतु आणखी असे की, अर्ज करण्याच्या वेळी नादार किंवा दिवाळखोर घोषित केलेली व्यक्ती मुक्त प्रवेशास पात्र राहणार नाही :

परंतु असेही की, दोन देयकांहून अधिक कालावधीसाठी वादग्रस्त नसलेले देयक अदा न केल्यास अशा मुक्त प्रवेश अर्जदाराला, अधिनियमाच्या कलम ५६ नुसार, राज्य पारेषण कंपनी/ राज्य भार प्रेषण केंद्राकडे सदर देय रक्कम अनामत ठेवल्यानंतरच मुक्त प्रवेश देण्यात येईल.

## ५ पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता

५.१ या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांका रोजी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा असलेला उपयोगकर्ता हा अशा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा एक पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता म्हणून मानण्यात येईलः

परंतु असे की, शासकीय कंपनी किंवा अधिनियमाच्या कलम १३१ च्या उप-कलम (२) मध्ये संबोधण्यात आलेली कंपनी ही, त्या कलमानुसार हस्तांतरण योजना तयार करण्यात आल्याच्या दिनांकापासून विद्युत मंडळ वापरत असलेल्या कोणत्याही राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता म्हणून मानण्यात येईल :

परंतु आणखी असे की, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या राज्य पारेषण कंपनीने ज्याला दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश मंजूर केला आहे अशा उपयोगकर्त्यासह राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा मानीव उपयोगकर्ता, या विनियमाच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून साठ (६०) दिवसांच्या आत, पारेषण परवानाधारकाशी ठोक वीज पारेषण करार करतील.

५.२ या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांका रोजी वरील विनियम ५.१ अंतर्गत पारेषण यंत्रणेच्या उपयोगकर्त्याला, पारेषण यंत्रणेत वीज अंतःक्षेपण करण्यासाठी, आयोगाच्या मान्यतेने, करार किंवा अन्य व्यवस्थेद्वारे घेतलेल्या एकूण वीज निर्मिती क्षमतेशी सममूल्य पारेषण क्षमता हक्क, पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याला राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत असल्याचे मानण्यात येईलः

परंतु असे की, या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांका रोजी असलेल्या अशा पारेषण क्षमता हक्कांचा कालावधी, पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने वीज निर्मिती क्षमता ज्या करार किंवा अन्य व्यवस्थेखाली प्राप्त केली असेल, त्याच्या शिल्लक कालावधी इतका असेलः

परंतु आणखी असे की, वरील विनियम ५.१ मधील पहिल्या परंतुकाखालील पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याला, अशा पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याला हस्तांतरण योजनेतील शर्तीनुसार वाटप करण्यात आलेल्या निर्मिती क्षमतेच्या सममूल्य व कालावधीकरिता, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये पारेषण क्षमतेचे हक्क असल्याचे मानण्यात येईल :

परंतु आणखी असेही की, या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांका रोजी जर पारेषण परवानाधारकाने पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याची भविष्यातील गरज भागविण्यासाठी पारेषण यंत्रणेच्या बळकटीकरणाचे काम हाती घेतले असेल तर, यंत्रणेतील अशा बळकटीकरणामुळे निर्माण होणाऱ्या क्षमतेतून,जेव्हा अशी क्षमता उपलब्ध होईल तेव्हा, अशा पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याला, पारेषण क्षमता हक्क वाटप होऊन मिळण्याचा, हक्क राहील.

## ६ पारेषण यंत्रणेचे नियोजन

६.१ राज्य पारेषण कंपनी, या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून एकशे ऐंशी (१८०) दिवसांच्या आत, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेसाठी पारेषण यंत्रणेची योजना त्याच्या इंटरनेटच्या संकेत-स्थळावर प्रदर्शित करील आणि कोणत्याही व्यक्तीस विनंतीवरुन सदर योजना उपलब्ध करून देईल :

परंतु असे की, आयोग नियोजन संहिता वेगळ्या नियोजन संहिते किंवा विनियमांद्वारे विनिर्दिष्ट करेपर्यंत, या विनियमांमधील विनियम ६ च्या पुर्ततेसाठी पारेषण यंत्रणा आराखडा तयार करण्यात येईल.

६.२ अशा पारेषण यंत्रणा आराखड्याचा कालावधी, आराखडा ज्या वर्षी प्रसिद्ध करण्यात आल असेल त्या वर्षानंतर लगेच सुरू होणाऱ्या आर्थिक वर्षापासून पाच (५) वर्षे इतका राहील :

परंतु असे की, पारेषण यंत्रणा आराखडा राज्य पारेषण कंपनीकडून प्रत्येक वर्षी अद्ययावत करण्यात येईल आणि विनियम ६.१ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या पद्धतीनुसार प्रत्येक वर्षी ३० सप्टेंबरपर्यंत प्रसिद्ध करण्यात येईल आणि आराखडा ज्या वर्षी प्रसिद्ध करण्यात आला असेल त्या वर्षानंतर लगेच सुरू होणाऱ्या आर्थिक वर्षापासून पाच (५) वर्षे इतका योजनेचा कालावधी राहील.

६.३ पारेषण यंत्रणा आराखड्यामध्ये, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या आराखड्याचा तपशील असेल आणि त्यात सर्व पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांच्या फायद्यासाठी प्रस्तावित राज्यांतर्गत पारेषण योजना तसेच यंत्रणा बळकट करणाऱ्या योजनांचा समावेश असेल.

६.४ राज्य पारेषण कंपनी, या विनियमांखाली पारेषण यंत्रणेच्या आराखडा तयार करण्याच्या प्रयोजनासाठी, निर्मिती क्षमतेतील भर, यंत्रणेतील वाढ आणि दीर्घ-कालीन विद्युत भाराचा अंदाज व विनियम ८, १२ आणि १३ अंतर्गत मुक्त प्रवेशासाठी करण्यात आलेले सर्व अर्ज या बाबींसह, हवी असलेली माहिती मागवू शकेलः

परंतु असे की, राज्य पारेषण कंपनी पारेषण यंत्रणा आराखडा तयार करताना या विनियमांनुसार देण्यात आलेली माहिती विचारात घेईल, परंतु अशी माहिती स्वीकारणे कंपनीवर बंधनकारक असणार नाहीः

परंतु आणखी असे की, राज्य पारेषण कंपनीने विनियम ६.४ च्या संदर्भात प्राप्त झालेल्या माहितीवर आधारित पारेषण यंत्रणा आराखड्यात बदल केल्यास, राज्य पारेषण कंपनी अशा बदलासाठीच्या लेखी कारणांची नोंद करील.

६.५ राज्य पारेषण कंपनी, या विनियमांखाली पारेषण यंत्रणा आराखडा तयार करण्याच्या प्रयोजनासाठी खालील बाबी देखील विचारात घेईलः-

(एक) अधिनियमाच्या कलम ७३ च्या खंड (ए) मधील तरतुदीनुसार, प्राधिकरणाने पारेषण यंत्रणेसाठी तयार केलेले आराखडे;

(दोन) केंद्रीय पारेषण कंपनीने तयार केलेल्या आराखडे;

(तीन) प्राधिकरणाचा इलेक्ट्रिक पॉवर सर्व्हे ऑफ इंडियाचा अहवाल;

(चार) अधिनियमाच्या कलम ७३ च्या खंड (डी) खाली प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केलेली ग्रिडची मानके;

(पाच) राज्यातील नूतनशील ऊर्जा प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण यांच्या, असल्यास, शिफारशी/माहिती.

(सहा) प्रांतीय विद्युत समित्यांच्या, असल्यास, शिफारशी/माहिती

(सात) महाराष्ट्र ग्रिड समन्वय समितिः आणि

(आठ) महाराष्ट्र राज्य विद्युत समिति.

६.६ राज्य पारेषण कंपनी, अधिनियमाच्या कलम ६४ च्या उप-कलम (१) अंतर्गत आयोगाकडे मान्यतेसाठी अर्ज सादर करताना अर्जासोबत, निश्चित करण्यात आलेल्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा योजना आणि पारेषण यंत्रणा आराखड्यात प्रस्तावित केलेल्या यंत्रणा बळकटीकरणाच्या योजनांवर आधारित, गुंतवणूक आराखडा देखील सादर करील.

६.७ जर राज्य पारेषण कंपनीच्या गुंतवणूक आराखड्यात निश्चित केलेल्या सर्व राज्यांतर्गत पारेषण योजना किंवा पारेषण यंत्रणा आराखड्यात समाविष्ट असलेल्या यंत्रणा बळकटीकरणाच्या योजनांचा अंतर्भाव नसेल तर, आयोग स्वेच्छानिर्णयाने, गुंतवणूक आराखड्यात समाविष्ट न केलेल्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी आदेश किंवा निर्देश देऊ शकेल, ज्यामध्ये खालीलपैकी कोणत्याही बाबीचा समावेश असू शकेलः-

(अ) अशी योजना राबविण्यासाठी अशा पारेषण क्षेत्रात स्थित असलेल्या दुसऱ्या कोणत्याही पारेषण परवानाधारकाला निमंत्रित करीलः किंवा

(ब) अशा योजना राबविण्यासाठी, आयोगाला स्वेच्छानिर्णयाने योग्य वाटतील अशा शर्तीवर नवीन पारेषण परवानाधारकांसाठी अर्ज मागवेल.

६.८ या विनियमांनुसार पारेषण यंत्रणा नियोजनासंबंधी हाती घेतलेल्या अभ्यासावरील खर्च, अधिनियमाच्या कलम ६२ च्या उप-कलम (१) च्या खंड (बी) अंतर्गत राज्य पारेषण कंपनीचे आकार निश्चित करताना त्यात समाविष्ट करण्यात येईल.

# भाग बी : जोडणीयता

## ७ जोडणीयतेला मंजुरी देणे

७.१ शक्यतो, ५ मेगावॅट आणि त्याहून अधिक विद्युत भार असलेला ग्राहक किंवा ५ मेगावॅट आणि त्याहून अधिक क्षमता असलेले निर्मिती केंद्र, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडणीयता घेण्यास पात्र राहील आणि या भागातील तरतुदींनुसार जोडणीयतेसाठी अर्ज करील.

परंतु आणखी असे की, राज्य पारेषण कंपनी, व्होल्टेजची पातळी आणि क्षमता कितीही असली तरी, अति उच्च दाबाच्या उप-केंद्रामधून निघालेल्या ग्राहकाधिष्ठित फिडरमार्फत अति उच्च दाबाच्या उप-केंद्राशी जोडलेल्या निर्मात्याला जोडणीयता मंजूर करील :

परंतु आणखी असे की, असे जोडणारे फिडर्स अधिनियमाच्या कलम २ (७२) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे अशा पारेषण वाहिन्यांचा एक भाग असतील.

७.२ राज्य पारेषण कंपनीने आखून द्यावयाच्या सविस्तर कार्यपद्धतीमध्ये विहित केलेल्या नमुन्यात अर्जदार जोडणीयतेसाठी राज्य पारेषण कंपनीकडे अर्ज सादर करील.

७.३ जोडणीयतेसाठीच्या अर्जासोबत विना परताव्याचे दोन लाख रुपयांचे शुल्क डिमांड ड्राफ्टने पाठविण्यात येईलः

परंतु असे की, नूतनशील ऊर्जेवर आधारित वीज निर्मिती प्रकल्पाने केलेल्या अर्जाच्या बाबतीत विना परताव्याचे शुल्क एक लाख रुपये राहील.

७.४ जोडणीयतेसाठीच्या अर्जात पुढील बाबींसंबंधात सविस्तर माहिती असेल, जसे की, अर्जदाराचे नियोजित भौगोलिक ठिकाण, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी आंतरबदल करावयाच्या विजेचे परिमाण म्हणजेच स्व-वापरासाठीच्या वीज निर्मिती प्रकल्पासह निर्मिती केंद्राने अंतःक्षेपण करावयाच्या विजेचे परिमाण व ग्राहकाने खेचावयाच्या विजेचे परिमाण आणि राज्य पारेषण कंपनीतर्फे सविस्तर कार्यपद्धतीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल असा अन्य तपशीलः

परंतु असे की, एकदा अर्ज दाखल करण्यात आल्यानंतर अर्जदाराच्या ठिकाणामध्ये कोणताही महत्त्वाचा बदल झालेला असेल किंवा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी आंतरबदल करावयाच्या विजेच्या परिमाणात १०% हून अधिक बदल झाला असल्यास, अर्जदाराला नवीन अर्ज करावा लागेल; ज्याचा विचार या विनियमांनुसार करण्यात येईल.

## ८. अर्जाची छाननी आणि राज्य पारेषण कंपनीला जोडणीयतेची मंजुरी

८.१ राज्य पारेषण कंपनी अर्ज प्राप्त झाल्यानंतर, वितरण परवानाधारकाच्या जाळ्याचा वापर करण्याची शक्यता असल्यास, त्या भागातील वितरण परवानाधारकासहित राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करणाऱ्या अन्य संस्थांशी विचारविनिमय करुन आणि समन्वय साधून, अर्जाची छाननी करील आणि वेळोवेळी सुधारणा केलेल्या, केंद्रीय विद्युत प्राधिकरण (ग्रिडच्या जोडीणीयतेची तांत्रिक मानके) विनियम, २००७ चे पालन करण्यासाठी आवश्यक आंतरजोडणी करील.

८.२ जोडणीयता मंजूर करताना, राज्य पारेषण कंपनी जेथे जोडणीयता मंजूर करावयाची आहे ते उप-केंद्र किंवा पुलिंग केंद्र किंवा स्वीच-यार्ड यांचे नाव विनिर्दिष्ट करेल. विद्यमान किंवा नियोजित वाहिनीच्या लुपिंग-इन आणि लुपिंग-आऊटने जोडणीयता मंजूर करावयाची असेल तर, राज्य पारेषण कंपनी जेथे जोडणीयता द्यावयाची असेल

ते जोडणीचे ठिकाण आणि वाहिनीचे नाव विनिर्दिष्ट करील. राज्य पारेषण कंपनी ग्राहकाधिष्ठित पारेषण वाहिनीच्या रचनेची ठळक वैशिष्ट्ये आणि ग्राहकाधिष्ठित पारेषण वाहिनी पूर्ण करण्यासाठीची कालमर्यादा निर्देशित करील :

परंतु असे की, राज्य पारेषण कंपनीने उभारावयाच्या ग्राहकाधिष्ठित पारेषण वाहिनीच्या टप्प्यांचे वेळापत्रक हे, निर्मिती सुविधा किंवा अर्जदारांच्या सुविधा यांच्या उभारणीस लागणाऱ्या वेळेशी सुसंगत असेल. परंतु आणखी असे की, राज्य पारेषण कंपनी अंतिम मुदतीचा दिनांक आणि निर्माता किंवा अर्जदाराने नंतर पालन करावयाच्या शर्ती निर्देशित करेल. जर निर्माता किंवा अर्जदार अंतिम मुदतीच्या दिनांकापूर्वी मान्य केलेल्या बाबींची पूर्तता करु शकत नसेल तर राज्य पारेषण कंपनी निर्माता किंवा अर्जदाराची प्रस्तावित जोडणीयता रद्द करील:

परंतु आणखी असेही की, ग्राहकाधिष्ठित पारेषण वाहिनी विकसित करण्यासाठी पुरेसा अवधी मिळेल अशा रीतीने, अर्जदार किंवा निर्मिती सुविधा जोडणीयतेसाठीचा अर्ज सादर करतील.

८.३ अर्जदार आणि राज्य पारेषण कंपनीसह सर्व राज्यांतर्गत पारेषण परवानाधारक केंद्रीय विद्युत प्राधिकरण (ग्रिडला जोडणीयतेसाठीची तांत्रिक मानके) विनियम, २००७ मधील तरतुदींचे पालन करतील.

८.४ अर्जदार, जेथे जोडणीयता मंजूर करण्यात येत असेल तेथील नोडल एजन्सीने निश्चित केलेल्या उप-केंद्र किंवा पुलिंग केंद्र किंवा स्वीच-यार्ड किंवा पारेषण वाहिनी यांचे मालक असलेल्या राज्यांतर्गत पारेषण परवानाधारकाशी, जोडणी करार करील:

परंतु असे की, राज्य पारेषण कंपनीव्यतिरिक्त, अन्य राज्यांतर्गत पारेषण परवानाधारकाच्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी स्व-वापरासाठीच्या वीज निर्मिती प्रकल्पासह वीज निर्मिती केंद्र किंवा ग्राहकाला जोडणीयता मंजूर करण्यात आली

असल्यास, अर्जदार, राज्य पारेषण कंपनी आणि असा राज्यांतर्गत पारेषण परवानाधारक यांच्यामध्ये केंद्रीय विद्युत प्राधिकरण (ग्रिडला जोडणीयतेची तांत्रिक मानके) विनियम, २००७ मधील तरतुदीनुसार एक त्रिपक्षीय करार करण्यात येईलः

परंतु आणखी असे की, राज्य भार प्रेषण केंद्राला देखील उपरोक्त जोडणी कराराची एक प्रत राज्य पारेषण कंपनी किंवा अन्य राज्यांतर्गत पारेषण परवानाधारक यांच्याकडून देण्यात येईल.

८.५ अर्जदाराने दीर्घ-कालीन प्रवेश, मध्यम-कालीन प्रवेश किंवा अल्प-कालीन मुक्त प्रवेश, जसे असेल तसे, प्राप्त केल्याशिवाय, अर्जदाराला जोडणीयतेच्या मंजुरीमुळे ग्रिडमध्ये विजेची कोणतीही आंतरबदल करण्याचा हक्क मिळणार नाही.

८.६ राज्यांतर्गत ग्रिडशी जोडणीयता मंजूर केलेल्या स्व-वापरासाठीच्या वीज निर्मिती प्रकल्पासह वीज निर्मिती केंद्रांना, त्यांची वीज वाणिज्यिक वापरासाठी देण्यास सुरूवात करण्यापूर्वी, तसेच कोणत्याही प्रकारचा मुक्त प्रवेश मिळवण्यापूर्वी, ग्रिडची सुरक्षितता लक्षात घेऊन संबंधित राज्य भार प्रेषण केंद्राकडून परवानगी मिळाल्यानंतर, ग्रिडमध्ये अनिश्चित विजेचे अंतःक्षेपण करुन पूर्ण भार चाचणीसह चाचणी करण्याची परवानगी देण्यात येईल. अ-पारंपरिक ऊर्जा स्रोतांवर आधारित वीज निर्मिती केंद्रांव्यतिरिक्त अन्य वीज निर्मिती केंद्र किंवा त्याचा संच, ज्यांच्या वीज दराचे निश्चितीकरण आयोगाद्वारे करण्यात येते, यांच्या अनिश्चित विजेच्या चाचणीचे आकार आणि वीज दराचे नियमन वेळोवेळी सुधारणा केलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ द्वारे करण्यात येईल. राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दर (एबीटी) प्रणालीखाली आयोगाने निश्चित केलेला असंतुलन दर किंवा वितरण परवानाधारकाच्या, ज्याला विजेची विक्री करण्याचा निर्मात्याचा उद्देश आहे, विद्यमान वीज दराच्या आदेशामध्ये आयोगाने

मान्यता दिलेल्या दीर्घ-कालीन वीज खरेदीचा सरासरी बदलता आकार, यांपैकी जो कमी असेल त्याप्रमाणे, अशा चाचणीमुळे अन्य वीज निर्मिती केंद्रांमधून ग्रिडला अंतःक्षेपण करण्यात आलेल्या विजेवर आकारण्यात येईलः

परंतु असे की, राज्य भार प्रेषण केंद्र आणि वितरण परवानाधारक यांची पूर्वपरवानगी प्राप्त करुन घेतल्यानंतर, स्व-वापरासाठीच्या निर्मिती प्रकल्पासह निर्मिती केंद्राच्या संचाला, ज्याला ग्रिडला जोडणीयता मंजूर करण्यात आली आहे, त्याची पहिल्या सिंन्क्रोनायझेशनच्या दिनांकापासून वाणिज्यिक कामकाजास सुरूवात करण्याच्या दिनांकापूर्वी, सहा महिन्यापेक्षा जास्त नसलेल्या कालावधीकरिता पूर्ण भार चाचणी करण्यासह चाचणीच्या काळात, ग्रिडमध्ये अनिश्चित विजेचे अंतःक्षेपण करण्यास परवानगी देण्यत येईलः

परंतु आणखी असे की, वीज निर्मिती कंपनीने अपवादात्मक परिस्थितीत सहा महिन्यांचा कालावधी पूर्ण होण्याच्या आत किमान दोन महिने आधी केलेल्या अर्जाबाबत, आयोग, संचाने पूर्ण भार चाचणीसह करावयाची चाचणी आणि त्यानंतर करावयाचे अनिश्चित विजेचे अंतःक्षेपण यांचा कालावधी सहा महिन्यांपेक्षा जास्त वाढविण्यास परवानगी देऊ शकेलः

परंतु आणखी असे की, वीज निर्मिती केंद्राच्या संचामधून अनिश्चित विजेचे अंतःक्षेपण, संचाची चाचणी आणि संच सुरू करण्याच्या प्रयोजनासाठी होत असल्याचे सिद्ध करण्याची जबाबदारी, वीज निर्मिती कंपनीवर राहील आणि वाणिज्यिक कामकाजास सुरूवात करण्यापूर्वी विजेचे अंतःक्षेपण करण्याच्या प्रत्येक वेळी राज्य भार प्रेषण केंद्र अशी माहिती मागेल. याकरिता, वीज निर्माता विशिष्ट चाचणी आणि संचाच्या कामास सुरूवात करण्याच्या कामाचा तपशील, त्याचा कालावधी आणि उद्देशित वीज अंतःक्षेपण इ. याबाबत राज्य भार प्रेषण केंद्राला पुरेशी माहिती देईलः

परंतु असे की, अनिश्चित विजेचे अंतःक्षेपण करण्यापूर्वी, स्व-वापराच्या निर्मिती प्रकल्पांसह वीज निर्मिती केंद्र वितरण परवानाधारकाशी अनिश्चित विजेचा पुरवठा करण्यासाठी करार करील. परंतु आणखी असे की, जर वीज निर्मात्याचा कोणत्याही परवानाधारकाशी विजेच्या विक्रीसाठी करार झालेला नसेल तर, ग्रिडमध्ये अंतःक्षेपण केलेल्या अनिश्चित विजेचा आकार शून्य करण्यात येईल आणि राज्यात कार्यरत असलेल्या राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दर पद्धतीच्या तरतुदी अंतर्गत ही अनिश्चित वीज वितरण परवानाधारकाच्या नावे जमा करण्यात येईल.

८.७ राज्य पारेषण कंपनी जोडणीयतेच्या मंजुरीबाबत किंवा अन्यथा आपला निर्णय अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून (पंचे-चाळीस) ४५ दिवसांच्या आत कळवेल. परंतु असे की, अर्जदाराला अर्ज नाकारण्याविरुद्ध निवेदन मांडण्याची संधी दिल्याशिवाय कोणताही अर्ज नाकारण्यात येणार नाहीः

परंतु आणखी असे की, अर्ज नाकारण्याच्या प्रकरणी, राज्य पारेषण कंपनी अर्जदाराला त्याबाबतची कारणे लेखी देईल. परंतु आणखी असेही की, जोडणीयतेकरिता मंजुरी मागण्याचा अर्ज नाकारल्यामुळे बाधित झालेला अर्जदार आयोगाकडे अभिवेदन सादर करु शकेलः

परंतु आणखी असे की, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी आधीच जोडलेल्या किंवा विद्यमान व्यवस्थेअंतर्गत आधीच जोडणीयता मंजूर झालेल्या, वीज निर्मात्याला किंवा ग्राहकाला त्याच क्षमतेसाठी जोडणीयतेकरिता अर्ज करण्याची आवश्यकता नसेलः

परंतु आणखी असे की, स्व-वापरासाठीच्या निर्मिती प्रकल्पासह वीज निर्मात्याच्या क्षमतेत वाढ झाली तर किंवा स्व-वापरासाठीच्या उपयोगकर्त्यासह ग्राहकाच्या विजेच्या गरजेमध्ये वाढ झाली तर, त्यांनी विनियमांतील तरतुदींनुसार जोडणीयता मागण्यासाठी नवीन अर्ज करणे आवश्यक राहील.

# भाग सीः मुक्त प्रवेशासाठी सर्वसाधारण तरतुदी

## ९. दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश किंवा मध्यम-कालीन मुक्त प्रवेश किंवा अल्प-कालीन मुक्त प्रवेश मंजुरीचे निकष

९.१ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत क्षमता उपलब्ध असेल तर, नोडल एजन्सी मुक्त प्रवेशासाठीचे अर्ज ‘प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य’ या तत्वावर विचारात घेईल.

९.२ एकाच दिवशी दोन किंवा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत प्रवेशासाठी कमी कालावधीच्या प्रवेशाच्या अर्जाऐवजी दीर्घ कालावधीच्या प्रवेशासाठीच्या अर्जाला अग्रक्रम देण्यात येईलः

परंतु असे की, एकाच दिवशी समान कालावधीसाठी दोन किंवा अधिक अर्ज प्राप्त झाले तर पारेषण क्षमता हक्काचे वाटप करण्यासाठी सर्व अर्ज समान पद्धतीने (parri passu) हाताळण्यात येतील आणि सर्व अर्जांना सामावून घेण्यासाठी पुरेशी क्षमता उपलब्ध नसेल तर अर्जदारांनी क्षमतेसाठी केलेल्या मागणीच्या प्रमाणात त्यांना उपलब्ध क्षमतेचे वाटप करण्यात येईल.

९.३ अर्ज प्राप्त झाल्यावर नोडल एजन्सी यंत्रणेचा अभ्यास करेल आणि खालील विनियम ११ मध्ये देण्यात आलेल्या काल-मर्यादेत अर्जदारास मुक्त प्रवेशाला परवानागी देता येणे शक्य होईल किंवा नाही याबाबत कळवेल.

९.४ दीर्घ-कालीन प्रवेशाचा अर्ज मंजूर करण्यापूर्वी, राज्य पारेषण कंपनी, सदर विनियमांच्या विनियम १२ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेची वाढ करण्याच्या आवश्यकतेसंबंधी यथोचित विचार करेल.

९.५ विद्यमान पारेषण यंत्रणेत किंवा उभारणीचे काम चालू असलेल्या पारेषण यंत्रणेत निर्माण होणारा विजेचा प्रवाह सामावून घेणे शक्य असेल तर, मध्यम-कालीन प्रवेश किंवा अल्प-कालीन मुक्त प्रवेश मंजूर करण्यात येईलः

परंतु असे की, केवळ मध्यम-कालीन प्रवेश किंवा अल्प-कालीन मुक्त प्रवेश मंजूर करण्याच्या प्रयोजनासाठी, पारेषण यंत्रणेत कोणतीही वाढ किंव्स रिकॉन्फिगुरेशन किंवा स्विचिंगची कामे करण्यात येणार नाहीतः

परंतु असे की, ग्राहकाधिष्ठित पारेषण वाहिनीची उभारणी ही या विनियमाच्या प्रयोजनासाठी पारेषण यंत्रणेतील वाढ म्हणून समजण्यात येणार नाहीः

परंतु आणखी असे की, यंत्रणा बळकटीकरणातून उत्पन्न झालेली क्षमता उपलब्ध होत नाही तोपर्यंत, या विनियमात उल्लेखल्याप्रमाणे कळविल्यामुळे, अर्जदाराला राज्यांतर्गत पारेषण यंत्रेणत कोणताही पारेषण क्षमता हक्क निर्माण झाला आहे, असे मानण्यात येणार नाहीः

परंतु आणखी असेही की, राज्य पारेषण कंपनी पारेषणाच्या बळकटीकरणाची आवश्यकता आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी आयोगाने वेळोवेळी मान्यता दिलेल्या निर्धारण पद्धतींचा उपयोग करील.

परंतु असेही की, निर्धारणाच्या अशा पद्धती, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचे स्थैर्य आणि योग्य प्रचालन, पारदर्शकता आणि राज्य ग्रिड संहितेच्या गरजा, विचारात घेतील.

९.६ पारेषण परवानाधारकाच्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रेणत प्रवेशासंबंधी, या विनियमांनुसार पारेषण क्षमता हक्कांचे वाटप करण्यात आलेल्या अर्जदाराचा दर्जा, वाटप करण्यात आलेल्या क्षमतेच्या मर्यादेपर्यंत आणि या विनियमात आणि राज्य ग्रिड संहितेत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मर्यादांच्या अधीन राहून, अन्य सर्व पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांशी समान राहील.

९.७ प्रत्येक पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता, त्याला पारेषण क्षमता हक्कांचे वाटप करण्याच्या वेळी, पारेषण परवानाधारकाच्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत प्रवेश आणि वापर करण्यासाठी, पारेषण परवानाधारकाबरोबर ठोक वीज पारेषण करार करील.

९.८ प्रत्येक पारेषण परवानाधारक, या विनियमांच्या अधिसूचनेपासून नव्वद (९०) दिवसांच्या आत, त्याच्या इंटरनेटच्या संकेत-स्थळावर, आवश्यक मार्गदर्शक सूचना, कार्यपद्धत आणि ठोक वीज पारेषण कराराचा नमुना प्रदर्शित करीलः

परंतु आणखी असे की, राज्य पारेषण कंपनीव्यतिरिक्त अन्य पारेषण परवानाधारकाच्या जाळ्यात मुक्त प्रवेशाची मागणी करणाऱ्या ग्राहकाच्या बाबतीत मुक्त प्रवेश ग्राहक, राज्य पारेषण कंपनी आणि असा अन्य पारेषण परवानाधारक यांच्यामध्ये त्रिपक्षीय करार करण्यात येईल.

९.९ ठोक वीज पारेषण करार करण्यापूर्वी, जोडणीयता स्थापन करण्यात आलेली आहे, याची नोडल एजन्सी खात्री करेल.

## भाग डी : अर्ज करण्याची कार्यपद्धत आणि मंजुरी

## १०. मुक्त प्रवेशाची वर्गवारी

१०.१ मुक्त प्रवेश वर्गवारी

मुक्त प्रवेश मागणाऱ्या पात्र ग्राहकाने अर्ज करावयाची कार्यपद्धत, अर्जाचे शुल्क आणि अर्जाच्या छाननीची कालमर्यादा, या बाबी खालील निकषांवर आधारित असतील:-

१०.१.१. आप-आपसात वीज खेचण्याची आणि वीज अंतःक्षेपण करण्याची ठिकाणे

(ए) राज्याच्या अंतर्गत पण वेगवेगळ्या वितरण यंत्रणेमध्ये

(बी) वेगवेगळ्या राज्यांमध्ये

१०.१.२. मुक्त प्रवेशाचा कालावधी

(ए) दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश

बारा (१२) वर्षांपेक्षा जास्त परंतु पंचवीस (२५) वर्षांपेक्षा जास्त नसलेल्या कालावधीसाठी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत प्रवेश मिळवणारी किंवा मिळवण्याचा उद्देश असणारी व्यक्ती, दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता असेलः

परंतु असे की, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या विद्यमान दीर्घ-कालीन लाभधारकाला विशिष्ट यंत्रणेचा दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता असेल;

(बी) मध्यम-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता

तीन (३) महिन्यापेक्षा जास्त परंतु, तीन (३) वर्षांपेक्षा जास्त नसलेल्या कालावधीसाठी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत प्रवेश मिळवणारी किंवा मिळवण्याचा उद्देश असणारी व्यक्ती, मध्यम-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता म्हणून मानण्यात येईल.

(सी) अल्प-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता

एक (१) महिन्यापेक्षा जास्त नसलेल्या कालावधीसाठी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत प्रवेश मिळवणारी किंवा मिळवण्याचा उद्देश असणारी व्यक्ती, अल्प-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता म्हणून मानण्यात येईलः

परंतु आणखी असे की, अल्प-कालीन आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्ता त्याच्या मुदतीच्या समाप्तीनंतर मुक्त प्रवेश मिळविण्यास पात्र आणि फेर-पात्र राहील.

## ११ मुक्त प्रवेशासाठी अर्जाची कार्यपद्धत

११.१ मुक्त प्रवेशासाठीचे सर्व अर्ज विहित नमुन्यात करण्यात येतील आणि ते या विनियमांनुसार नोडल एजन्सीकडे सादर करण्यात येतील.

११.२ नोडल एजन्सी, अर्जाचे शुल्क, अर्जासोबत जोडावयाचे दस्तावेज आणि अर्ज निकालात काढावयाची काल-मर्यादा, खालील तक्त्यात विनिर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणे राहीलः-

| पारेषण मुक्त प्रवेश मागणारा ग्राहक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र** | **कालावधी** | **आप-आपसात वीज खेचण्याचे (डॉअल) आणि अंतःक्षेपण (इंजेक्शन)करण्याचे ठिकाण** | **नोडल एजन्सी** | **अर्जाचे शुल्क (रुपये)** | **अर्जासोबत जोडावयाचे दस्तावेज** | **अर्जाची छाननी करण्याचा कालावधी (अर्ज प्राप्त झाल्या-पासूनच्या दिवसात)** |
| १ | अल्प-कालीन मुक्त प्रवेश | दोन्ही राज्याच्या अंतर्गत (राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये) | राज्य भार प्रेषण केंद्र | ७,५०० | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, निश्चित ऊर्जा कराराचा पुरावा, अर्जदार वितरण परवानाधारकाचा ग्राहक असल्यास वितरण परवानाधारकाची संमती आणि राज्य भार प्रेषण केंद्राने विहित केलेली कार्यपद्धत | • अ.का.मु.प्र साठी पहिला अर्ज असल्यास कामाच्या सात (७) दिवसात<br>• त्यानंतरच्या अ.का.मु.प्र अर्जासाठी कामाच्या तीन (३) दिवसात |
| २ | अल्प- | वीज अंतःक्षेपण करण्याचे/खेचण्याचे ठिकाण-राज्यातील | राज्य भार प्रेषण | ७,५०० | संबंधित वितरण परवानाधारकाकडून संमती, निश्चित ऊर्जा | • अ.का.मु.प्र साठी पहिला |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कालीन मुक्त प्रवेश | वितरण यंत्रणेमध्ये | केंद्र | | कराराचा पुरावा, अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा आणि राज्य भार प्रेषण केंद्राने विहित केलेली कार्यपद्धत | अर्ज असल्यास कामाच्या सात (७) दिवसात<br>● त्यानंतरच्या अ.का.मु.प्र अर्जासाठी कामाच्या तीन (३) दिवसात |
| ३ | अल्प-कालीन मुक्त प्रवेश | वीज अंतःक्षेपण करण्याचे/खेचण्याचे ठिकाण- वेगवेगळ्या राज्यांअध्ये | ग्राहक वास्तव्य करीत असलेल्या प्रदेशाचे प्रादेशिक भार प्रेषण केंद्र | ७.५०० | लागू असल्यास, संबंधित राज्य भार प्रेषण केंद्र आणि वितरण परवाधारकाची संमती, अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा आणि राज्य भार प्रेषण केंद्राने विहित केलेली कार्यपद्धत | केंद्रीय आयोगाच्या विनियमाप्रमाणे |
| ४ | अल्प-कालीन मुक्त प्रवेश | ग्राहकाने पॉवर एक्स्चेंजकडून वीज पुरवठा घेण्याचा पर्याय स्वीकारल्यास | राज्य भार प्रेषण केंद्र | ७,५०० | ग्राहक ज्या वितरण परवानाधारकाशी जोडलेला असेल त्या वितरण परवानाधारकाची संमती, अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा आणि राज्य भार प्रेषण केंद्राने विहित केलेली कार्यपद्धत | ● अ.का.मु.प्र साठी पहिला अर्ज असल्यास कामाच्या सात (७) दिवसात<br>● त्यानंतरच्या अ.का.मु.प्र अर्जासाठी कामाच्या तीन (३) दिवसात |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५. | मध्यम-कालीन मुक्त प्रवेश | दोन्ही राज्याच्या अंतर्गत (राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये) | राज्य पारेषण कंपनी | १००००० | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, वीज खरेदी करार किंवा विजेचा विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र किंवा ग्राहक जर यापूर्वीच ग्रिडला जोडलेला नसेल तर, म.का.मु.प्र देण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री पुरावा | २० |
| ६ | मध्यम-कालीन मुक्त प्रवेश | वीज अंतःक्षेपण करण्याचे/ खेचण्याचे ठिकाण-राज्यातील वितरण यंत्रणेमध्ये | राज्य पारेषण कंपनी | १००००० | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, वीज खरेदी करार किंवा विजेचा विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र किंवा ग्राहक जर यापूर्वीच ग्रीडला जोडलेला नसेल तर, म.का.मु.प्र देण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री पूरावा, संबंधित वितरण परवानाधारकाची संमती | २० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | मध्यम-कालीन मुक्त प्रवेश | वीज अंतःक्षेपण करण्याचे/खेचण्याचे ठिकाण- वेगवेगळ्या राज्यांमध्ये | केंद्रीय पारेषण कंपनी | १००००० | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, वीज खरेदी करार किंवा विजेचा विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र किंवा ग्राहक जर यापूर्वीच ग्रिडला जोडलेले नसेल तर, म.का.मु.प्र देण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री पूरावा, लागू असल्याप्रमाणे संबंधित राज्य भार प्रेषण केंद्र आणि वितरण परवानाधारकाकडून संमती | केंद्रीय आयोगाच्या विनियमाप्रमाणे |
| ८ | दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश | दोन्ही राज्याच्या अंतर्गत (राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये) | राज्य पारेषण कंपनी | २००००० | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, बँकेची हमी, वीज खरेदी करार किंवा विजेचा विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र किंवा ग्राहक जर यापूर्वीच ग्रिडला जोडलेला नसेल तर, दी.का. मु.प्र देण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री पुरावा, | • पारेषण यंत्रणेत वाढ करण्याची गरज नसल्यास - १२० दिवस<br>• पारेषण यंत्रणेत वाढ करण्याची गरज असल्यास - १५० दिवस |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश | वीज अंतःक्षेपण करण्याचे/ खेचण्याचे ठिकाण-राज्यातील वितरण यंत्रणेमध्ये | राज्य पारेषण कंपनी | २००००० | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, बँकेची हमी, वीज खरेदी करार किंवा विजेचा विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र किंवा ग्राहक जर यापूर्वीच ग्रिडला जोडलेला नसेल तर, दी.का.मु. प्र. देण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री पूरावा, संबंधीत वितरण परवानाधारकाची संमती | • पारेषण यंत्रणेत वाढ करण्याची गरज नसल्यास - १२० दिवस<br>• पारेषण यंत्रणेत वाढ करण्याची गरज असल्यास - १५० दिवस |
| १० | दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश | वीज अंतःक्षेपण करण्याचे/खेचण्याचे ठिकाण -वेगवेगळ्या राज्यांमध्ये | केंद्रीय पारेषण कंपनी | २००००० | अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा, बँकेची हमी, वीज खरेदी करार किंवा वीज विक्री-खरेदी करार, निर्मिती केंद्र किंवा ग्राहक जर यापूर्वीच ग्रिडला जोडलेला नसेल तर, दी.का.मु. प्र देण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी जोडणी देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल या बाबतचा कागदोपत्री पूरावा, लागू असल्याप्रमाणे संबंधित राज्य पारेषण कंपनी आणि वितरण परवानाधारकांकडून संमती | केंद्रीय आयोगाच्या विनियमाप्रमाणे |

परंतु असे की, राज्यांतर्गत पारेषण मुक्त प्रवेश मागणारा वितरण परवानाधारकाचा ग्राहक जर पारेषण यंत्रणेशी जोडलेला असेल तर त्या संबंधित वितरण परवानाधारकाकरिता आयोगाने ठरवून दिलेले परिचालन आकार किंवा अन्य कोणतेही आकार हे ग्राहकाकडून तो ज्या वितरण परवानाधारकाच्या परवाना क्षेत्रात स्थित असेल त्या परवानाधारकाला देय राहतील.

## १२. दीर्घ-कालीन मुक्त प्रवेशासाठी कार्यपद्धत

१२.१ **आंतर-राज्य पारेषण यंत्रणेचा समावेश असल्यास:**

विनियम १२.२ मध्ये खाली काहीही नमूद केले असले तरी, आंतर-राज्य दीर्घ-कालीन प्रवेशासाठी कार्यपद्धत ही वेळोवेळी सधारणा केलेल्या केंद्रीय विद्युत नियामक आयोग (जोडणीयता मंजूर करणे, आंतर-राज्य पारेषणामध्ये दीर्घ-कालीन प्रवेश आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश आणि संबंधित बाबी) विनियम, २००९ प्रमाणे राहील;

१२.२ **फक्त राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा समावेश असल्यास:**

वर नमूद केलेल्या विनियम १२.१ मधील तरतुदीच्या अधीन राहून, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमधील राज्यांतर्गत दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश खालील उप-खंड (ए) ते (एल) मधील तरतुदींना अनुसरुन असेल —

(ए) दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश मंजूर करण्यासाठीच्या अर्जामध्ये, ज्या विद्युत कंपनी किवा कंपन्यांना वीज पुरवठा करावयाचे किंवा ज्यांच्याकडून वीज प्राप्त करून घ्यावयाचे प्रस्तावित करण्यात आले असेल अशा कंपनी किंवा कंपन्यांची नावे, प्राप्त करुन घ्यावयाच्या विजेचे परिमाण आणि राज्य पारेषण कंपनीने सविस्तर कार्यपद्धतीमध्ये नमूद केलेला इतर तपशील, यांचा समावेश असेल. दीर्घ-

कालीन मुक्त प्रवेश/मध्यम-कालीन मुक्त प्रवेशासाठी सविस्तर कार्यपद्धतीमध्ये समाविष्ट करावयाचा नमुना अर्ज, जोडपत्र-२ मध्ये देण्यात आला आहे.

जर मुक्त-प्रवेश मंजूर करण्यासाठी पारेषण यंत्रणेत वाढ करण्याची आवश्यकता असेल तर आणि ज्या व्यक्तीला विजेचा पुरवठा करावयाचा आहे त्या व्यक्तीला पुरवठा करावयाच्या विजेचे परिमाण किंवा कोणत्या स्रोतातून वीज पुरवठा घ्यावयाचा आहे ते निश्चित करण्यात आलेले नसेल तर, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करून विजेच्या किती परिमाणाचे आंतरबदल करावयाचे असेल, ते परिमाण अर्जदार निर्देशित करील.

परंतु असेही की, वीज पुरवठ्याचा स्रोत किंवा वीज जोडणी घेण्याचे ठिकाण, जसे असेल तसे, निश्चित करावे लागेल आणि त्यानुसार ते नोडल एजन्सीला, दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश प्राप्त करून घेण्याच्या उद्देशित दिनांकाच्या कमीत कमी तीन (३) वर्षे आधी किंवा पारेषण यंत्रणेच्या वाढीकरिता राज्य पारेषण कंपनीने अंदाजित केलेला कालावधी, यापैकी जो कमी असेल त्यानुसार, अशी वाढ करणे सुलभ व्हावे यासाठी, कळविणे आवश्यक आहे;

परंतु आणखी असे की, अर्जदाराच्या ठिकाणात महत्वाचा बदल झाला असल्यास किंवा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करून विजेच्या आंतर-बदल करावयाच्या परिमाणात १० टक्यापेक्षा जास्त बदल झाला असल्यास, एक नवीन अर्ज करण्यात येईल आणि सदर अर्जाचा विचार या विनियमांनुसार करण्यात येईल.

(बी) नोडल एजन्सीला सर्व बाजुंनी विचार करुन राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचे नियोजन करणे शक्य व्हावे यासाठी, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करून विजेचे आंतरबदल करावयाचे परिमाण आणि विविध विद्युत कंपन्या किंवा

प्रदेशांकडे किंवा त्यांच्यापासून पारेषण करावयाच्या विजेचे निर्धारण, यांच्या आधारासह नोडल एजन्सी मागेल ती अन्य कोणतीही माहिती अर्जदार सादर करील.

परंतु असे की, या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही माहिती सादर न केल्याच्या कारणास्तव कोणताही अर्ज नाकारण्यात येणार नाही.

(सी) पारेषित करावयाच्या एकूण विजेच्या प्रति मेगावॅट रुपये १०,००० (रुपये दहा हजार) प्रमाणे बँक हमी अर्जासोबत पाठविण्यात येईल. सदर बँक हमी ही नोडल एजन्सीच्या नावे असेल आणि ती सविस्तर कार्यपद्धतीमध्ये घालून देण्यात आलेल्या रीतीनुसार असेल.

परंतु असे की, नूतनशील ऊर्जेवर आधारित व्यवहारांसाठी पारेषित करावयाच्या एकूण विजेच्या प्रती मेगावॅट रु. ५०००/- दराने बँकेची हमी राहील.

(डी) वरील विनियम १२.२ (सी) मध्ये देण्यात आल्याप्रमाणे बॅकेची हमी, जर पारेषण यंत्रणेमध्ये वाढ करण्याची गरज असेल तर ठोक वीज पारेषण करार होईपर्यंत आणि जर पारेषण यंत्रणेमध्ये वाढ करण्याची गरज नसेल तर दीर्घ-कालीन प्रवेश सुरू होईपर्यंत, वैध आणि अस्तित्वात राहील

(इ) अर्जदाराने जर अर्ज मागे घेतला तर किंवा जेव्हा वितरण यंत्रणेत वाढ करण्याची गरज नसेल तेव्हा दीर्घ-कालीन प्रवेशाचे हक्क, अस्तित्वात येण्यापूर्वी, सोडून देण्यात आले तर, नोडल एजन्सीकडून बँक हमीचे रोखीकरण करण्यात येईल.

(एफ) जेव्हा पारेषण यंत्रणेत वाढ करण्याची गरज असेल तेव्हा बांधकाम चालू असताना, सविस्तर कार्यपद्धतीमधील तरतुदींनुसार, अर्जदाराने राज्य पारेषण

कंपनीला जी बँक हमी सादर करावयाची गरज असते ती त्यांना सादर करण्यात आल्यानंतर, उपरोक्त बँक हमी मुक्त (डिस्चार्जड) होईल.

(जी) नोडल एजन्सी, अर्ज प्राप्त झाल्यानंतर, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या करावयाच्या वापरात समाविष्ट असणाऱ्या अन्य संस्थांशी विचार-विनिमय करून आणि त्यांच्याशी समन्वय साधून, अर्जाची छाननी करील आणि येथे वरील विनियम ११ च्या खंड २ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या काल-मर्यादेत दीर्घ-कालीन प्रवेश मंजूर करण्याचा निर्णय घेतला जाईल याची खात्री करण्यासाठी आवश्यक यंत्रणा अभ्यास शक्य तितक्या त्वरेने पूर्ण करेल;

(एच) वरील यंत्रणा अभ्यासाच्या आधारे, दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश देण्यासाठी कोणती राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा लागेल ते नोडल एजन्सी विनिर्दिष्ट करील. जर विद्यमान राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये वाढ करावयाची गरज असेल तर अर्जदाराला तसे कळविण्यात येईल.

(आय) दीर्घ-कालीन प्रवेश मंजूर करताना नोडल एजन्सी, ज्या दिनांकापासून दीर्घ-कालीन प्रवेश मंजूर करण्यात येईल तो दिनांक आणि आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या पारेषण आकारांच्या विभागणीच्या पद्धतीवर आणि विद्यमान खर्चाच्या आणि किंमतीवर आधारित देय होणारे अंदाजित पारेषण आकार, अर्जदाराला कळवील.

(जे) राज्य पारेषण कंपनीने जर दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश मंजूर केला तर, सविस्तर कार्यपद्धतीमध्ये करण्यात येतील अशा तरतूदींनुसार, अर्जदार दीर्घ-कालीन मुक्त प्रवेशासाठी राज्य पारेषण कंपनीबरोबर ठोक वीज पारेषण करार करील. राज्यांतर्गत पारेषण परवानाधारकाकडे दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश मागताना, अर्जदार राज्य पारेषण कंपनीव्यतिरिक्त, राज्य पारेषण कंपनी आणि

राज्यांतर्गत पारेषण परवानाधारक यांच्याबरोबर एक त्रिपक्षीय ठोक वीज पारेषण करार करील. ठोक वीज पारेषण करारात, दीर्घ-कालीन प्रवेशास सुरूवात झाल्याची तारीख, ग्रिडमध्ये वीज अंतःक्षेपण करण्याचे ठिकाण आणि ग्रिडमधून वीज खेचण्याचे ठिकाण आणि ग्राहकाधिष्ठित पारेषण वाहिन्यांचा, आवश्यक असल्यास, तपशील, अंतर्भूत असेल. पारेषण यंत्रणेमध्ये वाढ करण्याची गरज असल्यास, ठोक वीज पारेषण करारामध्ये, अर्जदार आणि पारेषण परवानाधारकांच्या सुविधांच्या बांधकामासाठीची काल-मर्यादा, अर्जदाराने सविस्तर कार्यपद्धतीनुसार द्यावयाची बँक हमी आणि अन्य तपशील या बाबींचा समावेश असेल.

(के) दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश मंजूर केल्यानंतर नोडल एजन्सी राज्य भार प्रेषण केंद्राला तसे ताबडतोब कळवील ज्यायोगे राज्य भार प्रेषण केंद्र या विनियमांखाली प्राप्त झालेल्या अल्प-कालीन मुक्त प्रवेश मंजुरीसाठीच्या अर्जांची छाननी करताना ही बाब विचारात घेऊ शकेल.

(एल) दीर्घ-कालीन मुक्त प्रवेशाच्या कालावधीची मुदत संपल्यानंतर, ग्राहकाने मुदत संपण्याच्या कमीत कमी सहा महिने आधी राज्य पारेषण कंपनीला लेखी विनंती करून त्यात किती कालावधीसाठी मुदत वाढ हवी असेल ते नमूद केल्यास त्याप्रमाणे मुदत वाढ देण्यात येईल :

परंतु असे की, वर विनिर्दिष्ट केलेल्या काल-मर्यादेत ग्राहकाकडून कोणतीही लेखी विनंती प्राप्त झाली नाही तर, सदर दीर्घ-कालीन प्रवेश, तो सुरूवातीला ज्या दिनांकापर्यंत मंजूर करण्यात आला असेल त्या दिनांकास समाप्त होईल.

## १३. मध्यम-कालीन मुक्त प्रवेशाची कार्यपद्धत

१३.१. **आंतर-राज्य पारेषण यंत्रणेचा समावेश असल्यासः**

खाली विनियम १३.२ मध्ये काहीही नमूद करण्यात आले असले तरी, आंतर-राज्य मध्यम-कालीन प्रवेशासाठी कार्यपद्धत ही, वेळोवेळी सुधारणा केलेल्या, केंद्रीय विद्युत नियामक आयोग (जोडणीयता मंजूर करणे, आंतर-राज्य पारेषणामध्ये दीर्घ-कालीन प्रवेश आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश आणि संबंधित बाबी) विनियम, २००९, प्रमाणे असेल :

परंतु असे की, वितरण यंत्रणेशी जोडलेल्या ग्राहकाला आंतर-राज्य मध्यम-कालीन मुक्त प्रवेश हवा असेल तर राज्य पारेषण कंपनी, या विनियमांच्या विनियम १५ नुसार, त्यांची संमती केंद्रीय आयोगाच्या विनियमांमध्ये आवश्यक असल्याप्रमाणे प्रादेशिक भार प्रेषण केंद्राला कळविण्यापूर्वी, ग्राहकाला संबंधित वितरण परवानाधारकाची संमती सादर करण्यास कळवील.

१३.२ **फक्त राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा समावेश असल्यास**

वर नमूद केलेल्या विनियम १३.१ मधील तरतुदीच्या अधीन राहून, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमधील राज्यांतर्गत मध्यम-कालीन मुक प्रवेश खालील उप-खंड (ए) ते (एफ) मधील तरतुदींना अनुसरुन असेल —

(ए) मध्यम-कालीन प्रवेशास मंजूर करण्यासाठीच्या अर्जात सविस्तर कार्यपद्धतीमध्ये नमूद केलेल्या तपशीलाचा आणि विशेषतः, ग्रिडमध्ये वीज अंतःक्षेपण करण्याचे ठिकाण, ग्रिडमधून वीज खेचण्याचे ठिकाण आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेशाच्या अर्जात मागितलेले विजेचे परिमाण, या बाबींचा समावेश असेल. मध्यम-कालीन मुक्त प्रवेशासाठी करावयाचा नमूना अर्ज जोडपत्र-२ मध्ये देण्यात आला आहे.

(बी) मध्यम-कालीन मुक्त प्रवेशाला सुरूवात झाल्याची तारीख ही ज्या महिन्यात अर्ज करण्यात आला असेल त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेपासून पाच (५) महिन्यांच्या आतील नसेल आणि एक (१) वर्षाच्या नंतरची नसेल.

उदाहरणार्थ, दिनांक १ जानेवारीला प्रारंभ होणाऱ्या मुक्त प्रवेशाच्या मंजुरीसाठीचा अर्ज मागील वर्षाच्या जुलै महिन्याच्या ३१ तारखेपर्यंत स्वीकारण्यात येईल. त्याचप्रमाणे, मुक्त प्रवेशाच्या मंजुरीसाठी मागील वर्षीच्या ३१ जुलै रोजी सादर करण्यात आला असल्यास तो पुढील वर्षाच्या १ ऑगस्टपासून प्रारंभ होणाऱ्या कालावधीसाठी नसेल.

(सी) अर्ज प्राप्त झाल्यानंतर, नोडल एजन्सी, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये सहभागी असलेल्या अन्य कंपन्यांशी विचार-विनीमय करून आणि समन्वय साधून, अर्जाची छाननी करेल आणि येथे वरील विनियम ११ च्या खंड २ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या काल-मर्यादेत मध्यम-कालीन प्रवेश मंजूर किंवा नामंजूर करण्याचा निर्णय घेतला जाईल याची खात्री करण्यासाठी आवश्यक यंत्रणा अभ्यास शक्य तितक्या त्वरेने पूर्ण करेल;

(डी) विनियम ११ च्या खंड (२) खाली विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या आवश्यकतांची पूर्तता करण्यात आल्याची खात्री झाल्यावर, नोडल एजन्सी अर्जात नमूद केलेल्या कालावधीसाठी मध्यम-कालीन मुक्त प्रवेशांला मंजुरी देईल :

परंतु असे की, लेखी नोंदवावयाच्या कारणांसाठी, नोडल एजन्सी अर्जदाराने मागितलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीसाठी मध्यम-कालीन मुक्त प्रवेश मंजूर करु शकेल.

परंतु आणखी असे की, सविस्तर कार्यपद्धतीमधील अशा तरतुदींनुसार, अर्जदार मध्यम-कालीन मुक्त प्रवेशासाठी राज्य पारेषण कंपनीबरोबर ठोक

वीज पारेषण करार करील. राज्य पारेषण कंपनीव्यतिरिक्त, राज्यांतर्गत पारेषण परवानाधारकाकडे मध्यम-कालीन प्रवेश मागताना, अर्जदार राज्य पारेषण कंपनी आणि राज्यांतर्गत पारेषण परवानाधारक यांच्याबरोबर एक त्रिपक्षीय मध्यम-कालीन प्रवेश करार करेल. मध्यम-कालीन मुक्त प्रवेशांसाठीच्या करारात मध्यम-कालीन मुक्त प्रवेशास सुरूवात झाल्याची व समाप्तीची तारीख , ग्रिडमध्ये वीज अंतःक्षेपण करण्याचे ठिकाण आणि ग्रिडमधून वीज खेचण्याचे ठिकाण आणि आवश्यक असल्यास ग्राहकाधिष्ठित पारेषण वाहिन्यांचा तपशील, अर्जदाराने सविस्तर कार्यपद्धतीनुसार द्यावयाची बँक हमी आणि अन्य तपशील यांचा समावेश असेल.

(इ) मध्यम-कालीन प्रवेश मंजूर केल्यानंतर, नोडल एजन्सी राज्य भार प्रेषण केंद्राला तसे ताबडतोब कळवेल ज्यायोगे राज्य भार प्रेषण केंद्र या विनियमांखाली प्राप्त झालेल्या अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठीच्या मागण्यांची छाननी करताना ही बाब विचारात घेऊ शकेल.

(एफ) मध्यम-कालीन प्रवेशाच्या कालावधीची मुदत संपल्यानंतर, मध्यम-कालीन ग्राहकास मुदतीचे नूतनीकरण करण्यासाठी सर्वाधिक प्राधान्य मिळण्याचा हक्क नसेल.

## १४. अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठी कार्यपद्धत

१४.१ **आंतर-राज्य पारेषण यंत्रणेचा समावेश असल्यास:**

खाली विनियम १४.१ मध्ये काहीही नमूद करण्यात आले असले तरी, आंतर-राज्य अल्प-कालीन प्रवेशासाठी कार्यपद्धत ही, वेळोवेळी सुधारणा केलेल्या, केंद्रीय विद्युत नियामक आयोग ( आंतर-राज्य पारेषणात मुक्त प्रवेश) विनियम, २००८ प्रमाणे असेल;

परंतु असे की, वितरण यंत्रणेशी जोडलेल्या ग्राहकाला आंतर-राज्य अल्प-कालीन प्रवेश हवा असेल तर राज्य भार प्रेषण केंद्र, केंद्रीय आयोगाच्या विनियमांमध्ये आवश्यक असल्याप्रमाणे, त्यांची संमती प्रादेशिक भार प्रेषण केंद्राला कळविण्यापूर्वी, या विनियमांच्या विनियम १५ नुसार, ग्राहकाला संबंधित वितरण परवानाधारकाची संमती सादर करण्यास कळवील.

१४.२ **फक्त राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा समावेश असल्यासः**

वर नमूद केलेल्या विनियम १४.१ मधील तरतुदींच्या अधीन राहून, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमधील अल्प-कालीन मुक्त प्रवेश खालील पुढील उप-खंड १४.२.१ ते १४.२.६ मधील तरतुदींना अनुसरून असेलः

१४.२.१ <u>आगाऊ मुक्त प्रवेश</u>

(एक) नोडल एजन्सीकडे अल्प-कालीन मुक्त प्रवेश चवथ्या महिन्यापर्यंत मिळण्यासाठी अर्ज सादर करता येईल; असे करताना ज्या महिन्यात अर्ज करण्यात येत असेल तो महिना पहिला महिना म्हणून विचारात घेण्यात येईल;

(दोन) प्रत्येक महिन्यासाठी आणि महिन्यातील प्रत्येक व्यवहारासाठी वेगळा अर्ज करण्यात येईल;

(तीन) जोडपत्र-१ मध्ये (नमुना अल्प-कालीन-१) विहित केलेल्या नमुन्यामध्ये, हवी असलेली क्षमता, नियोजन केलेली निर्मिती किंवा करारबद्ध केलेली वीज खरेदी, विजेचे अंतःक्षेपण करण्याचे ठिकाण, वीज खेचण्याचे ठिकाण, मुक्त प्रवेश मागणीचा कालावधी, सर्वोच्च मागणी, सरासरी मागणी, अशी सविस्तर माहिती आणि नोडल एजन्सीला लागू शकणारी अन्य अतिरिक्त माहिती असलेला अर्ज नोडल एजन्सीकडे करण्यात येईल. अर्जासोबत नोडल एजन्सीने अधिसूचित केलेल्या अधिकाऱ्याच्या नावे परत न करता येण्याजोगे अर्ज शुल्क रोखीने किंवा डिमांड ड्राफ्टद्वारा पाठविण्यात येईल;

(चार) कोणत्याही महिन्यातील मुक्त प्रवेशांच्या मंजुरीसाठीचा अर्ज एका पाकिटावर 'अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठी आगाऊ-अर्ज' असे लिहून मागील महिन्याच्या १५व्या दिवसापर्यंत सादर करण्यात येईल;

उदाहरणार्थ, जुलै महिन्यात मुक्त प्रवेश हवा असल्यास मुक्त प्रवेश मंजुरीसाठीचा अर्ज जून महिन्याच्या १५व्या दिवसापर्यंत स्वीकारण्यात येईल;

(पाच) वरील खंड (चार) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकानंतर दुसऱ्या महिन्यासाठीच्या अल्प-कालिन मुक्त प्रवेशाच्या मंजुरीसाठी प्राप्त झालेले अर्ज आणि अल्प-कालिन मुक्त प्रवेशाच्या मंजुरीसाठी पहिल्या महिन्यात प्राप्त झालेले अर्ज "प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य" या तत्वावर विचारात घेण्यात येतील आणि अशा व्यवहारांचे काल-मापन निर्धारण (शेड्युलिंग) आवश्यक असलेल्या पारेषण क्षमतेच्या उपलब्धततेच्या अधीन राहून करण्यात येईल;

परंतु असे की, असे अर्ज द्विपक्षीय व्यवहाराच्या दिनांकाच्या किमान चार (४) दिवस आधी नोडल एजन्सीला प्राप्त झाले पाहिजेतः

परंतु असे की, प्रत्येक व्यवहारासाठी स्वतंत्र अर्ज करण्यात येईल;

(सहा) नोडल एजन्सी अर्ज प्राप्त झाल्याची 'पोच-पावती' अर्जदाराला देताना त्यात वेळ आणि दिनांक नमूद करेल;

(सात) मुक्त प्रवेश हवा असणारा वितरण परवानाधारकाचा ग्राहक, तो ज्या वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात येत असेल त्या वितरण परवानाधारकाला त्याच्या अर्जाची प्रत देईल;

(आठ) व्यवहार कोणत्या प्रकारचा आहे त्यावर आधारित, नोडल एजन्सी अल्प कालीन मुक्त प्रवेशासाठी आलेल्या अर्जांवर, खाली नमूद केलेल्या रीतीने निर्णय घेईल;

(नऊ) वरील उप-उप-खंड (चार) अंतर्गत प्राप्त झालेले सर्व अर्ज, एकत्रितपणे विचारात घेण्यात येतील आणि या विनियमांच्या विनियम १७ खाली विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या वाटपासाठीच्या प्राधान्य निकषांप्रमाणे त्यावर कार्यवाही करण्यात येईल.

(दहा) व्यवहारांमध्ये सहभाग असलेल्या पारेषण आणि वितरण यंत्रणेच्या कोणत्याही भागावर (वाहिनी आणि रोहित्रावर) पडणा-या अतिभार (कंजेस्शन) नोडल एजन्सी व्यवहाराची तपासणी करताना विचारात घेईल.

(अकरा) नोडल एजन्सी ग्राहकाने अदा करावयाच्या रकमांच्या वेळापत्रकासह मुक्त प्रवेशाची मंजुरी किंवा अन्यथा नमुन्यामध्ये (नमुना-अल्प-कालीन-२) उशीरात उशीरा मागील महिन्याच्या १९ तारखेपूर्वी कळवील.

(बारा) जर मुक्त प्रवेश वरील उप-खंड (अकरा) खाली नाकारण्यात आला असेल तर नोडल एजन्सी त्याबाबतची विशिष्ट कारणे कळवील:

परंतु असे की, अर्जदाराला अभिवेदन देण्याची संधी दिल्याशिवाय मुक्त प्रवेश नाकारण्यात येणार नाही:

परंतु आणखी असे की, मुक्त प्रवेश नाकारण्याबाबतचा कोणताही वादाचा अभिनिर्णयासाठी आयोगाकडे संदर्भ करण्यात येईल.

१४.२.२. <u>डे-अहेड मुक्त प्रवेश</u>

राज्यांतर्गत पारेषण परवानाधारकाच्या यंत्रणेमध्ये शिल्लक क्षमता उपलब्ध असेल, जी पूर्णपणे किंवा अंशतः स्पष्टपणे परत करण्यात आलेली असेल किंवा जी यापूर्वी तीन दिवसांपेक्षा अधिक काळ वापरात नसेल तर, डे-अहेड व्यवहारांना परवानगी देण्यात येईल.

(एक) डे-अहेड मुक्त प्रवेशाच्या मंजूरीसाठीचा अर्ज, नोडल एजन्सीकडून शेड्युलिंगच्या दिनांकाच्या फक्त एक दिवस आधी, डे-अहेड व्यवहारांसाठीच्या

शेड्युलिंगच्या दिवसाच्या लगतच्या आधीच्या दिवसाच्या १३.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येईल.

परंतु असे की, १३.०० वाजल्यानंतर प्राप्त झालेला कोणताही अर्ज, तो जर शेड्युलिंगच्या दिवशी प्राप्त झाला असेल तर, डे-अहेड किंवा त्याच दिव्शी आकस्मिकता तत्त्वावर विचारात घेण्यात येईल आणि अशा आकस्मिकता अर्जांसाठी प्रकिया शुल्क हे लागू असलेल्या अर्ज प्रक्रिया शुल्काच्या पाच पट राहील.

उदाहरणार्थ, २५ जुलै रोजीच्या डे-अहेड व्यवहाराकरिता अर्ज फक्त जुलै महिन्याच्या २४व्या दिवशी आणि त्या दिवसाच्या १३.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येईल.

(दोन) नोडल एजन्सी अति-भाराची (कंजेस्शन) तपासणी करील आणि वरील खंड १४.२.१ च्या उप-उप-खंड (अकरा) मध्ये देण्यात आल्याप्रमाणे जोडपत्र १ ( नमुना- अल्प-कालीन २) मधील नमुन्यामध्ये मंजूरी किंवा अन्यथा १४.०० वाजेपर्यंत कळवील. अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठीच्या अर्जाच्या अन्य सर्व तरतुदी लागू राहतील.

(तीन) नोडल एजन्सीने वरील उप-खंड (दोन) च्या संदर्भात जर परवानगी दिली नाही तर, नोडल एजन्सी त्यासाठी लेखी कारणे देईल.

परंतु असे की, अर्जदाराला अभिवेदन करण्याची संधी न देता मुक्त प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

परंतु आणखी असे की, मुक्त प्रवेश नाकारण्याबाबतचा कोणताही वाद आयोगाकडे अभिनिर्णयासाठी संदर्भ करता येईल.

## १४.२.३. <u>बोलीसाठीची कार्यपद्धती</u>

(एक) ग्राहकाने पुढील महिन्यासाठी आगाऊ मुक्त प्रवेशाकरिता माग़णी केलेली क्षमता उपलब्ध क्षमतेपेक्षा जास्त असेल किंवा राज्य भार प्रेषण केंद्राला विजेच्या व्यवहारामध्ये सहभागी असलेल्या पारेषण आणि वितरण यंत्रणेच्या कोणत्याही भागावर अतिभार येण्याची शक्यता वाटल्यास, क्षमतेचे वाटप इलेक्ट्रॉनिक बोली कार्यपद्धतीद्वारे करण्यात येईल.

(दोन) अपेक्षित अतिभाराच्या संदर्भात राज्य भार प्रेषण केंद्राचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक राहील.

(तीन) राज्य भार प्रेषण केंद्र, अतिभाराबाबतची माहिती आणि जोडपत्र १ (नमुना-अल्प-कालीन ३) च्या नमुन्यामध्ये किमान किंमतीचा निर्देश करून बोली प्रक्रियेसाठी आमंत्रण पाठविण्याचा निर्णय, कळवील.

(चार) राज्य भार प्रेषण केंद्र बोलीबाबतची माहिती त्याच्या संकेत-स्थळावर देखील प्रदर्शित करील.

(पाच) आयोगाच्या संबंधित आदेशाच्या आधारे निश्चित करण्यात आलेली पारेषण आणि वहन आकारांची किमान किंमत जोडपत्र१ (नमुना--अल्प-कालीन-३)च्या नमुन्यात नमूद करण्यात येईल.

(सहा) जोडपत्र १ (नमुना--अल्प-कालीन ३) च्या बोलीसाठीच्या आमंत्रणात नमूद करण्यात आलेल्या ‘ बोली स्वीकारण्याच्या समाप्तीच्या वेळे’ पर्यंत जोडपत्र १ (नमुना--अल्प-कालीन ४) च्या नमुन्यात देण्यात आलेल्या बोली स्वीकारण्यात येतील. बोली एवदा सादर केल्यानंतर त्यामध्ये फेर-बदल/सुधारणा करता येणार नाही.

(सात) एखादा ग्राहक जर बोली प्रक्रियेत सहभागी झाला नाही, तर त्याचा अर्ज मागे घेण्यात आला आहे असे मानण्यात येईल आणि त्यावर पुढील प्रक्रिया करण्यात येणार नाही.

(आठ) राज्य भार प्रेषण केंद्राकडून बोली सादर करण्याची वेळ/तारीख वाढविण्यासाठी करण्यात आलेली कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

(नऊ) ज्या परिमाणात (डिनॉमिनेशन) किमान किंमत निश्चित करण्यात आली असेल त्याच परिमाणात, बोलीदार त्यांची किंमत (पूर्णांकात) नमूद करील.

(दहा) नमूद करण्यात आलेली किंमत उतरत्या क्रमाने मांडण्यात येईल आणि उपलब्ध क्षमतेचे वाटप, उपलब्ध क्षमता संपेपर्यंत, अशा उतरत्या क्रमाने करण्यात येईल.

(अकरा) दोन किंवा अधिक ग्राहकांनी एकच किंमत नमूद केली असल्यास, वरील उप-खंड (दहा)खाली कोणत्याही टप्प्यावर उर्वरित उपलब्ध क्षमतांचे वाटप अशा ग्राहकांनी मागितलेल्या क्षमतेच्या यथा-प्रमाणात करण्यात येईल.

(बारा) ज्या ग्राहकांना पूर्ण क्षमतेचे वाटप करण्यात आले आहे ते सर्व ग्राहक, बोलीमध्ये मिळालेली उच्चतम किंमत अदा करतील.

(तेरा) ज्या ग्राहकांना कमी क्षमतेचे वाटप करण्यात आले आहे ते, बोलीमध्ये त्यांनी नमूद केलेली किंमत अदा करतील.

(चौदा) ज्या बोली कोणत्याही प्रकारे अपूर्ण, अस्पष्ट किंवा बोलीच्या कार्यपद्धतीस अनुसरून नसल्याचे आढळून येतील त्या बोली राज्य भार प्रेषण केंद्राकडून नाकारण्यात येतील.

(पंधरा) यशस्वी बोलीदार, ज्याला क्षमतांचे वाटप करण्यात आले आहे, या खंडाच्या उप-उप खंड (बारा) किंवा (तेरा) खाली बोली प्रक्रियेतून निश्चित करण्यात आलेले पारेषण आकार, वहान आकार, जसे असेल तसे, अदा करील.

१४.२.४. अल्प-कालीन मुक्त प्रवेश ग्राहकाची राखीव क्षमता इतरांना हस्तांतरीत करता येणार नाही.

१४.२.५. राज्य भार प्रेषण केंद्राकडून राखीव क्षमता परत किंवा कपात किंवा रद्द करण्यात आल्यामुळे उपलब्ध झालेली क्षमता, या विनियमांनुसार अन्य कोणत्याही अल्प-कालीन मुक्त प्रवेश ग्राहकाकरिता राखीव ठेवता येईल.

१४.२.६. अल्प-कालीन मुक्त प्रवेशाच्या कालावधीच्या समाप्तीनंतर, अल्प-कालीन ग्राहकास मुदतीचे नुतनीकरण करण्यासाठी कोणतेही सर्वाधिक प्राधान्य मिळण्याचा हक्क नसेल.

## १५. राज्य पारेषण कंपनी, राज्य भार प्रेषण केंद्र किंवा वितरण परवानाधारकाची संअती

### १५.१ आंतर-राज्य मु प्रवेशः

राज्य पारेषण कंपनी दीर्घ-कालीन आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेशाच्या अर्जाच्या मंजूरीबाबत आणि राज्य भार प्रेषण केंद्र अल्प-कालीन मुक्त प्रवेशाच्या मंजूरीबाबत त्याची संमती अथवा अन्यथा अनुक्रमे वेळोवेळी सुधारणा केलेल्या केंद्रीय विद्युत नियामक आयोग (जोडणीयता मंजूर करणे, आंतर-राज्य पारेषणात दीर्घ-कालीन प्रवेश आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश आणि संबंधित बाबी) विनियम, २००९ आणि केंद्रीय विद्युत नियामक आयोग (आंतर-राज्य पारेषणात प्रवेश) विनियम, २००८ किंवा त्यांच्या वैधानिक फेर-कायद्यां प्रमाणे, कळवील. अर्जदार वितरण परवानाधारकाचा ग्राहक असल्यास, सदर वितरण परवानाधारक विनियम १५.२ (ए)(एक) आणि (दोन) मध्ये उल्लेख केलेल्या बाबींवर त्याची संमती अथवा नकार खालील काल-मर्यादेत कळवील.

(एक) अल्प-कालिन मुक्त प्रवेशांच्या बाबतीत, अर्जदाराची विनंती प्राप्त झाल्यापासून कामाच्या सात (७) दिवसांच्या आत

(दोन) मध्यम-कालिन आणि दीर्घ-कालिन मुक्त प्रवेशांच्या बाबतीत, अर्जदाराची विनंती प्राप्त झाल्यापासून कामाच्या दहा (१०) दिवसांच्या आत

१५.२ **राज्यांतर्गत मुक्त प्रवेश :**

(ए) मुक्त प्रवेशाच्या मंजुरीसाठी आलेल्या अर्जाची छाननी करताना, नोडल एजन्सी खालील बाबींची पडताळणी करील : —

(एक) अंमलात असलेल्या राज्य ग्रिड संहितेमधील तरतुदींनुसार काल-गट-निहाय ऊर्जेचे मीटरींग करण्यासाठी आणि हिशोब ठेवण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा अस्तित्वात असणे;

(दोन) राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये क्षमतेची उपलब्धता;

(तीन) वीज खरेदीच्या दराचा उल्लेख असलेली वीज खरेदी कराराची/ऊर्जा खरेदी कराराची प्रत;

(चार) विक्रेता/खरेदीदाराची, जसे असेल तसे, मान्यता;

(पाच) संबंधित वितरण परवानाधारक/परवानाधारकांची वितरण मुक्त प्रवेशासाठी मान्यता;

(सहा) वीज निर्मात्याच्या बाबतीत, राज्य भार प्रेषण केंद्रात रिअल-टाईम दर्शनक्षमता (व्हिजिबिलिटी); आणि

(सात) वीज निर्मात्याच्या बाबतीत, शेड्युलिंग/मुक्त प्रवेशास सुरूवात होण्यापूर्वीचा वाणिज्यिक कामकाजाचा दिनांक.

(बी) आवश्यक पायाभूत सुविधांची उपलब्धता आणि राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये क्षमतेची उपलब्धता असल्याचे सिद्ध झाल्यानंतर, नोडल एजन्सी त्याची संमती अर्जदाराला, अर्ज प्राप्त झाल्यापासून कामाच्या तीन (३) दिवसांत ई-मेल अथवा फॅक्स द्वारे अथवा संदेशवहनाच्या मान्यताप्राप्त नेहमीच्या अन्य कोणत्याही साधनाद्वारे, अर्जदाराला कळविण्यात येईल.

(सी) संमतीसाठी आलेला अर्ज कोणत्याही बाबतीत अपूर्ण अथवा सदोष असल्याचे नोडल एजन्सीच्या निदर्शनास आल्यास अर्ज प्राप्त झाल्यापासून कामाच्या दोन (२) दिवसांच्या आत नोडल एजन्सी सदर उणीव अथवा दोष अर्जदाराला ई-मेल अथवा फॅक्सद्वारे अथवा संदेशवहनाच्या मान्यताप्राप्त नेहमीच्या अन्य कोणत्याही साधनाद्वारे, अर्जदाराला कळविण्यात येईल.

(डी) अर्ज योग्य असल्याचे आढळून आल्यावर, नोडल एजन्सीने आवश्यक पायाभूत सुविधा नसल्याच्या कारणास्तव किंवा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये शिल्लक क्षमता उपलब्ध नसल्यामुळे संमती देण्याचे नाकारले तर असा नकार, त्याबाबतच्या कारणांसह, अर्ज प्राप्त झाल्यापासून कामाच्या तीन (३) दिवसांच्या आत अर्जदाराला ई-मेल अथवा फॅक्सद्वारे अथवा संदेशवहनाच्या मान्यताप्राप्त नेहमीच्या अन्य कोणत्याही साधनाद्वारे, कळविण्यात येईल.

(इ) अर्जदार जर वितरण परवानाधारकाचा ग्राहक असेल तर सदर वितरण परवानाधारक विनियम १५.२ (ए) (एक) आणि (दोन) मध्ये उल्लेख केलेल्या बाबींवर त्याची संमती अथवा नकार खालील कालमर्यादेत कळवील.

(एक) अल्प-कालिन मुक्त प्रवेशांच्या बाबतीत अर्जदाराची विनंती प्राप्त झाल्यापासून कामाच्या सात (७) दिवसांच्या आत;

(दोन) मध्यम-कालिन आणि दीर्घ-कालिन मुक्त प्रवेशांच्या बाबतीत अर्जदाराची विनंती प्राप्त झाल्यापासून कामाच्या दहा (१०) दिवसांच्या आत.

## १६ थकबाकीदारांकडून आलेल्या अर्जांचा विचार

१६.१ या विनियमांमध्ये काहीही नमूद करण्यात आले असले तरी, या विनियमांतील तरतुदींचे, विशेष करून यातील वसुली योग्य आकारांचा भरणा वेळेत करण्यासंबंधातील तरतुदींचे, पालन न करण्याच्या कारणात्सव नोडल एजन्सीला

मुक्त प्रवेशासाठी आलेला अर्ज, अशा कारणांची लेखी नोंद करून, नाकारण्याचे स्वातंत्र्य राहील.

परंतु असे की, अर्जदाराला त्याची बाजू मांडण्याची संधी दिल्याशिवाय कोणताही अर्ज नाकारण्यात येणार नाही.

परंतु असे की, जेव्हा अर्ज नाकारण्यात येईल तेव्हा, त्याची कारणे नकाराच्या पत्रामध्ये नमूद करण्यात येतील आणि अर्जदाराला लेखी कळविण्यात येतील.

१६.२ वरील विनियम १६.१ अंतर्गत अर्ज नाकारण्यात आल्यास, अर्जदार सुधारित अर्ज सादर करू शकेल.

परंतु असे की, अर्जदाराने सादर करावयाचा असा सुधारित अर्ज या विनियमांच्या विनियम ११ मध्ये व्याख्या केल्यानुसार उचित आकार आणि शुल्कासोबत पाठविण्यात येईल आणि असा अर्ज नवीन अर्ज म्हणून विचारात घेण्यात येईल.

## १७ वाटप करण्यासाठी प्राधान्य

१७.१ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमधील मुक्त प्रवेशाच्या वाटपास खालील निकषांनुसार प्राधान्य देण्यात येईल :

(ए) मुक्त प्रवेशासाठी आलेला अर्ज दीर्घ-कालीन, मध्यम-कालीन अथवा अल्प-कालीन प्रवेशासाठी असला तरी वितरण परवानाधारकाला मुक्त प्रवेश क्षमतेचे वाटप करण्यास उच्चतम प्राधान्य राहील.

(बी) वितरण परवानाधारकांनंतर, दीर्घ-कालीन मुक्त प्रवेशाच्या अर्जदारांना प्राधान्य राहील.

(सी) दीर्घ-कालीन मुक्त प्रवेशाच्या अर्जदारांनंतर, मध्यम-कालीन मुक्त प्रवेशाच्या अर्जदारांना प्राधान्य राहील.

(डी) मध्यम-कालीन प्रवेशाच्या अर्जदारांनंतर, अल्प-कालीन मुक्त प्रवेशाच्या अर्जदारांना प्राधान्य राहील.

(इ) अल्प-कालीन मुक्त प्रवेश अर्जदारांना, क्षमतेच्या उपलब्धतेस अधीन राहून वाटपासाठी प्राधान्य राहील.

(एफ) जर अर्जदाराची संभाव्य गरज उपलब्ध क्षमतेपेक्षा जास्त असेल आणि असा ग्राहक त्याची गरज उपलब्ध क्षमतेच्या मर्यादेत ठेवू शकत नसेल तर, त्याच्यापेक्षा कमी प्राधान्य असलेल्या अर्जदाराची मागणी विचारात घेण्यात येईल.

## भाग इ : मुक्त प्रवेशासाठी आकार

### १८ पारेषण आकार

पारेषण यंत्रणेचा वापर करणारा मुक्त प्रवेश ग्राहक खाली नमूद केल्यानुसार आकार अदा करेल :-

१८.१ आंतर-राज्य पारेषण यंत्रणेच्या वापरासाठी - केंद्रीय आयोगाने वेळोवेळी ठरवून दिल्याप्रमाणे.

१८.२ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या वापरासाठी - मुक्त प्रवेश ग्राहकाने राज्य पारेषण कंपनी/पारेषण परवानाधारक यांच्या यंत्रणांच्या केलेल्या वापरासाठी त्यांना द्यावयाचे पारेषण आकार वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या वीज दराच्या विनियमांनुसार निश्चित करण्यात येतील.

परंतु असे की, नोडल एजन्सीला देय पारेषण आकार खालीलप्रमाणे राहतील :

(एक) अल्प-कालिन मुक्त प्रवेशांच्या बाबतीत प्रत्यक्ष वीज प्रवाहाच्या आधारावर आकार देय राहतील.

(दोन) मध्यम-कालिन आणि दीर्घ-कालिन मुक्त प्रवेशाच्या बाबतीत मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आलेल्या क्षमतेच्या आधारावर आकार देय राहतील.

परंतु आणखी असे की, मध्यम-कालिन मुक्त प्रवेशासाठीचा आकार दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश आकारा इतका असेल आणि हा आकार मासिक तत्त्वावर अदा करण्यात येईल.

परंतु आणखी असे की, मुक्त प्रवेशासाठी वापरण्यात आलेली ग्राहकाधिष्ठित पारेषण यंत्रणा फक्त मुक्त प्रवेश ग्राहकांच्या वापरासाठी उभारण्यात आली असेल तर पारेषण परवानाधारक अशा ग्राहकाधिष्ठित यंत्रणेसाठीचे पारेषण आकार त्याच्या संबंधित यंत्रणांसाठी काढेल व आयोगाकडून त्यास मान्यता घेईल आणि सदर आकार, शिल्लक क्षमता जोपर्यंत अन्य व्यक्ति किंवा उद्देशासाठी वाटून देण्यात व वापरण्यात येत नाही तोपर्यंत, अशा मुक्त प्रवेश ग्राहकाला पूर्णपणे सोसावे लागतील.

१८.३. राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या वापरासाठीचे आकार मासिक तत्त्वावर निश्चित करण्यात येतील आणि अदा करण्यात येतील.

१८.४. राज्य पारेषण कंपनीकडून अशा आकारांचे देयक प्रत्येक महिन्याच्या दहा (१०) तारखेला पाठविण्यात येईल आणि मागील महिन्यासाठी निश्चित करण्यात आलेले आकार त्यामध्ये नमूद करण्यात आलेले असतील.

१८.५. पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याला वाटप करण्यात आलेल्या पारेषण क्षमता हक्कांपेक्षा वापरलेल्या अधिक क्षमतेकरिता राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या वापरासाठी पारेषण आकारांच्या पंचवीस (२५) टक्के अतिरिक्त नियामक आकार देखील अदा करावे लागतील,

१८.६ ज्या ग्राहकांनी वितरण परवानाधारकाशी पुरवठा करार केला असला आणि ते राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडलेले असले तरी त्यांना देखील क्रॉस सबसिडी अधिभार अदा करावा लागेल.

१८.७. वरील विनियम १८.५ नुसार, नियामक आकार म्हणून अशा वसूल केलेल्या रकमेचा उपयोग पारेषण परवानाधारक, पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने द्यावयाचे पारेषण आकार कमी करण्यासाठी करील.

१८.८. पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने अदा केलेल्या पारेषण आकारांतून न वापरलेल्या क्षमता हक्कांसाठी परतावा मिळण्याचा हक्क अशा उपयोगकर्त्यास असणार नाही.

१८.९ वेळोवेळी सुधारणा केलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ नुसार, मुक्त प्रवेश उपयोगकर्ता, आयोगाच्या राज्य भार प्रेषण केंद्राच्या वेळोवेळी निर्गमित केलेल्या अंदाजपत्रकाच्या आदेशाप्रमाणे, संबंधित आकार अदा करील.

१८.१० विद्यमान राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा मुक्त प्रवेश ग्राहक, आयोगाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात आलेल्या आकारांप्रमाणे, आकार अदा करील.

## १९ काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) आणि यंत्रणा संचालन आकार

मुक्त प्रवेश ग्राहकांद्वारे काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) आणि यंत्रणा संचालन आकार खालील दराने देय राहतील :-

१९.१ <u>आंतर-राज्य मुक्त प्रवेशांच्या बाबतीत</u>

(ए) दीर्घ-कालीन आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश

(एक) अधिनियमाच्या कलम २८ (४) अंतर्गत केंद्रीय आयोगाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, एकत्रित भार प्रेषण आणि संपर्क योजनेसाठीच्या आकारांसह प्रादेशिक भार प्रेषण केंद्राचे शुल्क आणि आकार;

(दोन) अधिनियमाच्या कलम ३२ च्या उप-कलम (३) अंतर्गत आयोगाने विनिर्दिष्ट केलेले राज्य भार प्रेषण केंद्र आकार.

(बी) अल्प-कालीन मुक्त प्रवेश

(एक) केंद्रीय/राज्य आयोगाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे प्रादेशिक भार प्रेषण केंद्र आणि राज्य भार प्रेषण केंद्र आकार.

१९.२ राज्यांतर्गत मुक्त प्रवेशांच्या बाबतीत

प्रचालन आकारांमध्ये, शेड्युलिंग आणि यंत्रणा संचालनासाठीचे शुल्क, ऊर्जा लेखे, शेड्युल आणि वसुली व वितरण आकारांमध्ये सुधारणा करण्यासाठीचे शुल्क, समाविष्ट असतात.

वितरण परवानाधारकाने देय असलेले राज्य भार प्रेषण केंद्राचे शुल्क व आकार यांची विभागणी, मुक्त प्रवेशाची निर्धारित मागणी आणि दीर्घ-कालीन व मध्यम-कालीन मुक्त प्रवेश ग्राहकांकरिता यथा-प्रमाण तत्त्वाच्या आधारे वितरण परवानाधारकाची एकूण मागणी, यांच्यातील गुणोत्तराच्या आधारे, मुक्त प्रवेश ग्राहकांबरोबर करता येईल. आयोगाने मान्यता दिलेले शेड्युलिंग आणि अन्य प्रचालन आकार अल्प-कालीन मुक्त प्रवेश ग्राहकाला लावण्यात येतील.

परंतु असे की, राज्य भार प्रेषण केंद्राचे शुल्क व आकार लावण्यासाठी, आयोगाने वेळोवेळी वेगळ्या आदेशाद्वारे किंवा विनियमांद्वारे, विशिष्ट पद्धतीला मान्यता दिली असेल तर, अशी पद्धत अवलंबिण्यात येईल.

राज्य भार प्रेषण केंद्र, निर्मिती कंपन्या आणि मुक्त प्रवेश ग्राहकांनी मागच्या महिन्यात देय असलेल्या शुल्क आणि आकारांचे देयक प्रत्येक महिन्याच्या १०व्या दिवसाच्या आधी पाठवेल.

# भाग एफ : काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग), वीज मापन, सुधारणा आणि हानि

## २०. काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग)

२०.१. या विनियमाच्या पुढील खंडांत काहीही नमूद करण्यात आले असले तरी, केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने विनिर्दिष्ट केल्यानुसार आंतर-राज्य मुक्त प्रवेश व्यवहारांचे काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) करण्यात येईल.

२०.२ मागील खंडाच्या अधीन राहून, १ मेगावॅट आणि त्यावरील मागणी असलेल्या ग्राहकांच्या आणि सर्व निर्मिती केंद्रांच्या– त्यांची क्षमता कितीही असली तरीही - राज्यांतर्गत मुक्त प्रवेश व्यवहारांचे शेड्युलिंग राज्य भार प्रेषण केंद्राकडून राज्य ग्रिड संहितेमधील तरतुदींना अनुसरुन करण्यात येईल.

परंतु असे की, वितरण परवानाधारकाच्या अंश-कालीन मुक्त प्रवेश ग्राहक त्याचे शेड्युल वितरण परवानाधारकास सादर करील व त्याने ते राज्य भार प्रेषण केंद्राकडे सादर करणार नाही.

२०.३ वेळोवेळी सुधारणा केलेल्या, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा वीज दराच्या निश्चितीकरणासाठी अटी आणि शर्ती) विनियम, २०१०, अंतर्गत ‘अनिश्चित वीज’ म्हणून निश्चित केलेल्या नूतनशील ऊर्जा निर्मिती संयंत्राला शेड्युलिंग करण्यातून सूट देण्यात येईल. ही सूट आयोग जोपर्यंत विनियमामध्ये सुधारणा करून किंवा सर्वसाधारण किंवा विशिष्ट आदेशाद्वारे या अटीत सुधारणा करीत नाही तोपर्यंत देण्यात येईल.

परंतु आणखी असे की, वेळोवेळी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा वीज दराच्या निश्चितीकरणासाठी अटी आणि शर्ती) विनियम, २०१०, मध्ये व्याख्या केलेल्या नूतनशील ऊर्जा निर्मात्याकडून ग्राहकाने ‘अनिश्चित वीज’ प्राप्त करून घेण्यासाठी जर मुक्त प्रवेश घेण्याचे ठरविले आणि ग्राहकाच्या वितरण

परवानाधारकाबरोबरच्या करारबद्ध मागणीच्या शिल्लक मागणी (रिटेन्ड) इतक्या पुरवठा करण्यात आलेल्या अशा ऊर्जेकरिता ग्राहकाला वीज दरातील लागू असलेल्या वर्गवारीनुसार आकार देय राहतील आणि करारबद्ध मागणीपेक्षा जास्त पुरवठा घेतल्यास आयोगाच्या आदेशानुसार उचित दंड आकारण्यात येईल.

## २१ वीज मापन (मीटरींग) आणि संदेशवहन

२१.१. मुक्त प्रवेश ग्राहक आणि सर्व निर्मिती केंद्रांच्या बाबतीत, त्यांची क्षमता कितीही असली तरी, राज्य पारेषण कंपनीकडून, ग्राहकांसाठी आणि ग्राहकांच्या खर्चाने विशेष ऊर्जा मीटर्स बसविण्यात येतील.

२१.२. विशेष ऊर्जा मीटर्समध्ये काल-गटवारीनुसार झालेला ॲक्टिव्ह वीज वापर आणि व्होल्टेजनुसार झालेला रिॲक्टिव्ह वीज वापर यांची मोजणी राज्य ग्रिड संहितेनुसार करण्याची क्षमता असेल.

२१.३. पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक, जसे असेल तसे, मुक्त प्रवेश ग्राहक ज्याला जोडलेला असेल, त्यांची विशेष ऊर्जा मीटर्स चांगल्या स्थितीत ठेवतील.

२१.४. राज्य पारेषण कंपनी किंवा राज्य भार प्रेषण केंद्र यांनी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीने पाहणी करण्यासाठी विशेष ऊर्जा मीटर्स खुली असतील.

२१.५. केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या मीटर संबंधीच्या मानकांचे सर्व मुक्त प्रवेश ग्राहक पालन करतील.

परंतु असे की, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेतील आंतर-जोडणी ठिकाणे आणि/किंवा मीटर बसविण्याची ठिकाणे राज्य मीटरींग संहितेची पूर्तता करतील.

परंतु आणखी असे की, राज्य ऊर्जा लेखे सुलभ करणासाठी राज्य वीज मापन (मीटरींग) संहितेमध्ये व्याख्या न केलेली आंतर-जोडणी आणि/किंवा मीटर बसविण्याची ठिकाणे यांची व्याख्या राज्य भार प्रेषण केंद्राकडून करण्यात येईल.

२१.६. राज्य भार प्रेषण केंद्राला ऊर्जा मीटरची माहिती पुरवण्याची जबाबदारी संयुक्तपणे ग्राहक आणि ग्राहक जोडला गेलेल्या पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक यांची राहील.

२१.७. मुक्त प्रवेश उपयोगकर्ता त्याच्या निर्मितीचे राज्य भार प्रेषण केंद्रात रिअलटाइम संनियंत्रण करण्यासाठी त्याच्या निर्मितीची योग्य दर्शनक्षमता (व्हिजीबिलिटी) राखण्याची काळजी घेईल.

२१.८. राज्य भार प्रेषण केंद्राला, ऊर्जा लेख्यांच्या प्रयोजनासाठी, ऊर्जा मीटरमधील माहिती ऑन-लाईन कळविण्यात येईल.

२१.९. राज्य पारेषण कंपनी आणि/किंवा राज्य भार प्रेषण केंद्राने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीने पाहणी करण्यासाठी रिमोट ट्रान्समिशन युनिट - डेटा कॉन्सेन्ट्रेटर (आर टी यु - डीसी) खुले राहील.

२१.१०. रिअलटाइम संदेश-वहनासाठी नोडल एजन्सी आणि/किंवा राज्य भार प्रेषण केंद्राकडून निश्चित करण्यात येईल तो संदेश-वहनाचा खर्च मुक्त प्रवेश ग्राहकाला सहन करावा लागेल.

२१.११. मुक्त प्रवेश ग्राहकाकडे दूरध्वनी/मोबाईल, फॅक्स आणि ई-मेल या सुविधा असाव्यात. त्याच्या संदेश-वहन यंत्रणेचा तपशील नोडल एजन्सी आणि/किंवा राज्य भार प्रेषण केंद्राला कळविण्यात येईल.

## २२. सुधारणा

ऊर्जेच्या केलेल्या काल व परिमाण निर्धारण (शेड्युल) मध्ये सुधारणा करण्यास, भारतीय विद्युत ग्रिड संहिता (आय इ जी सी) किंवा राज्य ग्रिड संहितेमधील तरतुदीनुसार, जसे असेल तसे, परवानगी देण्यात येईल.

## २३. ऊर्जा हानि

२३.१ आंतर-राज्य पारेषण

(एक) दीर्घ-कालीन प्रवेश आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेशः

केंद्रीय आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या तरतुदींना अनुसरुन खरेदीदार पारेषण यंत्रणेतील विभागून देण्यात आलेली ऊर्जा हानि सहन करतील.

(दोन) अल्प-कालीन मुक्त प्रवेशः

केंद्रीय आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या तरतुदींना अनुसरुन मुक्त प्रवेश ग्राहकांकडून पारेषण यंत्रणेतील ऊर्जा हानिची वसुली करण्यात येईल.

२३.२. राज्यांतर्गत पारेषण

आयोगाने लागू असलेल्या वर्षासाठी बहु-वर्षीय वीज दर/ वार्षिक कामगिरीचा आढावा/ वीज दराचे आदेश यामध्ये निश्चित केल्याप्रमाणे राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेची प्रमाणकानुसार पारेषण हानि मुक्त प्रवेश ग्राहकांनी प्रत्यक्ष खेचलेल्या ऊर्जेच्या प्रमाणात विभागण्यात येईल आणि वस्तु-रुपात (प्रति युनिट मध्ये वीज अंतःक्षेपण करण्याच्या व वीज खेचण्याच्या प्रमाणात समायोजित केलेली) देय राहील.

# भाग जीः असंतुलन आणि रिॲक्टिव्ह ऊर्जा आकार

## २४. असंतुलन आकार

२४.१. दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश किंवा मध्यम-कालीन मुक्त प्रवेश किंवा अल्प-कालीन मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आल्यानंतर सर्व व्यवहारांचे काल-परिमाण निर्धारण

(शेड्युलिंग), आंतर-राज्य व्यवहारांसाठी भारतीय विद्युत ग्रिड संहितेमधील (आय इ जी सी) संबंधित तरतुदींना अनुसरुन आणि राज्यांतर्गत व्यवहारांसाठी राज्य ग्रिड संहितेनुसार/आयोगाच्या आदेशानुसार, एक दिवस आधी (डे-अहेड) तत्त्वावर करण्यात येईल.

परंतु असे की, या विनियमांच्या विनियम २४ मधील तरतुदी राज्य पूलामध्ये सहभागी झालेल्या मुक्त प्रवेश निर्माते आणि ग्राहकांना लागू राहणार नाहीत आणि त्यांना अंतिम संतुलन आणि हिशोबपूर्ती पद्धतीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या ऊर्जा संतुलन आणि हिशोबपूर्तीच्या तरतुदी किंवा आयोगाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेली अन्य कोणतीही संतुलन आणि हिशोबपूर्ती पद्धत, लागू राहील.

२४.२. मुक्त प्रवेश ग्राहकांच्या बाबतीत विजेचे शेड्युलनुसार आणि प्रत्यक्ष केलेले अंतःक्षेपण (इंजेक्शन) आणि/किंवा खेचलेली वीज (ड्रॉअल) यामधील तफावतीची हिशोबपूर्ती, खालीलप्रमाणे करण्यात येईलः-

२४.२.१. <u>ज्यादा खेचलेली वीजः</u>

मुक्त प्रवेश ग्राहकांनी खेचलेल्या ज्यादा विजेकरिता (ओव्हर ड्रॉअल) खालील दोन पर्यायांपैकी उच्च दर आकारण्यात येईलः-

(एक) यंत्रणा सर्वोच्च किंमत (सिस्टम मार्जिनल प्राईस) अधिक अन्य आनुषंगिक आकार ( नक्त यु आय आकार, अतिरिक्त यु आय) किंवा राज्यात वेळोवेळी कार्यरत असलेल्या राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या पद्धतीखाली निश्चित करण्यात आलेले अन्य कोणतेही राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दरांतर्गत हिशोबपूर्ती आकार , किंवा

(दोन) संबंधित वितरण परवानाधारकासाठी आयोगाने वेळोवेळी निश्चित केल्यानुसार वीज दराच्या अनुसूचीत निश्चित करण्यात आलेला

तात्पुरत्या वीज दरातील, जो लागू असेल तो, ऊर्जा आकार किंवा अस्थिर आकार ,

२४.२.२. <u>कमी खेचलेली वीजः-</u>

मुक्त प्रवेश ग्राहकाने कमी वीज खेचल्यास, वितरण परवानाधारकाकडून त्याला कोणताही आकार अदा करण्यात येणार नाही.

परंतु असे की, मुक्त प्रवेश ग्राहकाच्या कमी वीज खेचण्यामुळे आंतर-राज्य यु आय पद्धती अंतर्गत कोणताही दंड आकार लावण्यात आला तर त्याची वसुली मुक्त प्रवेश ग्राहकाकडून यथा-प्रमाणात करण्यात येईल.

२४.३ मुक्त प्रवेश व्यवहारातील जादा खेचलेली आणि कमी खेचलेली वीज

(अ) मुक्त प्रवेश ग्राहकासाठी वापराच्या ठिकाणाच्या शेड्युलमधील ऊर्जेची (युनिट) प्रत्येक काल-गटाकरिता परिगणना करण्यासाठी, वीज खेचण्याच्या शेड्युलमधील तरतुदींनुसार, वापराच्या ठिकाणी असलेल्या शेड्युलमधील क्षमतेला (किवॅ) काल-गटाच्या कालावधीने गुणण्यात येईल.

(ब) वापराच्या ठिकाणाच्या शेड्युलमधील मागणीची परिगणना करण्यासाठी, वापराच्या ठिकाणाच्या शेड्युलमधील क्षमतेला (किवॅ), त्या काल-गटाच्या पॉवर फॅक्टर ने भागण्यात येईल. या प्रयोजनासाठी पॉवर फॅक्टर १ म्हणून विचारात घेण्यात येईल.

(क) जादा खेचलेल्या किंवा कमी खेचलेल्या विजेची परिगणना खालीलप्रमाणे करण्यात येईलः-

(एक) मुक्त प्रवेश ग्राहकाने जादा खेचलेली वीज = (प्रत्येक काल-गटात ग्राहकाने खेचलेली नोंदणी झालेली वीज) – किमान (वापराच्या ठिकाणाची शेड्युलमधील मागणी/ऊर्जा, वापराच्या ठिकाणी मुक्त प्रवेश निर्मात्याने

ग्राहकाला उपलब्ध करुन दिलेली प्रत्यक्ष मागणी/ऊर्जा) – वितरण परवानाधारकाकडून मिळण्याचा हक्क असलेली शेड्युलमधील मागणी/ऊर्जा

(दोन) मुक्त प्रवेश ग्राहकाने कमी खेचलेली वीज = किमान (वापराच्या ठिकाणाची शेड्युलमधील मागणी/ऊर्जा, वापराच्या ठिकाणी मुक्त प्रवेश निर्मात्याने ग्राहकाला उपलब्ध करुन दिलेली प्रत्यक्ष मागणी/ऊर्जा)– (प्रत्येक काल-गटात ग्राहकाने खेचलेली नोंदणी झालेली वीज)

२४.४. नोंदणी केलेल्या खेचलेल्या विजेमधून, मुक्त प्रवेश ग्राहक म्हणून शेड्युलमधील हक्काचे प्रथम समायोजन करण्यात येईल आणि उरलेली शिल्लक ही ग्राहकाच्या करारांतर्गत मागणीचे समायोजन करण्यासाठी वापरण्यात येईल. नोंदलेल्या कमाल खेचलेल्या विजेतील फरकाचा हिशोब/आकारणी खालील प्रमाणे करण्यात येईल --

अ) जेव्हा खेचलेली जादा वीज ही वितरण परवानाधारकाचा ग्राहक म्हणून करारांतर्गत मागणी म्हणून हाताळण्यात येणार असेल तर वरील विनियम २४.३ नुसार मेळ घातल्यानंतर उरलेली ज्यादा खेचलेली वीज ही मागणी अधिभार म्हणून ग्राहकांना, अशा ग्राहकांना लागू असलेल्या किरकोळ वीज दराच्या तरतुदींशी मिळत्याजुळत्या रीतीनुसार, लावण्यात येईल. ग्राहकाने ज्यादा खेचलेल्या विजेची हिशेबपूर्ती वरील विनियम २४.२.१ नुसार करण्यात येईल.

ब) मुक्त प्रवेश ग्राहक म्हणून असलेल्या शेड्युलमधील हक्कापेक्षा जेव्हा ग्राहकाचा नोंदलेला वीज वापर कमी असेल तेव्हा तो वरील विनियम २४.२.२ खाली कमी वापर म्हणून समजण्यात येईल.

२४.५ मुक्त प्रवेश घेतलेला वीज निर्माता आणि वीज व्यापारी यांच्या संबंधातील शेड्युलनुसार आणि प्रत्यक्ष विजेचे अंतःक्षेपण आणि/किंवा खेचलेली वीज यातील तफावतीची हिशेबपूर्ती खालीलप्रमाणे करण्यात येईलः-

२४.५.१ ज्यादा वीज अंतःक्षेपण

निर्मिती कंपनी/ वीज व्यापा-याने शेड्युलमधील अंतःक्षेपणापेक्षा केलेल्या ज्यादा वीज अंतःक्षेपणामुळे जर ग्रिडचा फायदा होत असेल तर अशा ज्यादा वीज अंतःक्षेपणाची हिशेबपूर्ती ही, आंतर-राज्य उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या पद्धतीखाली लागू असलेल्या यु आय आकाराने किंवा राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या पद्धती अंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या यंत्रणा सर्वोच्च किंमत (एस एम पी) अधिक अन्य आनुषंगिक आकारा (नक्त यु आय आकार, अतिरिक्त यु आय) ने किंवा राज्यात वेळोवेळी प्रचलित असलेल्या राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या पद्धतीखाली निश्चित करण्यात आलेल्या राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या अन्य कोणत्याही हिशेबपूर्तीसाठीच्या आकाराने किंवा वितरण परवानाधारकाच्या नूतनशील ऊर्जा स्त्रोत आणि द्रवरुप इंधनावर आधारित वीज निर्मिती वगळून अन्य स्त्रोतांकडील दीर्घ-कालिन वीज खरेदीच्या भारांकित सरासरी खर्चाने, जे कमी असेल त्यानुसार, करण्यात येईल.

शेड्युलमधील अंतःक्षेपणापेक्षा वीज निर्माता/ वीज व्यापाऱ्याने केलेले ज्यादा अंतःक्षेपण जर ग्रिडला घातक असेल तर विजेच्या अशा जादा अंतःक्षेपणाकरिता मुक्त प्रवेश निर्माता/व्यापारी, आंतर-राज्य उपलब्धतेवर आधारित वीज दर पद्धतीखाली लागू असलेला यु आय आकार किंवा राज्यात वेळोवेळी प्रचलित असलेल्या, राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दर पद्धतीखाली निश्चित करण्यात आलेली यंत्रणा सर्वोच्च किंमत (एम एम पी) अधिक अन्य आनुषंगिक आकारा (नक्त यु आय आकार, अतिरिक्त यु आय)ने किंवा अन्य कोणतेही राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित

वीज दराच्या हिशेबपूर्तीसाठीचे आकार, जे जास्त असेल ते, राज्य पूल मध्ये भरणा करील.

२४.५.२ कमी वीज अंतःक्षेपण

खालील विनियम ३८ अंतर्गत दैवी आपत्तीचा अपवाद वगळता, मुक्त प्रवेश निर्मात्याने शेड्युलमधील अंतःक्षेपणापेक्षा कमी वीज अंतःक्षेपण केल्यास त्याची भरपाई, ग्रिडच्या सुरक्षिततेच्या अधीन राहून, ग्रिडमधून करण्यात येईल आणि त्यासाठी वीज निर्मात्याला/वीज व्यापा-याला, वितरण परवानाधारकाला आंतर-राज्य उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या पद्धतीखाली लागू असलेल्या यु आय आकाराने किंवा राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दर पद्धतीखाली निश्चित करण्यात आलेल्या यंत्रणा सर्वोच्च किंमतीने, (एम एम पी) अधिक अन्य आनुषंगिक आकार (नक्त यु आय आकार, अतिरिक्त यु आय) ने किंवा अन्य कोणतेही राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या हिशेबपूर्तीसाठीचे आकार, यापैकी जे उच्च असेल त्याप्रमाणे, आकार अदा करावे लागतील. त्याशिवाय, मुक्त प्रवेश ग्राहकाच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी प्रादेशिक भार प्रेषण केंद्र आणि/ किंवा राज्य भार प्रेषण केंद्राकडून निश्चित केलेला कोणताही अतिभार (कंजेस्शन) आकार/किंवा दंड, असल्यास, तो वितरण परवानाधारकाला अदा करण्यात येईल.

परंतु असे की, कोणताही वीज निर्माता/व्यापारी थेट राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडलेला असल्यास आणि वीज अंतःक्षेपण करण्याचे ठिकाण राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत असल्यास, त्याच्यावर वहन आकार आणि वहन हानि लावण्यात येणार नाही.

परंतु आणखी असे की, जर सतत दोन (२) दिवस विजेचे कमी अंतःक्षेपण चालू राहिले तर, राज्य भार प्रेषण केंद्र शेड्युलमध्ये सुधारणा करण्यासाठी वीज निर्मात्याला/ वीज व्यापाऱ्याला नोटीस देईल. जर वीज निर्माता/वीज व्यापारी मुक्त प्रवेश शेड्युलप्रमाणे विजेचे अंतःक्षेपण करू शकला नाही तर अशा प्रकरणी वीज

निर्माता/वीज व्यापाऱ्याने शेड्युलमध्ये ताबडतोब सुधारणा करावी किंवा अन्यथा तो, यंत्रणा सर्वोच्च किंमतीने, (एम एम पी) अधिक अन्य आनुषंगिक आकाराच्या (नक्त यु आय आकार, अतिरिक्त यु आय) किंवा राज्यात वेळोवळी कार्यरत असलेल्या राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या पद्धतीखाली निश्चित करण्यात आलेल्या राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या अन्य कोणत्याही हिशेबपूर्तीसाठीच्या आकाराच्या, दुप्पट दंड आकार भरण्यास, जबाबदार राहील. तथापि, वीज निर्माता/वीज व्यापारी संपूर्ण कालावधीकरिता पूर्ण राखीव क्षमतेसाठी मुक्त प्रवेश आकार अदा करण्यास जबाबदार राहील.

२४.६ राज्यामधील निर्मात्यांना जेव्हा राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दराच्या पद्धतीत सहभागीदार म्हणून घोषित करण्यात येईल तेव्हा त्यांना खालील बाबी लागू राहतील :-

(अ) वेळेच्या कोणत्याही १५ मिनिटाच्या काल-गटात घोषित क्षमतेच्या १०५ टक्क्यापर्यंतची कोणतीही निर्मिती आणि तिची एका दिवसातील एकूण सरासरी ही घोषित सरासरी क्षमतेच्या १०१ टक्क्यापर्यंत जात असेल तर ती गेमींग म्हणून संबोधण्यात येणार नाही आणि निर्मात्याला शेड्युलमधील निर्मितीच्या घोषित क्षमतेहून अधिक वीज निर्मितीसाठी राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दर पद्धतीखाली यंत्रणा सर्वोच्च किंमत (एम एम पी) अधिक अन्य आनुषंगिक आकार (नक्त यु आय आकार, अतिरिक्त यु आय) म्हणून निश्चित केलेला यु आय आकार मिळण्याचा हक्क राहील.

(ब) विहित मर्यादांपेक्षा जास्त झालेल्या कोणत्याही वीज निर्मितीकरिता, राज्य भार प्रेषण केंद्र त्यात कोणतेही गेमींग नसल्याची खात्री करण्यासाठी तपास करेल आणि राज्य भार प्रेषण केंद्राला जर गेमींग असल्याचे

आढळून आले तर, अशा निर्मिती केंद्राला अतिरिक्त वीज निर्मितीमुळे मिळणार असणारे तत्सम यु आय आकार शून्यवत करण्यात येतील आणि लाभधारकांच्या यु आय खात्यामध्ये ही रक्कम निर्मिती केंद्रामधील त्यांच्या क्षमतेच्या हिश्याच्या प्रमाणात समायोजित करण्यात येईल.

परंतु असे की, आयोगाकडून, वरील अटीमध्ये वेळोवेळी फेरबदल/फेरफार, कोणत्याही विशिष्ट/सर्वसाधारण आदेश किंवा विनियमांद्वारे करण्यात येतील.

२४.७ असंतुलन आकार अदा करण्यास उच्च प्राधान्य देण्यात येईल आणि संबंधित घटक, (परवानाधारक किंवा मुक्त प्रवेश ग्राहक, जसे असेल तसे, यांच्यासह ) राज्य भार प्रेषण केंद्रातर्फे चालविण्यात येत असलेल्या राज्य असंतुलन पूल खात्यामध्ये, विवरणपत्र निर्गमित झाल्यापासून सात (७) दिवसाच्या आत, निर्देशित रकमेचा भरणा करतील. असंतुलन आकारामुळे ज्या व्यक्तीला रक्कम मिळावयाची आहे त्या व्यक्तीला त्यानंतर राज्य असंतुलन पूल खात्यामधून कामाच्या तीन (३) दिवसांच्या आत रक्कम अदा करण्यात येईल.

२४.८ वरील असंतुलन आकार अदा करण्यास जर दोन दिवसांपेक्षा अधिक, म्हणजेच विवरणपत्र निर्गमित करण्याच्या दिनांकापासून बारा (१२) दिवसांपेक्षा जास्त, विलंब झाल्यास कसूरदार पक्षकाराला विलंबाच्या प्रत्येक दिवसाकरिता ०.०४ टक्के या दराने व्याज अदा करावे लागेल. व्याजाची ही वसूल केलेली रक्कम, ज्या व्यक्तीला ही रक्कम मिळावयाची होती व जी अदा करण्यास विलंब झाला, त्या व्यक्तीला अदा करण्यात येईल. रक्कम अदा करण्यास सातत्याने, जर काही, विलंब झाला तर तसे, राज्य भार प्रेषण केंद्राकडून आयोगाला, सुधारणात्मक कारवाई सुरू करण्यासाठी, कळविण्यात येईल.

२४.९ वेळोवेळी सुधारणा केलेल्या, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१० मध्ये 'अनिश्चित वीज' निर्माण करणारा म्हणून निश्चित केलेल्या नूतनशील ऊर्जा निर्मिती प्रकल्पामधून मुक्त प्रवेश ग्राहकाने विजेच्या पुरवठ्याची व्यवस्था केली तर हा विनियम २४ लागू राहणार नाही.

परंतु असे की, वेळोवेळी सुधारणा केलेल्या, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१० मध्ये अनिश्चित वीज घेण्याकरिता (पवन निर्मिती प्रकल्प, सौर निर्मिती प्रकल्प, लघु-जल आणि आयोगाने मान्यता दिलेल्या अन्य कोणत्याही स्रोतांकडून) वीज घेतल्यास त्या करिता मुक्त प्रवेश ग्राहकाकरिता विजेचा पुरवठा केल्यानंतर उरलेल्या शिल्लक विजेला खालील अटी लागू राहतील ---

(१) अंतःक्षेपण केलेल्या विजेकरिता काटेकोरपणे १५ मिनिटांच्या काल-गटाच्या आधारे क्रेडिट देण्यात यावे.

(२) मुक्त प्रवेश ग्राहकांच्या वापरकरिता विजेचा पुरवठा केल्यानंतर त्याच १५ मिनिटांच्या काल-गटातील शिल्लक वीज, वितरण परवानाधारकाकडून, आयोगाने वितरण परवानाधारकाच्या संबंधित वर्षाकरिता मान्यता दिलेल्या सरासरी वीज खरेदी खर्चाच्या दराने, खरेदी करण्यात येईल.

परंतु असे की, वितरण परवानाधारकास, अशा शिल्लक विजेची खरेदी करुन त्याद्वारे नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाची पूर्तता करणे शक्य व्हायला पहिजे.

स्पष्टीकरणः या विनियमांच्या प्रयोजनासाठी " सरासरी वीज खरेदी खर्च " म्हणजे आयोगाने वीज दराच्या आदेशात किंवा अचूक समायोजनाच्या आदेशात किंवा अन्य कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशिष्ट आदेशात, मान्यता दिलेली भारांकित सरासरी किंमत. ज्या किंमतीने वितरण परवानाधारकाने स्व-वापरासाठीच्या वीज निर्मितीवरील

खर्चासह विजेची खरेदी केलेली असेल, असा कोणताही आदेश काढण्यात आलेला नसल्यास, शेवटाचा मान्यता देण्यात आलेला “ सरासरी वीज खरेदी खर्च” हा हिशेबपूर्तीच्या प्रयोजनासाठी वापरण्यात येईल.

## २५ रिॲक्टीव्ह ऊर्जा आकार

२५.१. निर्मिती केंद्रांच्या बाबतीत, मुक्त प्रवेश ग्राहकांनी रिॲक्टीव्ह ऊर्जेचे आकार अदा करण्याची पद्धत, वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या राज्य ग्रिड संहिता आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या तरतुदींनुसार, राहील.

२५.२ मुक्त प्रवेश ग्राहकांच्या बाबतीत, पारेषण यंत्रणेमध्ये ऊर्जा समतोल राखण्यासाठी प्रोत्साहन-अधिदान व दंड हे वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ मध्ये नमूद करण्यात आलेल्या तत्त्वांना अनुसरून असतील.

२५.३ नूतनशील ऊर्जा निर्मात्यांच्या बाबतीत, रिॲक्टिव्ह ऊर्जा आकार हे संबंधित वीज दराच्या आदेशांत मान्यता देण्यात आलेल्या आकारांनुसार राहतील.

# भाग एचः वाणिज्यिक बाबी

## २६ देयक तयार करणे, वसुली आणि वितरण

या विनियमांतर्गत देय असलेल्या आकारांच्या संबंधात खालील कार्यपद्धतीनुसार आकारणी करण्यात येईलः

२६.१. आंतर-राज्य व्यवहारः

२६.१.१. अल्प-कालीन मुक्त प्रवेश

(एक) केंद्रीय पारेषण कंपनी आणि राज्य पारेषण कंपनीच्या यंत्रणांच्या वापरासाठीच्या पारेषण आकारांची आणि अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठी प्रादेशिक भार प्रेषण केंद्र आणि राज्य भार प्रेषण केंद्राला देय असलेल्या परिचालन आकारांची वसुली आणि वितरण, केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या कार्यपद्धतीनुसार नोडल प्रादेशिक भार प्रेषण केंद्राकडून करण्यात येईल.

२६.१.२. दीर्घ-कालीन प्रवेश आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश

(एक) एकत्रित भार प्रेषण आणि संपर्क योजनेसह प्रादेशिक भार प्रेषण केंद्राला देय असलेल्या आकाराची आकारणी, वसुली आणि वितरण केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या कार्यपद्धतीनुसार राहील.

(दोन) राज्य पारेषण कंपनी/राज्य भार प्रेषण केंद्राकडून मुक्त प्रवेश ग्राहकाला पुढील कॅलेंडर महिन्याच्या तिसऱ्या कामाच्या (३) दिवसापूर्वी थेट देयक पाठविण्यात येईल.

(तीन) राज्य पारेषण कंपनीशी जोडलेला मुक्त प्रवेश ग्राहक देयक प्राप्त झाल्यावर कामाच्या पाच (५) दिवसांच्या आत देयकाचा भरणा करील.

२६.२. राज्यांतर्गत व्यवहार

२६.२.१. अल्प-कालीन मुक्त प्रवेश

अल्प-कालीन मुक्त प्रवेश ग्राहक पारेषण आकार आणि परिचालन आकार राज्य भार प्रेषण केंद्राकडे विनियम वरील १९.२ नुसार जमा करील.

२६.२.२. दीर्घ-कालीन आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेश

राज्य पारेषण कंपनी त्यांना मिळणार असलेल्या आकारांसह, मुक्त प्रवेश ग्राहकाला त्याचे देयक वरील विनियम १८.४ नुसार पाठवील. मुक्त प्रवेश ग्राहक या आकारांचा भरणा देयक प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून सात (७) दिवसाच्या आत करील. राज्य

पारेषण कंपनी, राज्य भार प्रेषण केंद्र आणि लागू असलेल्या पारेषण परवानाधारकाला देय असणाऱ्या आकारांचे वितरण मासिक तत्त्वावर करील.

## २७ विलंब भरणा अधिभार

जर या विनियमांखाली देय असणाऱ्या आकारांच्या कोणत्याही देयकाचा भरणा मुक्त प्रवेश ग्राहाकाने देय दिनांकाच्या आत करण्यास विलंब केला तर, या अधिनियमाखाली व त्याखाली करण्यात आलेल्या अन्य कोणत्याही विनियमांखाली करावयाच्या कोणत्याही कारवाईस बाधा न येऊ देता, विलंब भरणा अधिभार प्रति महिना एक टक्के (१ %) या दराने आकारण्यात येईल.

## २८ देयक अदा न करणे

या विनियमांखाली मुक्त प्रवेश ग्राहकाने अदा करावयाचा कोणताही आकार किंवा रकमेचा भरणा न केल्यास, त्याने या विनियमांचे पालन केले नाही , असे मानण्यात येईल. राज्य पारेषण कंपनी किंवा पारेषण परवानाधारक, दावा दाखल करून अशा आकारांची वसुली करण्याच्या त्याच्या हक्कास बाधा न येऊ देता, ग्राहकाला पंधरा (१५) दिवसांची आगाऊ नोटीस दिल्यानंतर मुक्त प्रवेश खंडित करू शकतील.

राज्य भार प्रेषण केंद्राला देय असलेले आकार अदा न केल्यास, सदर केंद्र अशा कसूरदार मुक्त प्रवेश ग्राहकाकरिता वीज पुरवठ्याचे शेड्युलिंग करणे नाकारू शकेल आणि सातत्याने कसूर झाल्यास, संबंधित परवानाधारकाला अशा ग्राहकाची ग्रिडला दिलेली जोडणी खंडित करण्याचे निर्देश देऊ शकेल.

परंतु असे की, वीज पुरवठ्याचे शेड्युलिंग करण्यास नकार देणे किंवा मुक्त प्रवेश खंडित करण्यावरुन कोणताही प्रश्न उत्पन्न झाल्यास मुक्त प्रवेश ग्राहक अभिनिर्णयासाठी आयोगाकडे संदर्भ करू शकेल.

## २९ भरणा सुरक्षा पद्धत

दीर्घ-कालीन प्रवेश आणि मध्यम-कालीन मुक्त प्रवेशाच्या बाबतीत, मुक्त प्रवेशासाठीचा अर्जदार, विविध आकार वसूल करण्यासाठी जबाबदार असलेल्या एजन्सीच्या नावे, विविध आकारांच्या अंदाजित रकमेकरिता दोन महिन्यांच्या कालावधीसाठी, एक रद्द न करता येण्याजोगे पत-पत्र (लेटर ऑफ क्रेडिट) उघडेल.

## ३० वीज अंतःक्षेपण करण्याची आणि वीज खेचण्याची ठिकाणे बदलण्यास मुभा

३०.१. दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश ग्राहाकाला विजेचे अंतःक्षेपण करण्याची आणि/किंवा वीज खेचण्याची ठिकाणे बदलण्याची मुभा वर्षातून दोन वेळा असेल. ही मुभा अशा ग्राहकांकरिता त्यांच्या विनंतीनुसार राज्य पारेषण कंपनीने त्यामुळे यंत्रणेवर होणाऱ्या परिणामांच्या करावयाच्या अभ्यासाच्या निष्कर्षांना अधीन राहून असेल.

परंतु असे की, अर्जदाराला अशी मुभा देत असताना, विद्यमान ग्राहकांच्या हक्कांवर विपरित परिणाम होऊ दिला जाणार नाही.

३०.२. एक संपूर्ण वर्षाकरिता मुक्त प्रवेश घेणारा मध्यम-कालीन ग्राहक देखील प्रवेशाची आणि निर्गमनाची ठिकाणे वर्षातून दोन वेळा, व्यवहार्यतेस अधिन राहून, बदलू शकेल.

३०.३. वीज निर्मिती किंवा निर्मितीशी संबंधित जाळे दुरुस्तीसाठी आकस्मिकपणे बंद ठेवावे लागले तर, राज्य भार प्रेषण केंद्र अल्प-कालिन ग्राहाकाला वीज अंतःक्षेपण करण्याचे ठिकाण किंवा ठिकाणे बदलण्यास परवानगी, तांत्रिक दृष्ट्या व्यवहार्य असल्यास, देऊ शकेल.

परंतु आणखी असे की, असा बदल करण्यास मुक्त प्रवेशाच्या कालावधीत फक्त एकदाच परवानगी देण्यात येईल.

परंतु असे की, दीर्घ-कालीन प्रवेश आणि मध्यम-कालीन प्रवेशाच्या बाबतीत, विद्यमान मुक्त प्रवेश ग्राहकाकडून विजेचे अंतःक्षेपण करण्याचे आणि/किंवा वीज खेचण्याच्या ठिकाणात करावयाच्या बदलासाठीचा अर्ज राज्य पारेषण कंपनीकडे कमीत कमी तीन (३) महिने अगोदर सादर करण्यात येईल.

परंतु असे की, पहिला बदल अंमलात आल्यापासून सहा (६) महिने झाल्यानंतरच, दुसरा बदल करण्यास परवानगी देता येईल. राज्य पारेषण कंपनीने असा अभ्यास करण्यासाठी केलेल्या सर्व खर्चांची प्रतिपूर्ती अशा ग्राहकांकडून पूर्णपणे करण्यात येईल.

परंतु असे की, विजेचे अंतःक्षेपण करण्याच्या आणि/किंवा वीज खेचण्याच्या ठिकाणात कोणताही बदल करण्यास, जर मुक्त प्रवेशांतर्गत वापरावयाच्या विजेच्या परिमाणात कोणताही बदल होणार नसेल तरच, परवानगी देण्यात येईल.

३०.४ परंतु आणखी असे की, असा बदल, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडलेल्या किंवा जोडणी घेण्याचा उद्देश असलेल्या नूतनशील ऊर्जा निर्मिती कंपनीच्या वीज अंतःक्षेपण करण्याच्या ठिकाणात करण्यात येत असल्यास आणि अशा कंपनीचा त्यांच्या विजेची विक्री, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०१४ च्या विनियम ३.१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पात्र व्यक्तीला किंवा ज्याच्या वीज पुरवठ्याच्या क्षेत्रात नूतनशील ऊर्जा निर्माता स्थित आहे अशा वितरण परवानाधारकाव्यतिरिक्त अन्य परवानाधारकाला, करण्याचा उद्देश असेल आणि जर अशी वीज उद्देशित लाभधारकाने खेचली नाही तर अशी सर्व ऊर्जा व्यपगत ऊर्जा म्हणून मानण्यात येईल.

## भाग आय : माहिती प्रणाली

### ३१. माहिती प्रणाली

३१.१. राज्य भार प्रेषण केंद्र,या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून एकशे ऐंशी (१८०) दिवसांच्या आत, इंटरनेटवरील त्याच्या संकेत-स्थळावर पुढील माहिती देईल :-

३१.१.१. या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून नव्वद (९०) दिवसांच्या आत राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या वापरासाठी असलेल्या अटी व शर्ती,ज्यात पुढील गोष्टी समाविष्ट असतील:-

(ए) अर्जाचा नमुना, अर्ज सादर करण्याची रीत व कार्यपद्धत आणि अर्जासोबत पाठवावयाचे शुल्क;

(बी) ठोक वीज पारेषण कराराचा नमुना व असा करार करण्याची रीत व कार्यपद्धत;

(सी) पारेषण आकार; आणि

(डी) राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करण्यासाठी अन्य कोणत्याही अटी आणि शर्ती.

३१.१.२. राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापराची सद्यस्थिती दाखविणारा अहवाल खालील बाबींसह असेल-

(ए) राज्यांतर्गत पारेषण वाहिन्या, वाहिनीची क्षमता आणि नोड्स दर्शविणारे पारेषण नकाशे;

(बी) राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत पारेषण क्षमतेचे हक्क धारण करणा-या पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांची नावे व अशा प्रत्येक उपयोगकर्त्याची क्षमता, कालावधी व वीज अंतःक्षेपण करण्याची व खेचण्याची ठिकाणे;

३१.१.३. डे-अहेड तत्त्वावर तसेच मागील एक (१) दिवस, एक (१) महिना आणि एक (१) वर्षासाठी पारेषण यंत्रणेच्या एक्स-पोस्ट उपलब्धतेची माहिती घोषित करणे

३१.१.४. मागील बावन्न (५२) आठवड्यांतील प्रत्येक आठवड्यात यंत्रणेत अंतःक्षेपित केलेल्या एकूण ऊर्जेच्या टक्केवारीत राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेतील ऊर्जा हानि;

३१.१.५. या विनियमाखाली राज्य पारेषण कंपनीने विकसित केलेला पारेषण यंत्रणा आराखडा;

राज्य भार प्रेषण केंद्र, राज्य पारेषण कंपनीने विकसित केलेल्या पारेषण यंत्रणा आराखड्याशी जोडणी साधण्यासाठी वेब लिंक देईल.

३१.१.६. पुढील पाच वर्षांकरिता पारेषण परवानाधारकाच्या नियोजित व मान्यताप्राप्त गुंतवणुकीचा तपशील.

३१.२. राज्य भार प्रेषण केंद्र त्याच्या संकेत-स्थळावरील वेब पानावर "मुक्त प्रवेश माहिती" या शीर्षकांतर्गत खालील माहिती प्रदर्शित करील आणि अशी माहिती असलेले मासिक किंवा वार्षिक अहवाल प्रसिद्ध करील.

३१.२.१. दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश किंवा मध्यम-कालीन मुक्त प्रवेश ग्राहकांबाबतच्या सद्यस्थिती अहवालात खालील माहिती दर्शविली जाईलः-

(एक) ग्राहकाचे नाव;

(दोन) मंजूर मुक्त प्रवेशाचा कालावधी ( सुरू होण्याची तारीख आणि समाप्तीची तारीख);

(तीन) वीज अंतःक्षेपण करण्याचे ठिकाण;

(चार) वीज खेचण्याचे ठिकाण;

(पाच) वापरलेली पारेषण यंत्रणा आणि/किंवा वितरण यंत्रणा; आणि

(सहा) वापरलेली मुक्त प्रवेश क्षमता.

३१.२.२. विद्यमान अल्प-कालीन प्रवेश ग्राहकांबाबतच्या सद्यस्थिती अहवालात खालील माहिती देण्यात येईलः-

(एक) ग्राहकाचे नाव;

(दोन) मंजूर मुक्त प्रवेशाचा कालावधी (सुरू होण्याची तारीख आणि समाप्तीची तारीख);

(तीन) वीज अंतःक्षेपण करण्याचे ठिकाण;

(चार) वीज खेचण्याचे ठिकाण;

(पाच) वापरलेली पारेषण यंत्रणा आणि/किंवा वितरण यंत्रणा; आणि

(सहा) वापरलेली मुक्त प्रवेश क्षमता.

३१.२.३. सर्वोच्च भार प्रवाह आणि अति उच्च-दाब उप-केंद्रातून निघणा-या सर्व अति उच्च दाब वाहिन्यांवरील राखीव क्षमतेसह उपलब्ध क्षमता

३१.२.४. राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेतील पारेषणातील सरासरी हानि संबंधी माहिती

३१.२.५. राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमधील मुक्त प्रवेशासाठीचा अर्ज नाकारण्यात आलेल्या अर्जदारांशी संबंधित माहिती.

## भाग जे: संकीर्ण

### ३२. राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेतील मुक्त प्रवेश क्षमतेचा कमी वापर करणे किंवा वापर न करणे

**३२.१ दीर्घ-कालीन मुक्त प्रवेशः**

दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश ग्राहकास, दीर्घ-कालीन मुक्त प्रवेशाच्या पूर्ण कालावधीच्या समाप्तीपूर्वी, शिल्लक कालावधीत न वापरल्या जाऊ शकणा-या क्षमतेसाठी खालीलप्रमाणे नुकसानभरपाईची रक्कम भरून, दीर्घ-कालीन प्रवेश हक्क पूर्णतः किंवा अंशतः सोडून देता येतील.

३२.१.१. कमीत कमी १२ वर्षांसाठी प्रवेश हक्क प्राप्त झालेला दीर्घ-कालीन ग्राहक

(ए) एक (१) वर्षाची नोटीस – जर अशा ग्राहकाने राज्य पारेषण कंपनीकडे प्रवेश हक्क सोडून देण्याच्या इच्छित दिनांकाच्या किमान एक (१) वर्ष अगोदर अर्ज सादर केला असेल तर, कोणताही आकार लावण्यात येणार नाही.

(बी) एक (१) वर्षाहून कमी कालावधीची नोटीस – जर अशा ग्राहकाने राज्य पारेषण कंपनीकडे प्रवेश हक्क सोडून देण्याच्या इच्छित दिनांकापूर्वी एक (१) वर्षापेक्षा कमी कालावधीत कोणत्याही वेळी अर्ज सादर केल्यास त्याला एक (१) वर्षाचा नोटीस कालावधी पूर्ण होण्यास जितका कालावधी कमी पडत असेल त्या कालावधीतीत न वापरल्या जाऊ शकणा-या पारेषण क्षमतेच्या पारेषण आकाराच्या ६६ टक्क्यांइतकी रक्कम भरावी लागेल.

३२.१.२. कमीत कमी १२ वर्षांसाठी प्रवेश हक्क प्राप्त न झालेला दीर्घ-कालीन ग्राहक - अशा ग्राहकाला बारा (१२) वर्षांचा प्रवेश हक्काचा कालावधी पूर्ण होण्यास जितका कालावधी कमी पडत असेल त्या कालावधीत न वापरल्या जाऊ शकणा-या पारेषण क्षमतेच्या अंदाजित पारेषण आकाराच्या ६६ टक्क्यांइतकी रक्कम ( नक्त विद्यमान मूल्य) भरावी लागेल.

परंतु असे की, असा ग्राहक प्रवेश हक्क सोडून देण्याच्या इच्छित दिनांकाच्या कमीत कमी एक (१) वर्ष अगोदर राज्य पारेषण कंपनीकडे अर्ज सादर करीलः

परंतु आणखी असे की, जर ग्राहकाने दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश हक्क सोडून देण्याच्या एक (१) वर्षापेक्षा कमी कालावधीत कोणत्याही वेळी अर्ज सादर केला असेल तर त्याला एक (१) वर्षाचा नोटीस कालावधी पूर्ण होण्यास जितका कालावधी कमी पडत असेल त्या कालावधीतील अंदाजित पारेषण आकारांच्या ६६ टक्क्यांइतकी रक्कम (निव्वळ विद्यमान मूल्य) भरावी लागेल व त्याशिवाय बारा (१२) वर्षांचा प्रवेश हक्काचा कालावधी पूर्ण होण्यास जितका कालावधी कमी पडत असेल त्या कालावधीत न वापरल्या जाऊ शकणा-या पारेषण क्षमतेच्या अंदाजित पारेषण आकारांच्या ६६ टक्क्यांइतकी रक्कम (निव्वळ विद्यमान मूल्य) देखील भरावी लागेल.

३२.१.३. वितरण परवानाधारकांनी निविदा प्रक्रियेने वीज प्राप्त करण्यासाठी निश्चित करावयाच्या वीज दरासाठी वीज मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सूचनांना अनुसरुन केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेमधील निविदेचे मूल्यमापन करण्यासाठी वापरावयाचा सवलत (डिस्काउंट) दर, हा वरील खंड (३२.१.१) च्या उप-खंड (ए) आणि (बी) मध्ये नमूद केलेल्या नक्त विद्यमान मूल्याची परिगणना करण्यासाठी लागू असलेला सवलत दर राहील.

३२.१.४. दीर्घ-कालीन ग्राहकांनी न वापरल्या जाऊ शकणा-या पारेषण क्षमतेसाठी भरलेल्या नुकसानभरपाईच्या रकमेचा वापर, त्या वर्षात अन्य दीर्घ-कालीन ग्राहक आणि मध्यम-कालीन ग्राहकांनी देय असलेले पारेषण आकार कमी करण्यासाठी, अशा दीर्घ-कालीन ग्राहक आणि मध्यम-कालीन ग्राहकांनी त्या वर्षात देय असलेल्या पारेषण आकारांच्या प्रमाणात, करण्यात येईल.

## ३२.२. मध्यम-कालीन मुक्त प्रवेश ग्राहक

मध्यम-कालीन मुक्त प्रवेश ग्राहक नोडल एजन्सीला कमीत कमी ३० दिवसांची आगाऊ सूचना देऊन पूर्णतः किंवा अंशतः मुक्त प्रवेश हक्क सोडून देऊ शकेल.

परंतु असे की, मध्यम-कालीन मुक्त प्रवेश ग्राहक त्याचे मुक्त प्रवेश हक्क सोडून देताना, ते सोडून देत असलेल्या कालावधीसाठी किंवा ३० दिवस, यापैकी जे कमी असेल त्या कालावधीसाठी, लागू असलेल्या पारेषण आकारांचा भरणा करेल.

## ३२.३ अल्प-कालीन मुक्त प्रवेश ग्राहक

(ए) अल्प-कालीन मुक्त प्रवेश ग्राहकाने केलेल्या अर्जातील विनंतीनुसार, नोडल एजन्सीने अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठी आगाऊ किंवा प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर स्वीकारलेले शेड्युल रद्द किंवा निम्नगामी दिशेने सुधारित करता येईल.

परंतु असे की, अल्प-कालीन प्रवेशाचे शेड्युल रद्द केले असल्यास किंवा निम्नगामी दिशेने सुधारित केले असल्यास ते, किमान दोन (२) दिवसांचा कालावधी समाप्त होण्यपूर्वी, अंमलात येणार नाही.

परंतु आणखी असे की, ज्या दिवशी नोडल एजन्सीला शेड्युल रद्द किंवा निम्नगामी खालच्या दिशेने सुधारित करण्याची सूचना देण्यात आली असेल तो दिवस आणि ज्या दिवसापासून रद्द किंवा निम्नगामी खालच्या दिशेने सुधारित करण्याच्या अशा सूचनेची अंमलबजावणी करावयाची असेल तो दिवस, दोन (२) दिवसांच्या कालावधीची गणना करताना त्यात धरले जाणार नाहीत.

(बी) ज्या कालावधीकरिता अल्प-कालीन मुक्त प्रवेशाचे शेड्युल रद्द किंवा निम्नगामी खालच्या दिशेने सुधारित करण्यासाठी, जसे असेल तसे, ज्या व्यक्तीने विनंती केली असेल ती व्यक्ती, रद्द किंवा निम्नगामी खालच्या दिशेने सुधारित करण्याच्या कालावधीच्या पहिल्या दोन (२) दिवसांकरिता, नोडल एजन्सीने सुरूवातीला मंजूरी दिलेल्या शेड्युलला अनुसरुन आणि त्यानंतर, अशा रद्द करण्याच्या किंवा सुधारित करण्याच्या कालावधीत, नोडल एजन्सीने तयार केलेल्या सुधारित शेड्युलला अनुसरुन, पारेषण आकार भरील.

(सी) शेड्युल रद्द करण्यात आले असल्यास या विनियमाच्या विनियम १९ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले परिचालन आकार दोन (२) दिवसांकरिता किंवा रद्द केल्याच्या कालावधीच्या दिवसांकरिता, जे कमी असेल त्याप्रमाणे, देय राहतील.

## ३३. मुक्त प्रवेशासाठी क्षमता उपलब्धततेची परिगणना

३३.१ राज्य पारेषण कंपनीकडून प्रत्येक पारेषण घटक आणि प्रत्येक उप-केंद्रासाठी मुक्त प्रवेशाकरिता उपलब्ध क्षमतेची परिगणना खाली नमूद केलेल्या पद्धतीप्रमाणे करण्यात येईलः अ

३३.१.१. पारेषण यंत्रणा घटकाची उपलब्ध मुक्त प्रवेश क्षमता = (डीसी – (एसडी + एसी +आरएम) ) + एनसी

जेथे, डीसी = पारेषण घटकाची मेगावॅटमधील डिझाइन केलेली क्षमता,

एसडी = घटकामध्ये नोंद झालेली मेगावॅटमधील सातत्याने असलेली मागणी,

आरएम = विश्वासार्हतेचे मार्जिन

एसी = यापूर्वीच वाटप करण्यात आलेली परंतु प्राप्त न करुन घेतलेली मेगावॅटमधील क्षमता; आणि भर घालावयाची मेगावॅटमधील अपेक्षित नवीन क्षमता.

३३.१.२. उप-केंद्राची उपलब्ध मुक्त प्रवेश क्षमता = (टीसी – (एसपी + एसी)) + एनसी

जेथे, टीसी = उप-केंद्राची एमव्हीए मधील रोहित्र क्षमता,

एसपी = उप-केंद्राची एमव्हीए मधील सर्वोच्च मागणी,

एसी = यापूर्वीच वाटप करण्यात आलेली परंतु प्राप्त न करुन घेतलेली एमव्हीएमधील क्षमता आणि

एनसी = भर घालावयाची एमव्हीएमधील अपेक्षित नवीन रोहित्र क्षमता.

३३.१.३. राज्य पारेषण कंपनी कॅलेण्डर महिन्याच्या पहिल्या दिवशी वरील मूल्ये मासिक तत्त्वावर अद्ययावत करील आणि त्यांच्या संकेत-स्थळावर प्रदर्शित करील.

## ३४. मुक्त प्रवेश कमी करण्यासाठी प्राधान्य

राज्य ग्रिडच्या संचालनातील कोणत्याही तांत्रिक मर्यादांच्या अधीन राहून, ग्राहकाच्या मुक्त प्रवेश सेवा कमी करणे आवश्यक असल्यास, राज्य ग्रीड संहितेच्या आवश्यक्तांना अधीन राहून, वितरण परवानाधारकाला देण्यात आलेला मुक्त प्रवेश सर्वात शेवटी कमी करण्यात येईल. इतरांमध्ये, प्रथम अल्प-कालीन मुक्त प्रवेश कमी करण्यात येईल, त्यानंतर मध्यम-कालीन मुक्त प्रवेश आणि त्यानंतर दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश कमी करण्यात येईल.

परंतु असे की, अल्प-कालिन मुक्त प्रवेश व्यवहारांमध्ये, द्विपक्षीय व्यवहार प्रथम व त्यानंतर पॉवर एक्स्चेंजचे व्यवहार रद्द किंवा कमी करण्यात येतील.

३४.१ राज्य ग्रिडच्या संचालनातील कोणत्याही तांत्रिक मर्यादांच्या अधीन राहून, राज्य भार प्रेषण केंद्र राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या वापर कमी करण्यासाठी खालील तत्त्वांचा, पूर्णतः किंवा अंशतः, अवलंब करील- :

(ए) बिघाडामुळे राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेची किंवा तिच्या कोणत्याही भागाची उपलब्ध क्षमता कमी झाल्याने मुक्त प्रवेश कमी करणे आवश्यक झाल्यास, अशा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा किंवा तिचा भागाच्या पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याचा वापर, जसे असेल तसे, बिघाड चालू राहील तितक्या कालावधीत, अशा पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने धारण केलेल्या पारेषण क्षमता हक्कांच्या प्रमाणात, कमी करण्यात येईल;

(बी) राज्य भार प्रेषण केंद्राला यथोचितपणे कळविलेल्या वीज अंतःक्षेपण आणि खेचच्याच्या अंतिम शेड्युलपासून पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने फारकत घेतल्यामुळे मुक्त प्रवेश कमी करणे आवश्यक झाल्यास, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा अशा पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याचा वापर, अशा फारकतीच्या पूर्ण प्रमाणात प्रथम कमी करण्यात येईल, व त्यानंतर वरील खंड (ए) मध्ये विनिर्दिष्ट केलेले तत्त्व लागू होईल.

३४.२ या विनियमांमध्ये कोणत्याही तरतुदी असल्या तरी, राज्य भार प्रेषण केंद्र आणीबाणीची स्थिती उद्‌भवल्यास आणि यंत्रणेची सुरक्षितता राखण्यासाठी, त्यास योग्य वाटतील अशा वापर कमी करण्याच्या अन्य तत्त्वांचा अवलंब करु शकेल.

३४.३ या विनियमांमध्ये कोणत्याही तरतुदी असल्या तरी, राज्य भार प्रेषण केंद्र कोणत्याही पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याचा यंत्रणेचा वापर कमी करण्याच्या संबंधात प्रादेशिक भार प्रेषण केंद्राकडून प्राप्त झालेल्या निर्देशांचे पालन करील.

## ३५. अन्य वाणिज्यिक अटी

प्रत्येक पारेषण परवानाधारक, अधिनियम आणि या विनियमांनुसार, या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून साठ (६०) दिवसांच्या आत किंवा पारेषण परवान्याचा प्रारंभ झाल्याच्या दिनांकापासून साठ (६०) दिवसांच्या आत, अशा पारेषण परवानाधारकाच्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या वापरासाठीच्या अन्य वाणिज्यिक अटी, त्याच्या संकेत-स्थळावर प्रदर्शित करील.

परंतु असे की, अशा अन्य वाणिज्यिक अटींच्या संदर्भात कोणताही वाद उद्‌भवल्यास, असा वाद आयोगाकडे निर्णयासाठी सादर करण्यात येईल.

## ३६. राज्य ग्रिड संहितेचे पालन

सर्व पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांनी राज्य ग्रीड संहितेचे पालन करणे त्यांचे कर्तव्य राहील;

परंतु असे की, कोणताही पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता राज्य ग्रिड संहितेचे पालन करण्यास अपयशी ठरला तर, अधिनियमाखाली पात्र ठरु शकणा-या कोणत्याही दंडास बाधा न येऊ देता, अशा उपयोगकर्त्यासाठी राखून ठेवलेले पारेषण क्षमता

हक्क, रद्द करण्यासाठी पात्र ठरतील व पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यास या प्रकरणी त्याची बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर पारेषण परवानाधारकाक ते रद्द करु शकेल.

**३७. विद्यमान करार आणि नाकारण्याचा प्रथम हक्क**

ठोक विद्युत पारेषण कराराच्या अनुषंगाने राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा वापरत असलेल्या विद्यमान पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांना, अशा कराराच्या समाप्तीनंतर, कराराचा कालावधी वाढविण्यासाठी नकार देण्याचा प्रथम हक्क राहील:-

परंतु असे की, अशा नकार देण्याच्या हक्काचा वापर पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याकडून फक्त एक (१) वर्षापेक्षा कमी नसलेल्या कालावधीच्या ठोक विद्युत पारेषण कराराच्या संबंधात करता येईल.

परंतु आणखी असे की, जेथे मागणी केलेला वाढीव कालावधी एक (१) वर्षापेक्षा कमी नसेल फक्त अशाच प्रकरणी नकार देण्याचा असा प्रथम हक्क उपलब्ध राहील.

**३८. दैवी आपत्ती**

दैवी आपत्ती म्हणजे एखादी घटना, जी नोडल एजन्सी किंवा अर्जदार किंवा आंतर-राज्य पारेषण यंत्रणा किंवा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा, जसे असेल तसे, यांच्या नियंत्रणाबाहेर असेल व ज्याबाबत आगाऊ कल्पना नसेल किंवा जिची वाजवी काळजी घेऊन देखील आगाऊ कल्पना येऊ शकली नसती आणि जी कराराच्या अंमलबजावणीवर मोठ्या प्रमाणात परिमाण करते. दैवी आपत्तींच्या घटनांमध्ये खालील घटनांचा समावेश होईल:-

(एक) नैसर्गिक आपत्ती पूर, वादळ, दुष्काळ, भूकंप आणि साथीचे रोग यांसह परंतु तेवढ्यापुरतेच मर्यादित नसेल;

(दोन) युद्ध (घोषीत किंवा अघोषीत), बंडाळी, आक्रमण, सशस्त्र संघर्ष किंवा परकीय शत्रुच्या कारवाया, यापैकी प्रत्येक घटना जी भारताशी संबंधित किंवा भारतावर थेट परिणाम करणारी असेल, तसेच क्रांती, दंगल, उठाव किंवा अन्य नागरी क्षोभ, दहशतवादी किंवा घातपाती कृत्ये, यापैकी भारतातील प्रत्येक घटना;

(तीन) निर्मिती केंद्र, स्व-वापरासाठीच्या निर्मिती केंद्र किंवा ग्राहकावर, आंतर-राज्य पारेषण यंत्रणा किंवा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा किंवा अन्य कोणतीही सुविधा किंवा यंत्रणा, जी या करारांतर्गत जबाबदा-या पार पाडण्यासाठी करावयाच्या कृतीचा एक अविभाज्य आणि महत्त्वाचा भाग असेल, यांच्यावर थेट परिणाम करणारे अणु-स्फोट, किरणोत्सर्गी अथवा रासायनिक प्रदुषण किंवा आयोनायझिंग किरणोत्सर्जन;

(चार) वर उल्लेखलेल्या कोणत्याही घटनेशी साम्य असणारी **भारतात घडणारी** कोणतीही घटना किंवा परिस्थिती.

परंतु असे की, वरील विनियम ३८.१ मध्ये उल्लेखलेली दैवी आात्तीची घटना घडल्यामुळे, मुक्त प्रवेश करारातील एक पक्षकार असणारी व्यक्ती जर, अशा करारातील किंवा या विनियमातील कोणतेही बंधन पूर्णतः किंवा अंशतः आणि वेळेवर व त्यात असलेल्या आश्यकतेप्रमाणे, पालन करण्यास समर्थ नसेल तर, या विनियमांच्या अधीन राहून, वरील बंधनाचे पालन, बाधित व्यक्तीची क्षमता अशा दैवी अपत्तीच्या घटनेमुळे बाधित झाली असेल त्या मर्यादेपर्यंत, स्थगित ठेवण्यात येईल.

परंतु असे की, अशी दैवी अपत्तीची घटना घडल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत ती घडल्याचे करारातील एक पक्षकार दुसऱ्या पक्षकाराला लेखी कळवील.

## ३९. वाद

३९.१ या विनियमांखालील कोणत्याही वादावर आयोगाकडून अभिनिर्णय देण्यात येईल.

परंतु असे की, या वादाच्या अभिनिर्णयासाठी खाली संदर्भ केलेल्या समितीचा अहवाल आयोग विचारात घेईल.

१. समिती

(एक) आयोग, ‘‘पारेषण मुक्त प्रवेशाचे संनियंत्रण आणि पुनर्विलोकन समिती’’ नावाने एक समिती गठीत करील, ज्यामध्ये राज्य भार प्रेषण केंद्र, पदसिद्ध पारेषण परवानाधारक, आयोगाच्या कर्मचारीवर्गापैकी एक व्यक्ती आणि प्राधिकृत ग्राहक प्रतिनिधी, यांचा प्रत्येकी एक सदस्य असेल. ही समिती परवाधारकाच्या कार्यक्षेत्रातील मुक्त प्रवेशाच्या प्रगतीचे संनियंत्रण करील आणि या समितीची तीन (३) महिन्यातून किमान एक बैठक घेईल.

(दोन) पारेषण परवानाधारक मंजूर करण्यात आलेल्या मुक्त प्रवेशांची, त्याच्याकडून प्रलंबित/नामंजूर करण्यात आलेले अर्ज, इ.बाबतची माहिती समितीला देईल.

(तीन) सदर समिती प्रत्येक सहा (६) महिन्यांत कमीत कमी एकदा त्यांची निरीक्षणे/सूचना सादर करील.

## ४०. दुरूस्ती करण्याचे अधिकार

आयोग या विनियमांतील कोणत्याही तरतुदींमध्ये कोणत्याही वेळी सुधारणा करु शकेल.

## ४१.अडचणी दूर करण्याचा अधिकार

या विनियमांतील कोणत्याही तरतुदीच्या अंमलबजावणीत काही अडचणी निर्माण झाल्यास, आयोग, सर्वसाधारण अथवा विशेष आदेशाने, अडचणी दूर करण्याच्या प्रयोजनासाठी आयोगास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी कार्यवाही करण्याचे निर्देश

आयोग राज्य पारेषण कंपनी, राज्य भार प्रेषण केंद्र, राज्यांतर्गत परवानाधारक आणि मुक्त प्रवेश ग्राहक यांना देऊ शकेल.

## ४२. आदेश व कार्य-प्रणाली निर्देश देणे

या विनियमांची अंमलबजावणी करण्यासंदर्भात, अधिनियमातील तरतुदींना अधीन राहून, आयोग वेळोवेळी आदेश व कार्य-प्रणाली निर्देश देऊ शकेल.

## ४३. रद्द करणे आणि अपवाद

४३.१. या विनियमात अन्यथा नमूद केलेल्या बाबी वगळून, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २००५ या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून रद्द होतील.

४३.२. हे विनियम रद्द करण्यात आले असले तरी, या रद्द केलेल्या विनियमांखाली करण्यात आलेली किंवा केली आहे असे मानण्यात येणारी कोणतीही कार्यवाही या विनियमांखाली करण्यात आलेली किंवा केली आहे असे मानण्यात येईल.

४३.३. हे विनियम अंमलात येण्याच्या दिनांका रोजी प्रचलित असलेल्या करार किंवा संविदेखाली राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेतील मुक्त प्रवेश ग्राहकांना, अशा प्रचलित करार/संविदेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या त्याच अटी व शर्तींना अनुसरून, पारेषण यंत्रणेमध्ये प्रवेश चालू ठेवण्याचा हक्क राहील. असा प्रचलित करार/ संविदा समाप्त झाल्यानंतर, या विनियमांखाली, अशा व्यक्ती दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश किंवा मध्यमकालीन मुक्त प्रवेश किंवा अल्पकालीन मुक्त प्रवेश घेण्यास पात्र असतील.

परंतु असे की, आयोगाने निश्चित केलेला वहन आकार, क्रॉस सबसिडी अधिभार, अतिरिक्त अधिभार, स्टँड-बाय आकार किंवा अन्य कोणताही आकार सर्व मुक्त प्रवेश ग्राहकांना लागू राहील.

४३.४ या विनियमांत काहीही नमूद करण्यात आले असले तरी, त्यामुळे हे विनियम किंवा त्यांचा कोणताही भाग लागू करण्यातून एखाद्या व्यक्तीला सूट देण्याचे आयोगाचा अधिकार, असा अधिकार या विनियमांच्या अधिसूचनेच्या पूर्वी अथवा नंतर वापरला गेला असला किंवा नसला तरी देखील, अवैध ठरणार नाही :

परंतु असे की, आयोग अशी सूट देण्यापूर्वी, व्यवहार्य असेल तितकी, कोणत्याही स्वारस्य असलेल्या किंवा बाधित पक्षकाराला त्याचे अभिवेदन सादर करण्याची वाजवी संधी देईल.

४३.५ या विनियमांत काहीही स्पष्टपणे किंवा सूचितपणे नमूद केले असले तरी त्यामुळे, ज्यासाठी कोणतेही विनियम करण्यात आलेले नाहीत, असे कोणतेही प्रकरण हाताळण्यास किंवा अधिनियमातील कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यास, बाधा येणार नाही आणि आयोग अशी प्रकरणे, अधिकार आणि कार्ये त्यास योग्य वाटेल अशारितीने हाताळू शकेल.

**अश्वनी कुमार**

सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग.

मुंबई,
दिनांक २५ जून २०१४.

**जोडपत्र – १**

**अल्पकालीन प्रवेशासाठी नमुने**

**नमुना - अ.का.-१**

<table>
<tr><td colspan="8">अल्प-कालीन मुक्त प्रवेशाच्या मंजुरीसाठी अर्ज<br>(अल्प-कालीन मुक्त प्रवेश अर्जदाराने राज्य भार प्रेषण केंद्राला सादर करावयाचा अर्ज)</td></tr>
<tr><td>१</td><td colspan="3">ग्राहक अर्ज क्र.:</td><td colspan="4">दिनांकः</td></tr>
<tr><td>२</td><td colspan="7">अर्जदाराचे नाव</td></tr>
<tr><td>३</td><td colspan="3">ग्राहक क्र.:</td><td colspan="4">विद्यमान पुरावठादार (असल्यास):</td></tr>
<tr><td>४</td><td colspan="3">मीटर क्र.</td><td colspan="4">जोडणी प्रकारः</td></tr>
<tr><td rowspan="3">५</td><td colspan="7">पत्रव्यवहाराचा पत्ताः</td></tr>
<tr><td>दूरध्वनी क्रः</td><td colspan="2">(कार्यालयीन)</td><td colspan="2">(निवासी):</td><td colspan="2">(फॅक्स):</td></tr>
<tr><td>ई-मेल आयडीः</td><td colspan="4"></td><td colspan="2">मोबाइल क्र.</td></tr>
<tr><td rowspan="6">६</td><td colspan="7">कराराचा तपशीलः (करार/ सामंजस्य कराराचा (एमओयु) तपशील )</td></tr>
<tr><td>अर्जदाराचा प्रकार</td><td colspan="6">खरेदीदार/विक्रेता/व्यापारी/स्व-वापरासाठी वीज निर्माता/ नूतनशील ऊर्जा निर्माता</td></tr>
<tr><td>कोणाबरोबर</td><td>क्रमांक</td><td>दिनांक</td><td>पर्यंत वैध</td><td>करारातील क्षमता (मेवॉ)</td><td>अन्य स्त्रोताबरोबर करार केला असल्यास त्यातील क्षमता (मेवॉ)</td><td>मुक्त प्रवेशासाठी अर्जात मागणी केलेल्या दिवसांची संख्या</td></tr>
<tr><td>खरेदीदार</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>विक्रेता</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>पॉवर एक्स्चेंज</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td rowspan="4">७</td><td colspan="7">समन्वयकाचा तपशील</td></tr>
<tr><td colspan="7">नाव आणि पदनामः</td></tr>
<tr><td>दूरध्वनी क्रः</td><td colspan="2">(कार्यालयीन)</td><td colspan="2">(फॅक्स)</td><td colspan="2">मोबाईल</td></tr>
<tr><td>ई-मेल आयडीः</td><td colspan="2"></td><td colspan="2"></td><td colspan="2"></td></tr>
</table>

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | अर्जात मागणी केलेली क्षमता | | | | | |
| | कालावधी (दिवसात) | | कालावधी (वेळेत) | | | क्षमता (मेगावॉट) |
| | (दिनांक)पासून | (दिनांक) पर्यंत | तास (पासून) | तास (पर्यंत) | | |
| | | | | | | |
| ९ | पीपीए / पीएसए / एमओयु चा तपशील | | पीपीए/पीएसए/ एमओयुचा दिनांक | वैध कालावधी | | क्षमता |
| | पक्षकारांचे नाव आणि पत्ता | | | प्रारंभ | समाप्ती | मेगावॉट |
| | विक्रेता | खरेदीदार | | | | |
| | | | | | | |
| १० | विजेचे अंतःक्षेपण करणाऱ्या कंपनीचा तपशील | | | | | |
| | नावः | | | | | |
| | विजेचे अंतःक्षेपण करण्याचे ठिकाणः | | | | | |
| | संबंधित वितरण कंपनी/परवानाधारकाचे नावः | | | | | |
| | तपशील (सर्वात जवळच्या उप-केंद्राकडे जाण्याचा मार्ग): | | | | | |
| | मीटर क्रः | | | | | |
| ११ | वीज खेचणा-या कंपनीचा तपशील | | | | | |
| | नावः | | | | | |
| | वीज खेचण्याचे ठिकाणः | | | | | |
| | संबंधित वितरण कंपनी/परवानाधारकाचे नाव : | | | | | |
| | तपशील (सर्वात जवळच्या उप-केंद्राकडे जाण्याचा मार्ग): | | | | | |
| | मीटर क्र.: | | | | | |
| १२ | वीज व्यापा-याचे (असल्यास)नावः | | | | | |
| १३ | अर्जाची फी भरणा केल्याचा तपशीलः | | | | | |

१४. येथे असे प्रमाणित करण्यात येते कीः

(अ) या व्यवहारातील सर्व कंपन्या (खरेदीदार, विक्रेता आणि वीज व्यापारी यांच्यासह), वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २०१४ आणि/किंवा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०१४ जसे असेल तसे, यामधील तरतुदींचे पालन करतील.

(ब) मुक्त प्रवेश क्षमतेचे वाटप करण्यात आल्यास, राज्यांतर्गत उपलब्धतेवर आधारित वीज दरामधील तरतुदींनुसार, 'डे-अहेड' काल व परिमाण निर्धारणाकरिता, या अर्जाची छाननी करण्यासाठी मी राज्य भार प्रेषण केंद्राला प्राधिकृत करतो.

(क) अर्जदार याद्वारे राज्य भार प्रेषण केंद्राला,--------------(वितरण परवानाधारकाच्या ग्राहकाच्या बाबतीत, वितरण परवानाधारकाचे नाव) सर्व काळ नुकसान भरपाई देण्याची हमी देतो व राज्य भार प्रेषण केंद्राला आणि -------------- (वितरण परवानाधारकाच्या ग्राहकाच्या बाबतीत, वितरण परवानाधारकाचे नाव,) या मान्यतेखालील सर्व व्यवहारांच्या संबंधात कोणतेही नुकसान, हानि, दावे आणि कारवाई उद्‌भवल्यास त्यापासून त्याला नुकसान भरपाईदेण्याची, बचाव, रक्षण करण्याची हमी देतो.

(ड) अर्जदार येथे मान्य करतो की तो, पॉवर एक्स्चेंजमधील आणि वीज व्यापाऱ्यांकडील एकूण बोली, मंजूर करण्यात आलेल्या परिमाणापेक्षा, अधिक राहणार नाहीत याची काळजी घेईल.

(इ) मे. --------------------- (राज्यांतर्गत विजेचा व्यापारी असल्यास त्याचे येथे नाव लिहावे) यांच्याकडे राज्यांतर्गत विजेच्या व्यापारासाठी वैध परवाना (संदर्भ क्र.----------- ने -------------- यांनी दिलेला आणि ------- पर्यंत वैध असलेला) आहे आणि तो वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, २००४ चे पालन करेल.

(फ) मे. --------------------- (आंतर-राज्य विजेचा व्यापारी असल्यास त्याचे येथे नाव लिहावे) यांच्याकडे आंतर-राज्य विजेच्या व्यापारासाठी वैध परवाना (संदर्भ क्र.----------- ने -------------- यांनी दिलेला आणि ------- पर्यंत वैध असलेला) आहे आणि तो वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह केंद्रीय विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना मंजूर करण्यासाठी अटी व शर्ती, कार्यपद्धती आणि अन्य संबंधित बाबी) विनियम, २००९ चे पालन करेल.

१५. राज्य भार प्रेषण केंद्राने निर्गमित केलेल्या 'अल्पकालीन मुक्त प्रवेश उपयोगकर्त्यांसाठी पारेषण क्षमता राखीव ठेवण्याच्या कार्यपद्धती'मधील तरतुदींना याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

स्वाक्षरी -

ठिकाणः नाव आणि पदनाम

दिनांकः

**जोडपत्रे :**

(एक) ------------ द्वारे विना-परताव्याचे अर्ज शुल्क

(दोन) करारातील विजेची मागणी, व्यवहाराचा कालावधी, विजेचे अंतःक्षेपण करण्याची आणि वीज खेचण्याची ठिकाणे, इ. बाबी नमूद करण्यात आलेल्या व्यवहाराशी संबंधित पक्षकारांमध्ये (खरेदीदार आणि विक्रेते) करण्यात आलेल्या पीपीए/पीएसए/सामंजस्य कराराची (एमओयु ) स्व-प्रमाणित प्रत.

<table>
<tr><td colspan="3">राज्य भार प्रेषण केंद्राच्या वापरासाठी (अर्जदाराने सादर केलेल्या अर्जाच्या संदर्भात)</td></tr>
<tr><td colspan="2">राज्य भार प्रेषण केंद्राचा संदर्भ क्र.:</td><td>दिनांक :</td></tr>
<tr><td>राज्य भार प्रेषण केंद्राची मंजुरी/नकाराचा क्र.</td><td colspan="2"></td></tr>
<tr><td>शेरे (नकाराची कारणे नमूद करावीत)</td><td colspan="2"></td></tr>
</table>

(राज्य भार प्रेषण केंद्र नकाराच्या कारणाच्या पुष्ट्यर्थ प्रत्येक पानावर यथोचितपणे स्वाक्षरी केलेली कागदपत्रे देखील सोबत जोडेल).

<u>*अल्पकालीन प्रवेशासाठी नमुने*</u>

# <u>पोच-पावती</u>

*(फक्त कार्यालयीन वापरासाठी)*

## अल्पकालीन मुक्त प्रवेश मंजुरीसाठी अर्ज

### *(अ) < ग्राहकाने भरावयाची माहिती >*

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | ग्राहक अर्ज क्रमांक | *< ग्राहकाने स्वतः निर्माण केलेला >* | दिनांक | |
| २ | व्यवहाराचा कालावधी | | | |
| ३ | ग्राहकाचा प्रकार* | *विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता/ विजेचा व्यापारी (विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता यांच्या वतीने)* | | |

<**वीज हस्तांतरणाच्या संदर्भात)* >

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | ग्राहकाचे नाव | | | |
| ५ | नोंदणी संकेतांक | | पर्यंत वैध | |

**< राज्य भार प्रेषण केंद्राकडून देण्यात आल्याप्रमाणे नोंदणी संकेतांक असेल >**

### *ब) < राज्य भार प्रेषण केंद्राने भरावयाची माहिती >*

| | |
|---|---|
| अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक व वेळ | |

ठिकाण: स्वाक्षरी (स्टॅम्पसह)

दिनांक: (नाव आणि पदनाम).

# पोच-पावती

(यथोचितपणे भरलेला अर्ज प्राप्त झाल्यानंतर राज्य भार प्रेषण केंद्राने ग्राहकाला ताबडतोब द्यावयाची पावती)

## अल्पकालीन मुक्त प्रवेशाच्या मंजुरीसाठी अर्ज

### *(अ) < ग्राहकाने भरावयाची माहिती >*

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | ग्राहक अर्ज क्रमांक | | दिनांक | |
| २ | व्यवहाराचा कालावधी | | | |
| ३ | ग्राहकाचा प्रकार* | *विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता/ विजेचा व्यापारी (विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता यांच्या वतीने)* | | |

*<*वीज हस्तांतरणाच्या संदर्भात >*

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | ग्राहकाचे नाव | | | |
| ५ | नोंदणी संकेतांक | | पर्यंत वैध | |

**< राज्य भार प्रेषण केंद्राकडून देण्यात आल्याप्रमाणे नोंदणी संकेतांक असेल >**

### *ब) < राज्य भार प्रेषण केंद्राने भरावयाची माहिती >*

| | |
|---|---|
| अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक व वेळ | |

ठिकाणः स्वाक्षरी (स्टॅम्पसह)

दिनांकः (नाव आणि पदनाम).

**वि. सू.ः ही प्रति-पावती खोडून टाकावी व ग्राहकाला देण्यात यावी.**

अल्प-कालीन प्रवेशासाठी नमुने

<u>नमुना - अ.का.२</u>

## अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठी मंजुरी

*(राज्य भार प्रेषण केंद्राने द्यावयाची )*

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | राज्य भार प्रेषण केंद्राचा मंजुरी क्र. | /(सुधारणा-०) | दिनांक | |

<सुधारणा-० म्हणजे मूळ मंजुरी सुधारणा क्र.- शून्य सह>

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | ग्राहक अर्ज क्रमांक | *(नमुना-अ.का. १ मध्ये ग्राहकाने दिल्याप्रमाणे)* | दिनांक | |
| २ | व्यवहाराचा कालावधी | | | |
| ३ | ग्राहकाचा प्रकार* | *विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता/ विजेचा व्यापारी (विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता यांच्या वतीने)* | | |

<* वीज हस्तांतरणाच्या संदर्भात>

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | ग्राहकाचे नाव | | | |
| ५ | नोंदणी संकेतांक | | पर्यंत वैध | |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | ग्रिडशी व्यवहार करणाऱ्या पारेषण कंपनीचा तपशील | | |
| | | वीज अंतःक्षेपण करणारी कंपनी | वीज खेचणारी कंपनी |
| | विद्युत कंपनीचे नाव | | |
| | विद्युत कंपनीचा दर्जा | | |
| | ज्या कंपनीत ती समाविष्ट आहेत ती विद्युत कंपनी | | |

<*मालकीच्या संदर्भात- राज्य कंपनी/स्व-वापरासाठीचा वीज निर्माता/स्वतंत्र वीज निर्माता/आंतर-राज्य वीज निर्मिती केंद्रे (आय एस जी एस)/ वितरण कंपनी/ग्राहक/ अन्य कोणी असल्यास्स, विनिर्दिष्ट करणे >

| ७ | राज्यांतर्गत प्रेषण यंत्रणा/ वितरण यंत्रणेशी ( लाग असेल त्याप्रमाणे) वीज अंतःक्षेपण/खेचणा-या जोडणीचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|
| | | | वीज अंतःक्षेपण करणारी कंपनी | वीज खेचणारी कंपनी |
| | उप-केंद्राचे नाव | पारेषण | | |
| | | वितरण | | |
| | व्होल्टेजची पातळी | पारेषण | | |
| | | वितरण | | |
| | परवानाधारकाचे नाव (उप-केंद्राचा मालक) | | | |
| | मध्यस्थ राज्यांतर्गत परवानाधारक | | | |
| | मध्यस्थ आंतर-राज्य परवानाधारक | | | |

< वितरण परवानाधारक, आवश्यकता असल्यास, इंटरफेस सीमा त्याच्या जोडणीयतेचे ठिकाण मानू शकेल >

| ८ | मुक्त प्रवेश मंजूर केलेला कालावधी (दि.----------- पासून ते दि.------------- - पर्यंत) | | | | | | सुधारणा क्र. | ० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | महिना | दिनांक | | तास | | क्षमता (मेगावॅटमध्ये) | | मेगावॅट तास |
| | | पासून | पर्यंत | पासून | पर्यंत | अर्जात मागितलेली | वाटप केलेली | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | एकूण मेगावॅट तास | | |

| ९ | बोलीचा तपशील *(फक्त बोली असल्यास)* | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | राज्यांतर्गत यंत्रणेचा तपशील | दिनांक | | तास | | लागू असलेला दर (रु./युनिट) |
| | | पासून | पर्यंत | पासून | पर्यंत | |
| | पारेषण यंत्रणा | | | | | |
| | वितरण यंत्रणा | | | | | |

१० वेळोवेळी सुधारणा केलेल्या आणि लागू असलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २०१४ आणि अशा अन्य कोणताही संबंधित विनियम/आदेश/संहितेमधील तरतुदींच्या अधीन सदर मंजुरी राहील < फक्त प्रकरण मंजूर केले असल्यास>

११ ---------------------------------------------------------- मुळे प्रकरण नामंजूर करण्यात येत आहे.

< फक्त प्रकरण नामंजूर केले असल्यास >

< राज्य भार प्रेषण केंद्र मुक्त प्रवेश नामंजूर करण्यात आला असल्यास विशिष्ट कारण कळवेल आणि त्याच्या पुष्ट्यर्थ असलेली प्रत्येक पानावर स्वाक्षरी केलेली कागदपत्रे सोबत जोडू शकेल>

---

ठिकाणः स्वाक्षरी (स्टॅम्पसह)

दिनांकः (नाव आणि पदनाम)

जोडपत्रे:

१) रकमा भरणा करण्याचे वेळापत्रक *< फक्त प्रकरण मंजूर केले असल्यास>*

२) अन्य, काही असल्यास

जोडपत्रांसह प्रत रवाना

१) ग्राहक

२) व्यवहाराशी संबंधित पारेषण उप-केंद्राचा प्रभारी अधिकारी

३) व्यवहाराशी संबंधित वितरण उप-केंद्राचा प्रभारी अधिकारी

४) संबंधित अन्य कोणीही

<u>अल्प-कालीन प्रवेशासाठी नमुने</u>
<u>नमुना - अ.का. २ चे जोडपत्र</u>

## रकमा भरणा करण्याचे वेळापत्रक

*(राज्य भार प्रेषण केंद्राने दर महिन्यास नमुना - अ.का. २ बरोबर जोडावयाचे)*

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | राज्य भाड़ प्रेषण केंद्राचा मंजुरी क्र. | /(सुधारणा-०) | दिनांक | |

< सुधारणा-० म्हणजे मूळ मंजुरी सुधारणा क्र.- शून्य सह>

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | ग्राहक अर्ज क्रमांक | *(नमुना-अ.का. १ मध्ये ग्राहकाने दिल्याप्रमाणे)* | दिनांक | |
| २ | व्यवहाराचा कालावधी | | | |
| ३ | ग्राहकाचा प्रकार* | *विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता/ विजेचा व्यापारी (विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता यांच्या वतीने)* | | |

<* वीज हस्तांतरणाच्या संदर्भात >

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | ग्राहकाचे नाव | | | |
| ५ | नोंदणी संकेतांक | | पर्यंत वैध | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | अल्प-कालीन तात्पुरत्या* मुक्त प्रवेश आकारांचा मासिक भरणा करावयाचे वेळपत्रक (कालावधीः *दि. पासून दि. पर्यंत*) | | महिना | |
| | खालील बाबींसाठी आकारणीयोग्य रक्कम | दर (रु./युनिट) | मेगावॅट तास | एकूण (रु.) |
| | १) राज्यांतर्गत जाळे | | | |
| | अ) पारेषण आकार | | | |
| | संबंधित पारेषण परवानाधारक | | | |
| | मध्यस्थ राज्यांतर्गत परवानाधारक (असल्यास) | | | |
| | | | | |
| | ब) वहन आकार | | | |
| | संबंधित वितरण परवानाधारक | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | मध्यस्थ राज्यांतर्गत परवानाधारक (असल्यास) | | | |
| | | | | |
| | क) अधिभार | | | |
| | संबंधित वितरण परवानाधारक | | | |
| | | | | |
| | ड) अतिरिक्त अधिभार | | | |
| | संबंधित वितरण परवानाधारक | | | |
| | | | | |
| | इ)राज्य भार प्रेषण केंद्र आकार | | | |
| | राज्य भार प्रेषण केंद्र | | | |
| | | | | |
| | २) आंतर-राज्य जाळे | | | |
| | पारेषण आकार | | | |
| | मध्यस्थ आंतर-राज्य परवानाधारक (असल्यास) | | | |
| | | | | |
| | भरणा करावयाची एकूण मासिक रक्कम (रु.) | | | |

ठिकाणः स्वाक्षरी (स्टॅम्पसह)

दिनांकः (नाव आणि पदनाम)

* तात्पुरती रक्कम ही अर्जात उल्लेख केलेल्या मेगावॅट तासांच्या आधारे असेल, जी प्रत्यक्ष वापरानुसार बदलू शकेल.

<u>अल्प-कालीन प्रवेशासाठी नमुने</u>

<u>नमुना - अ.का. ३</u>

# (विद्युत) अतिभाराची माहिती आणि बोलीसाठी आमंत्रण

*(राज्य भार प्रेषण केंद्राने पाठवावयाचे आमंत्रण )*

**राज्य भार प्रेषण केंद्राचा बोली आमंत्रण क्र. ---------** **दिनांक ------**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | ग्राहक अर्ज क्रमांक | *(नमुना- अ.का.१ मध्ये ग्राहकाने दिल्याप्रमाणे)* | दिनांक | |
| २ | व्यवहाराचा कालावधी | | | |
| ३ | ग्राहकाचा प्रकार* | *विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता/ विजेचा व्यापारी (विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता यांच्या वतीने)* | | |

**<* वीज हस्तांतरणाच्या संदर्भात >**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | ग्राहकाचे नाव | | | |
| ५ | नोंदणी संकेतांक | | पर्यंत वैध | |

६ अपेक्षित अतिभार ( रोहित्र आणि विद्युत वाहिनी/लिंक) खालीलप्रमाणे आहेः

| नेटवर्क कॉरिडॉर | | अतिभाराचा कालावधी | | | | उपलब्ध मार्जिन / क्षमता | सर्व ग्राहकांनी अर्जात मागणी केलेली एकूण क्षमता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उप-केंद्र रोहित्राच्या क्षमतेसह | विद्युत वाहिनी/ लिंक क्षमतेसह | दिनांक | | तास | | | |
| | | पासून | पर्यंत | पासून | पर्यंत | मेगावॉट | मेगावॉट |
| राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| राज्यांतर्गत वितरण यंत्रणा | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| आंतर-राज्य पारेषण यंत्रणा | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

७. उपरोल्लेखित बाबी विचारात घेऊन कृपया नमुना- अ.का. ४ मध्ये बोली सादर करावी. बोलीचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| | | | |
|---|---|---|---|
| अ) बोलीच्या आमंत्रणाचा दिनांक | | वेळ | |
| ब) बोली सादर करण्याचा दिनांक | | वेळ | |
| क) बोली उघडण्याचा दिनांक | | वेळ | |
| ड) बोली कशासाठी मागविण्यात आली आहे | | | |

<table>
<tr><th colspan="2">राज्यांतर्गत नेटवर्क कॉरिडॉर</th><th colspan="4">अतिभाराचा कालावधी</th><th rowspan="2">बोलीसाठी उपलब्ध मार्जिन / क्षमता</th><th rowspan="2">किमान किंमत</th></tr>
<tr><th rowspan="2">उप-केंद्र</th><th rowspan="2">विद्युत वाहिनी/ लिंक</th><th colspan="2">दिनांक</th><th colspan="2">तास</th></tr>
<tr><th>पासून</th><th>पर्यंत</th><th>पासून</th><th>पर्यंत</th><th>मेगावॅट</th><th>रुपये/युनिट</th></tr>
<tr><td colspan="2">पारेषण यंत्रणेचे नाव</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td colspan="2">वितरण यंत्रणेचे नाव</td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table>

८. जर बोली सादर करण्यात आली नाही तर, अर्ज मागे घेण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि त्यावर पुढील कार्यवाही करण्यात येणार नाही.

ठिकाण: स्वाक्षरी (स्टॅम्प सह)

दिनांक: नाव आणि पदनाम

प्रतिः ग्राहक- (नमुना-अ.का. १ मधील अनु क्र. १ मध्ये ग्राहकांनी दिलेल्या) त्यांच्या संदर्भासह

*अल्प-कालीन प्रवेशासाठी नमने*

<u>नमुना - अ.का. ४</u>

## बोलीसाठी प्रस्ताव

(ग्राहकाने राज्य भार प्रेषण केंद्राला सादर करावयाचा)

**संदर्भः राज्य भार प्रेषण केंद्राचा बोली आमंत्रण क्र. दिनांक -**

**प्रतिः राज्य भार प्रेषण केंद्र,**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | ग्राहक अर्ज क्रमांक | *<नमुना- अ.का.१ मध्ये ग्राहकाने दिल्याप्रमाणे>* | दिनांक | |
| २ | व्यवहाराचा कालावधी | | | |
| ३ | ग्राहकाचा प्रकार* | *< विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता/ विजेचा व्यापारी (विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता यांच्या वतीने)* | | |

*<* वीज हस्तांतरणाच्या संदर्भात >*

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | ग्राहकाचे नाव | | | |
| ५ | नोंदणी संकेतांक | | पर्यंत वैध | |

६. वरील बोली आमंत्रणाच्या संदर्भात, मी माझी बोली खालीलप्रमाणे सादर करीत आहे-

| | राज्य भार प्रेषण केंद्राने दिलेला बोलीचा तपशील | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| राज्यांतर्गत नेटवर्क कॉरिडॉर | | अतिभाराचा कालावधी | | | | बोलीसाठी उपलब्ध मार्जिन / क्षमता | किमान किंमत | बोलीदाराने नमूद करावयाची बोली किंमत |
| उप-केंद्र | विद्युत वाहिनी / लिंक | दिनांक | | तास | | | | |
| | | पासून | पर्यंत | पासून | पर्यंत | मेगावॉट | पैसे/युनिट | पैसे/युनिट |
| पारेषण यंत्रणेचे नाव | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| वितरण यंत्रणेचे नाव | | | | | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

< * बोलीदार किमान किंमतीच्या संदर्भात त्यांची किंमत ( पूर्णांक संख्येत) नमूद करतील.>

**७. मी याद्वारे मान्य करतो की, निश्चित केलेली बोलीची किंमत वहन आकार असतील.**

**ठिकाण :** **स्वाक्षरी (स्टॅम्पसह)**

**दिनांक:** **(नाव आणि पदनाम)**

## दीर्घ-कालीन/मध्यम कालीन मुक्त प्रवेशासाठी नमुना अर्ज
## (मुक्त प्रवेश अर्जदाराने सादर करावयाचा)

**अर्ज क्र.:** **दिनांकः**

**१ अर्जदाराचे नाव :**

**२ पत्रव्यवहाराचा पत्ता :**

**दूरध्वनी क्र. < > फॅक्स क्र. < > ई-मेल < >**

**३ अर्जदाराचा प्रकारः (खरेदीदार/विक्रेता/व्यापारी/स्व-वापरासाठीचा निर्माता)**

**४ करार/एमओयु/संमती पत्राचा तपशीलः-**

| सह | संदर्भ क्र. | दिनांक | पर्यंत वैध | कमाल मागणी (मेगावॉट) |
|---|---|---|---|---|
| खरेदीदार | | | | |
| विक्रेता | | | | |

**५ समन्वयकाचा तपशील :-**

| | | |
|---|---|---|
| नाव | | |
| पदनाम | | |
| दूरध्वनी क्रमांक | (कार्या) : | (निवास) |
| | (फॅक्स) : | (मोबाईल) |
| | ई-मेल आयडीः | |

**६ मुक्त प्रवेशाचा प्रकारः (स्व-वापरासाठीचा वीज निर्माता किंवा अन्य पक्षकार)**

(स्वतःसाठी वीज वापर असल्यास, भांडवल रचनेचा तपशील आणि आणि विद्युत अधिनियम, २००३ सह विद्युत नियम, २००५ मधील आवश्यकतांची पूर्तता केली असल्याबाबत सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र देण्यात यावे )

**७ वीज हस्तांतरण गरजेचा तपशील**

१ पारेषण करावयाच्या विजेचे परिमाण (मेगावॅट)
२ हस्तांतरीत करावयाचा सर्वोच्च भार (मेगावॅट)
३ हस्तांतरीत करावयाचा सरासरी भार (मेगावॅट)

**८ मुक्त प्रवेश सुरू होण्याचा अपेक्षित दिनांकः**

**९ मुक्त प्रवेश हवा असलेला कालावधीः**

| कालावधी | | वेळ | | क्षमता (मेगावॅट) |
|---|---|---|---|---|
| दिनांकापासून | दिनांकापर्यंत | तासापासून | तासापर्यंत | |
| | | | | |
| | | | | |

**१० अंतःक्षेपणाच्या ठिकाणाचा तपशीलः**

| | | |
|---|---|---|
| वीज अंतःक्षेपण करणा-या विद्युत कंपनी/व्यक्ती किंवा संस्था (पक्ष) /वीज निर्मिती केंद्राचे नांव | | |
| प्रकार आणि निर्मिती क्षमता | | |
| व्होल्टेज पातळी | | |
| वीज अंतःक्षेपणाचे ठिकाण (उप-केंद्राचे नाव – वितरण कंपनी / मविनिआ ) | | |
| ज्याच्या क्षेत्रात स्थित असेल त्या ठिकाणाचे आणि वितरण कंपनीचे नाव | | |
| मिटरींग व्यवस्था<br>मिटरचा तपशील | | |
| अ. | अचुकतेचा दर्जा | |

| | | |
|---|---|---|
| ब. | दिवसातील (दोन) वेळांमधील मध्यावधी (टाईम ऑफ डे इंटरव्हल) | |
| क. | मापदंड | |
| एक | | |
| दोन | | |
| तीन | | |
| चार | | |

**११. वीज खेचण्याच्या ठिकाणाचा तपशील (वीज खेचण-या कंपनी/ग्राहकाचा तपशील):**

| | | |
|---|---|---|
| उपयोगकर्त्याचे नाव | | |
| बहिर्गमनाचे ठिकाण | | |
| व्होल्टेजची पातळी | | |
| बहिर्गमनाच्या ठिकाणासाठी वीज पुरवठ्याचा स्त्रोत (उप-केंद्र-वितरण कंपनीचे नाव/मविनिआ) | | |
| ज्याचया क्षेत्रात स्थित असेल त्या ठिकाणाचे आणि वितरण कंपनीचे नाव | | |
| मिटरींग व्यवस्था<br>मिटरचा तपशील | | |
| अ. | अचुकतेचा दर्जा | |
| ब. | दिवसातील (दोन) वेळांमधील मध्यावधी- (टी डी इंटरव्हल) | |
| क. | मापदंड | |
| एक. | | |
| दोन. | | |
| तीन. | | |
| चार. | | |

**१२. बहिर्गमनाच्या ठिकाणाचा ग्राहक वितरण परवानाधारकाचा विद्यमान ग्राहक आहे का? (होय किंवा नाही)**

(उत्तर होय असल्यास, ग्राहक क्रमांक, करार केलेली कमाल मागणी, वर्गवारी, मुक्त प्रवेश अंशतः भारासाठी किंवा पूर्ण भारासाठी आहे, याची माहिती देणे)

**१३. वीज खरेदीचा करार (पीपीए)/ कंत्राट आणि सामंजस्य करार (एम ओ यु) चा तपशील**

एक. अंतःक्षेपण क्रण्यासाठी लागणा-या विजेकरिता
दोन. खेचण्यासाठी लागणा-या विजेकरिता
तीन. संतुलन आणि तफावतीसाठी लागणा-या विजेकरिता
चार. आंतर-राज्य पारेषण मुक्त प्रवेशासाठी, असल्यास
पाच. वरील व्यवहारात वीज व्यापाऱ्याशी आणि विद्युत एक्स्चेंजच्या सदस्यांशी, केला असल्यास, कोणताही करार

**१४. निर्मिती केंद्रांच्या बाबतीत**

एक. प्रवर्तकाचे नाव :
दोन. निर्मिती क्षमता
तीन. निर्मिती संयंत्राचे ठिकाण
चार. संचांची संख्या आणि प्रत्येक संचाची क्षमता
पाच. इंधनाचा प्रकार
सहा. बेस भार केंद्र किंवा पीकींग भार केंद्र
सात. पीकींग भार असल्यास, अंदाजित प्रवाहाचे तास
आठ. जल विद्युत निर्मिती प्रकल्प असल्यास, तो नदीच्या वाहत्या पाण्यावर/ साठवलेल्या पाण्यावर (रिझव्हायर)/बहुउद्देशीय/पम्प स्टोअरेज वर आहे का,

जल विद्युत निर्मिती प्रकल्पाच्या बाबतीत एक वर्षातील निर्मिती-
(दशलक्ष युनिट्समध्ये)

नऊ. स्टेप-अप जनरेशन व्होल्टेज ४०० केव्ही किंवा २२० केव्ही किंवा अन्य कोणताही व्होल्टेज तो विनिर्दिष्ट करा

दहा. जल विद्युत केंद्राच्या बाबतीत तो, केंद्रीय विद्युत प्राधिकारणाने निश्चित केलेला प्रकल्प आहे का

**१५ अर्जाच्या शुल्काचा तपशील (विना-परतावा):**

| | | |
|---|---|---|
| एक | बँकेचे नाव | |
| दोन | ड्राफ्ट क्र आणि दिनांक | |
| तीन | रक्कम | |

| | | |
|---|---|---|
| चार | ड्राफ्ट कोणत्या बॅकेत देय असेल | |

## १६ अन्य कोणतीही माहितीः

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की,

१. वेळोवेळी सुधारणा करण्यात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश), विनियम २०१४ आणि/किंवा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम २०१४ मधील, जसे असेल तसे, तरतुदींचे पालन या व्यवहारातील (खरेदीदार, विक्रेता आणि वीज व्यापारी यासह) सर्व विद्युत कंपन्यां करतील.

२. प्रस्तावित व्यवहारासाठी खरेदीदार आणि विक्रेता यांनी वाणिज्यिक करार केला आहे. दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश आकार (अदा केले गेले नसल्यास) ते माझ्याकडून भरणा करण्यात येतील.

३. अर्जदार येथे मान्य करतो की, ---------------------------------------- (पारेषण परवानाधारकाचे नाव) यांना सर्व काळ नुकसान भरपाई देण्याची आणि त्याने मान्यता दिलेल्या व्यवहारांमधून उद्‌भवणारी किंवा परिणामस्वरुप कोणत्याही व्यक्तीला झालेली इजा किंवा मृत्यु किंवा मालमत्तेला झालेले नुकसान, मागण्या, वाद, परिव्यय व खर्चाची वसूली, न्यायालयीन खर्च, वकील फी आणि अन्य पक्षकारांची किंवा त्यांच्याप्रती सर्व दायित्वे यांच्या संबंधातील कोणतेही नुकसान, हानि, दावे आणि कारवाई यापासून त्याला नुकसान भरपाई देण्याची, बचाव आणि रक्षण करण्याची हमी देत आहे.

४. ----------------------------------------(पारेषण परवानाधारकाचे नाव) यांच्याकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर, आम्ही तीस (३०) दिवसांच्या आत दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश करार करू व असे न केल्यास, ----------------------------------------------( पारेषण परवानाधारकाचे नाव) यांना कोणतीही आणखी सूचना न देता मान्यता रद्द करण्याचा हक्क असेल.

५ मे. -------------------- (राज्यांतर्गत विजेचा व्यापारी असल्यास त्याचे येथे नाव लिहावे) यांच्याकडे राज्यांतर्गत विजेच्या व्यापारासाठी वैध परवाना (संदर्भ क्र.----------- ने ------------- यांनी दिलेला आणि ------- पर्यंत वैध असलेला)

आहे आणि तो वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, २००४ चे पालन करेल.

६ मे. -------------------- (आंतर-राज्य विजेचा व्यापारी असल्यास त्याचे येथे नाव लिहावे) यांच्याकडे आंतर-राज्य विजेच्या व्यापारासाठी वैध परवाना (संदर्भ क्र.----------- ने -------------- यांनी दिलेला आणि ------- पर्यंत वैध असलेला) आहे आणि तो वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह केंद्रीय विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना मंजूर करण्यासाठीच्या अटी व शर्ती, कार्यपद्धती आणि अन्य संबंधित बाबी) विनियम, २००९ चे पालन करेल.

अर्तदाराची सही

ठिकाण : नावः

दिनांक : पदनामः

**अश्वनी कुमार**

सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग.

मुंबई,
दिनांकः २५ जून २०१४.